**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण काल रोजी महिला दिना निमित्त सर्व महिलांना मिठाईचे वाटप केलेले आहे. याबाबत पुरुषांना मिठाई वाटप करण्यात आलेले नाही. याबाबत पुरुषांवर महिला दिनाच्या दिवशी असा अन्याय का ? आपण सर्व जाती धर्म, स्त्री-पुरुष यांना समान न्याय या विचाराने चालणाऱ्या व्यक्ती आहात. आपणच आम्हाला सांगितले की, स्त्री-पुरुष असा भेद न मानणे योग्य आहे. असे असताना आपण काल रोजी केवळ महिलांकरिताच नाश्त्याची व्यवस्था केली होती.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्दयाची नोंद घेतलेली आहे. चितळेंची बाकरवाडी आणि इतर मिठाई आणण्याची व्यवस्था केली जाईल.

----------

असुधारित प्रत

**पृ. शी**. : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे

**मु. शी**. : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ.परिणय फुके, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील, प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री.अभिजित वंजारी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, काल रोजी सभागृहात नियम २६० अन्वये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो कायदा व सुव्यवस्थेविषयीचा प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपल्या या शासनाबद्दल कायदा व सुव्यवस्थेबाबतचे त्यांचे मत विविध दाखल्यांसकट व्यक्त केलेले आहे. त्यावर मी बोलण्याकरिता मी आज उभा आहे. सर्वप्रथम सभापती महोदया, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो.

असुधारित प्रत

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली नाही,असे सांगितलेले आहे. रोज राज्यात विविध प्रकारचे गुन्हे घडत असतात. बलात्कार, दरोडखोरी, चोरी, खून, ॲब्डक्शन, असे व तत्सम विविध प्रकारचे गुन्हे या राज्यात मोठया प्रमाणावर घडत आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्था या राज्यात मुळीच अस्तित्त्वात नाही, असे वक्तव्य त्यांनी केलेले आहे. प्रत्येक वेळी याबाबत वक्तव्य करताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा देखील उल्लेख केलेला आहे. या शासनाच्या वतीने ज्या काही चुका होतात, तो छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान आहे. ही गोष्ट खरी आहे की, या ठिकाणी आदर्शव्रत राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्शावर तुम्ही-आम्ही सर्व जण राज्य करण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु त्या ठिकाणी ज्या चुका आहेत, त्या विशिष्ट लोकांच्या पथ्यावर पाडण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष नेते यांनी आपल्या भाषणातून केलेला आहे, त्याचा मी निषेध करीत आहे.

सभापती महोदया, मला आणखी एका गोष्टीची आठवण माननीय विरोधी पक्ष नेते यांना करुन द्यायची आहे. दिल्लीतील भाजपचे नेते जय भगवान गोयल यांनी महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासमवेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तुलना करणारे "आज के शिवाजी नरेंद्र मोदी" या पुस्तकाचे ११ जानेवारी,२०२० रोजी भाजपच्या कार्यालयात प्रकाशन केले. या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर संपूर्ण देशातून भाजपवर टीकेची झोड उठलेली आहे. एवढेच नव्हे तर प्रत्यक्षात शिवाजी महाराजांचे वंशज आणि राज्यसभेचे खासदार छत्रपती संभाजी राजे यांनी देखील त्या पुस्तकावर बंदी घालण्यात यावी, अशा प्रकारची मागणी केलेली आहे. म्हणून केवळ महाराजांचे नाव घेताना आपल्या ज्या चुका आहेत, त्या देखील आपण लक्षात घेतल्या पाहिजेत.

सभापती महोदया, या ठिकाणी विविध प्रकारच्या गुन्हयांचा आलेख देतांना त्यांनी अनेक दाखल्यांचा उल्लेख केलेला आहे. परंतु या ठिकाणी नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो, मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स यांच्या माध्यमातून जो क्राईमचा रेट

श्री.अभिजित वंजारी......

आहे, तो मला येथे मांडावासा वाटत आहे. आपल्या देशातील २०१७,२०१८,२०१९ या तीन वर्षांमध्ये राज्यात व देशात भाजपची सत्ता होती. परंतु या काळातील आयपीसी अंतर्गत गुन्हयांचा दर पाहिला तर २०१७ ते २०१९ या कालावधीत आपल्या देशात उत्तर प्रदेशात सर्वाधिक गुन्हयांचा नोंद झालेली आहे. यामध्ये दुसरा क्रमांक महाराष्ट्र राज्याचा आलेला आहे. "लोका सांगे ब्रम्हज्ञान आणि आपण कोरडे पाषाण" अशा पध्दतीचे वक्तव्य माननीय विरोधी पक्ष नेते यांनी केलेले आहे, त्याचा मी निषेध करीत आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्रात २०१७-२०१९ या कालावधीत २,८८,८७९ इतक्या आयपीसी अंतर्गत नोंदविलेल्या गुन्हयांची संख्या आहे. एसएलएल कायद्यांतर्गत क्राईमची नोंद ज्याला म्हणतो, त्याचा देखील मला उल्लेख करायचा आहे. उत्तर प्रदेशमध्ये एसएलएल कायद्यांतर्गत २,८९,९९८, तामिळनाडू या राज्यात एसएलएल कायद्यांतर्गत २,४२,०४० इतक्या गुन्हयांची नोंद झालेली आहे. गुजराथचे मॉडेल म्हणून या देशात प्रसिध्द करण्याचा प्रयत्न झालेला आहे, त्या गुजराथमध्ये देखील एसएलएल कायद्यांतर्गत २,०६,०२४ इतक्या गुन्हयांची नोंद झालेली आहे. महाराष्ट्र राज्यात एसएलएल कायद्यांतर्गत १,७८,८१४ गुन्हे दाखल झालेले आहेत. मध्यप्रदेश हे राज्य देखील याबाबत आपल्या राज्याच्या खालोखाल आहे. या राज्यामध्ये गुन्हे नाही असे आमचे म्हणणे नाही. परंतु ज्या पध्दतीने महाविकास आघाडीचे सरकार नोव्हेंबर,२०१९ मध्ये अस्तित्त्वात आले, त्यानंतर या ठिकाणी या राज्यात या महाविकास आघाडी सरकारने अत्यंत चांगल्या पध्दतीने लॉ ॲण्ड ऑर्डरची परिस्थिती सांभाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. महिलांची सुरक्षितता असेल, मागासवर्गीयांचे प्रश्न असतील, आदिवासींची सुरक्षा असेल, त्यांच्यावर गुन्हे असतील, या सर्व गुन्हयांवर कशा पध्दतीने प्रतिबंध लावायचा, याचा प्रयत्न हा महाविकास आघाडी सरकारने केलेला आहे. मला असे सांगायचे आहे की, अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचाराच्या घटना २०१५-२०१९ या कालावधीत १९ टक्क्यांनी वाढल्याची नॅशनल क्राईम रिपोर्ट ब्युरोची आकडेवारी आहे. २०१९

श्री.अभिजित वंजारी.....

मध्ये ४५,९३५ गुन्हे अनुसूचित जातींवरील अत्याचाराबाबत नोंद झालेले आहेत. सन २०१५ मध्ये अशा प्रकारच्या घटना या ३० टक्क्यांवरुन २०१९ मध्ये ४६ टक्क्यांपर्यंत वाढलेले आहे. यावरुन आपल्या राज्यात सन २०१४ ते २०१९ या कालावधीत कशा पध्दतीचे प्रशासन, कायदा व सुव्यवस्था होती, हे यावरुन सर्वांच्या लक्षात येईल. उत्तर प्रदेश आणि राजस्थान नंतर मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात अनुसूचित जातींवर सर्वाधिक अत्याचार असल्याचे नॅशनल क्राईम रिपोर्ट ब्युरोची आकडेवारी सांगत आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जातींवरील १९३२ गुन्हे दाखल झालेले आहेत. महाराष्ट्र राज्याचे क्राईम स्टेटिस्टिक्स पाहिले तर याच्यामध्ये एचबीटी, थेफ्ट, चीटिंग, रायट्स, मॉलेस्टेशन्सचे गुन्हे, किडनॅपिंग, ॲब्डक्शन्स, आयपीसी अंतर्गतचे इतर गुन्हे असतील या सर्व गुन्हयांच्या बाबत २०१५-२०१६, २०१७,२०१८,२०१९ च्या तुलनेत सन २०२० मध्ये सर्वाधिक कमी गुन्हयांची नोंद या सर्व हेडखाली झालेली आहे. ज्यावेळी महाविकास आघाडीचे सरकार या राज्यात अस्तित्त्वात आले, त्यांनी या कायदा व सुव्यवस्थेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचे प्रशासन चालविण्याचा मनोमन प्रयत्न केलेला आहे. सन २०१७ मध्ये ४.६८ लाख दखलपात्र गुन्हे दाखल झालेले आहेत. सन २०१६ च्या तुलनेत ८.३६ लाख दखलपात्र गुन्हे दाखल झालेले आहेत. यामध्ये ५६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. २०१७ या वर्षात आयपीसीच्या कलमांखाली २.८९ लाख आणि विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे एसएलएल अंतर्गत १.७९ लाख गुन्हे दाखल झालेले आहेत. दर तीन मिनिटाला २.६७ दखलपात्र गुन्हे २०१७ मध्ये दाखल झाल्याची नोंद आहे. आयपीसी अंतर्गत सरासरी एक गुन्हा प्रती दोन मिनिटास घडतो, अशी नोंद झालेली आहे. विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे सरासरी एक गुन्हा प्रती तीन मिनिटास याप्रमाणे दाखल झालेला आहे. राज्याचे गुन्हयाचे आयपीसी अंतर्गत दाखल झालेल्या प्रमाण २३६.८० इतके आहे. सर्वाधिक प्रमाण नागपूर शहरात ४०५.६० इतके आहे. १,००,००० लोकसंख्या असेल तर त्याचा सरासरी गुन्हा हा इतका आहे. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री ज्यावेळी होते, त्यावेळी त्यांच्याकडे गृह खाते होते. ते नागपूरचे आहेत.

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी.......

मी देखील नागपूरचाच आहे. परंतु सन २०१७ मध्ये दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, सर्वच्या सर्व वर्तमानपत्रामध्ये आणि इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये सातत्याने नागपूरचा उल्लेख क्राईम कॅपिटल अशा पध्दतीने करण्यात आला होता. याचा विसर विरोधी पक्ष नेत्यांना पडला आहे, असे मला वाटत आहे.

सभापती महोदय, सन २०१७ मध्ये स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्हयांमध्ये २.३१ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे गुन्हे हे त्या काळात दाखल झालेले आहेत.

यानंतर श्री.सोनावणे....

असुधारित प्रत

अभिजित वंजारी........

१८ वर्षापूर्वीच्या बालिकांवरील बलात्कारामध्ये सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये २.७९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. स्त्रीयांवरील अत्याचाराच्या प्रमाणामध्ये ९३.६ टक्के गुन्हे विविध माननीय न्यायालयात प्रलंबित आहेत. अनुसूचित जातीच्या अत्याचारांवरील गुन्ह्यामध्ये सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये ३.६० टक्क्यांनी घट झालेली आहे. परंतु, अनुसूचित जमातीच्या अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये १५.४ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. प्रत्येक क्षेत्रातील प्रत्येक घटकांवर अन्याय आणि अत्याचारांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. सन २०१७ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण जखमी पोलिसांपैकी ३८.९६ टक्के पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यांमध्ये जखमी झालेले आहेत. राज्यात आत्महत्या करणाऱ्या लोकांची संख्या वाढलेली आहे. सन २०१७ मध्ये संगणक सायबर गुन्ह्यांमध्ये ५१.४२ टक्क्यांनी गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी गुन्ह्यांची नोंद घेतली आहे. याचे कारण त्यांनी बेरोजगारी असे सांगितलेले आहे. सरकारच्या डायरेक्टरेट ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड स्टॅटिस्टीक प्लानिंग डिपार्टमेंट गर्व्हन्मेंट ऑफ महाराष्ट्राच्यावतीने इकॉनॉमिक सर्व्हे करण्यात आलेला आहे. या सर्व्हेनुसार सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत सरकारमध्ये किती पदे रिक्त होती त्याचा उल्लेख केलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पोलीस भरतीवर जोर दिलेला आहे. सन २०१४ ते सन २०१९ या कालावधी भारतीय जनता पार्टीचे राज्यात आणि केंद्रात सत्ता होती. तेव्हा गृह विभागात १५ टक्के जागा रिक्त होत्या. त्यामुळे ३७ हजार ६८२ महसूल आणि वन विभागात १३ हजार ८४ टक्के १६ टक्के, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुग्धव्यवसाय विभाग आणि मत्स्यव्यवसाय विभाग अशा विविध विभागांमध्ये अनेक जागा रिक्त होत्या. जागा भरलेल्या नसल्यामुळे एक प्रकारे सुशिक्षित बेरोजगार तरुणांवर अन्याय झालेला आहे. शासनाने रोजगाराच्या संदर्भात कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. अपराधाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा दैनंदिन कार्यपध्दतीत समावेश केल्यामुळे पोलिसांची कार्यक्षमता

अभिजित वंजारी........

वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्यात अपराधाचे प्रमाण ६२ टक्के इतके असून, यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. राज्यात सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान दिले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा राबविण्यावर भर दिला जात आहे. पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी आणि त्यामाध्यमातून हेल्पलाईन, वेबसाईट आणि ॲप्सच्या माध्यमातून राज्यतील गुन्हेगारीच्या प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासन अत्यंत सक्षम आहे. बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणे तसेच महिलांवरील अत्याचारांचे गुन्हे त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात तब्बल १३८ विशेष जलदगती माननीय न्यायालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. १०८ विशेष जलदगती माननीय न्यायालय व ३० पोक्सो कायद्यांतर्गत खटला चालविण्यासाठी १२ विशेष जलदगती माननीय न्यायालय व २० पोक्सो कायद्यांतर्गत खटले चालविण्यासाठी माननीय न्यायालये सुरु केलेली आहेत. विशेष तपास पथके नेमण्यात आलेली आहेत. महिलांवरील अत्याचार असेल विशेषत: बलात्कार, हुंडाबळी, अपहरण, अनैतिक व्यापार आणि घरगुती हिंसाचार, डोमॅस्टिक व्हायलन्सच्या बाबतीत राज्यात विशेष तपास पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. या तपास पथकाचे काम राज्यात प्रभावी पध्दतीने सुरु आहे. गृह विभागाने ऑपरेशन मुस्कान नावाची एक योजना सुरु केलेली आहे. त्या माध्यमातून राज्यातील हरविलेला बालकांचा व महिलांचा शोध घेण्यासाठी सर्व पोलीस स्टेशनमध्ये नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. दोन वर्षात तीन मुस्कार ऑपरेशन राबवून मिसिंग रेकॉर्डवरील ३१७३ व मिसिंग रेकॉर्ड व्यतिरिक्त ३५५८ मुले व मुली आढळून आलेल्या आहेत. मुस्कान योजनेमुळे ६७३१ बालके कुटुंबात परतलेली आहेत. पोलीस दलासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. पोलीस दलातील १२ हजार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. नक्षलवाद्यांविरोधात लढण्यासाठी आपल्याला यश मिळाले आहे. मुंबई शहराचे आंततराष्ट्रीय पातळीवरील महत्व लक्षात घेता एनएसजीच्या धर्तीवर कार्यान्वित

असुधारित

अभिजित वंजारी........

करण्यात आलेल्या फोर्स-वन पथकला सुसज्ज उपकरणे आणि अद्ययावत प्रशिक्षण देण्यात आलेली आहेत. सागरी सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आधुनिक बोटी, साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे मुंबई शहरातील नागरिकांची काळजी घेण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. मुंबई शहरात इतर राज्यातून लोक आणि पर्यटक येतात. अशा लोकांची काळजी घेण्याचे काम पोलीस दलाच्यामाध्यमातून फोर्स-वनच्यावतीने घेण्यात आलेले आहे. पोलिसांच्या कुटुंबीयांकरिता पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्यामाध्यमातून १ लाख घरे बांधावयाचे नियोजन केलेले आहे. महिला व बाल विकास विभागाच्यावतीने अनाथांना आरक्षण, महिला धोरण, नोकरदार महिलांसाठी सुरक्षित निवारा देण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेला आहे. नोकरदार महिलांना अधिक सुरक्षा कशी देता येईल याचा देखील विचार करण्यात आलेला आहे. महाविकास आघारी सरकारने गेल्या दोन वर्षाच्या कार्यकाळात गृह विभाग किंवा इतर विभागामध्ये ॲचिव्हमेंट केलेले असून, ते वाखाणण्याजोगे आहे. माननीय विरोधी पक्षाने म.वि.न. नियम २६० अन्वये प्रस्तावात सरकारवर टीका केलेली आहे त्याचा निषेध करतो. धन्यवाद.

------

असुधारित प्रत

श्री. विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, सदरहू प्रस्तावात कायदा व सुव्यवस्था, मुंबईवर झालेले बॉम्बस्फोट, छत्रपती शिवाजी महाराज, महिलांवरील अन्याय अत्याचार, पुजा चव्हाण यांना न्याय मिळाला नाही, मागावर्गीयांवर होणारे हल्ले, मराठा आरक्षण, मुस्लीम समाजाला आरक्षण देणे, ओबीसी समाजाला आरक्षण देणे असे विविध सामाजिक विषयांचा अंतभार्व केलेला आहे.

सभापती महोदया, राज्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे. याचा आपण सर्वजण अनुभव घेत आहोत. राज्याचा पोलीस दलाचा लौकिक हा राज्यातच नव्हे तर देशात आणि जगातसुध्दा हाताच्या बोटावर मोजण्याएवढा आपला क्रमांक लागत होता. हा क्रमांक सरकारच्या कर्तुत्वामुळे दिवसेंदिवस ढासळत चालला आहे. आज पोलीसांचा नंबरच लागत नाही. पोलिसांवर लोकांचा विश्वास राहिला नाही. सरकारवर तर नाहीच नाही. राज्यातील जनता ही सुखाने जगते, वागते, वावरत आहे. पोलीस विभागात चांगली कामे करणारे अधिकारी आहेत. कर्तव्याला जागणारी आहे आणि महाराष्ट्राशी इमान राखणारी आहेत.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.....

राज्यकर्त्यांनी महाराष्ट्राबरोबर बेईमानी केली तरी पोलीस दलात काही चांगले अधिकारी/कर्मचारी आहेत की त्यांच्यामुळे राज्यातील पोलीस विभाग आणि कायदा व सुव्यवस्था टिकून आहे. पोलीस दलातील अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामाची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपती पदक पुरस्कार मिळाले, वेगवेगळ्या पद्धतीने त्यांचा गौरव केला गेला त्या सर्व पुरस्कारप्राप्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मी सुरुवातीलाच मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांचा आदर्श पोलीस दलातील इतरही अधिकारी/कर्मचाऱ्यांनी घ्यावा, अशी सदिच्छा आणि अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदया, मुंबईमध्ये विविध ठिकाणी तसेच रेल्वेमध्ये १९९३ पासून ते २००८ पर्यंत बॉम्बस्फोट झाले. हे बॉम्बस्फोट कोणी घडविले, कसे घडविले, कशामुळे घडविले हे केवळ आपल्यालाच नव्हे तर संपूर्ण जगाला माहीत आहे. पाकीस्तानमध्ये बसून दाऊदने या सर्व गोष्टी घडवून आणल्या हे आपल्या सर्वांना माहीत आहे. परंतु हे सर्व होत असताना मला आश्चर्य या गोष्टीचे वाटते की, दाऊदच्या सहकाऱ्यांबरोबर व्यवहार करण्याचे काम करणारे किंबहुना एकप्रकारे त्यांना मदत करणारे लोक मंत्रिमंडळात असतील तर ते कदापि योग्य नाही. मंत्रिमंडळातील एक मंत्री पोलीस कोठडीत असताना त्यांचा राजीनामा घेतला जात नसेल तर हे राज्य सरकार कोणाचे संरक्षण करते याचा सर्व महाराष्ट्रवासीयांनी आणि देशवासीयांनी विचार करण्याची गरज आहे. हे सरकार त्यांचे संरक्षणच करीत नाही तर या सरकारने एक सर्वात मोठा कहर केला. राष्ट्रपिता महात्मा गांधींजी यांनी आयुष्यभर अहिंसेच्या विचाराने लढा दिला. त्यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा देऊन त्यांना भारतातून हाकलले आणि आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्यावर जेव्हा गोळया झाडण्यात आल्या त्यावेळी सुद्धा त्यांनी 'हे राम' उच्चारत प्राण सोडला. मुंबई व महाराष्ट्रात बॉम्बस्फोट घडविणाऱ्या व्यक्तीच्या सहकाऱ्याला मदत करणाऱ्या राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या बचावासाठी राज्यातील मंत्री राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुतळयाजवळ जाऊन बसले. यासारखी निषेधार्ह आणि शरमेची बाब

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.....

या राज्यात दुसरी असू शकत नाही. या सरकारला जनाची नाही तर मनाची लाज वाटावयास पाहिजे होती. जो सर्वसामान्य माणूस आहे, ज्याला देशभक्ती आहे, ज्याला राष्ट्रभक्ती आहे, ज्याला देशाबद्दल प्रेम आहे, अभिमान आहे, मान आहे, सन्मान आहे असा एकही माणूस..... मी सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसून "वाह वाह' बोलता कामा नये. आपण कोणाची बाजू घेत आहोत याची थोडी तरी लाज वाटू द्यावी. ज्याने देशद्रोह केला त्याला मदत करणाऱ्याची बाजू सरकारकडून घेतली जात आहे. ज्या राष्ट्रपित्यांनी आयुष्यात कधी कोणाच्या बाबतीत वाईट शब्द उच्चारला नाही अशा व्यक्तीच्या साक्षीने आपण जे आंदोलन करता ते शेमफूल आहे. अशा प्रकारचे सरकार या राज्यात आहे ते या महाराष्ट्राचे दुदैवं आहे. आपण अजून अशा पद्धतीची वर्तणूक किती दिवस करणार आहात ? याचे पाप तुम्हाला महाराष्ट्रवासीय आणि देशवासीय नक्की फेडायला लावतील या बद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही.

सभापती महोदया, या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस दलाबाबत अनेक गोष्टी बोलण्यासाख्या आहेत. परंतु मी त्यावर जास्त बोलणार नाही. मला हे समजत नाही की, राज्य सरकारकडून ऊठसूठ केंद्रीय यंत्रणांना दोष का दिला जातो. वास्तविक पाहता महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित असेल आणि या राज्यातील तपास यंत्रणा सक्षम असेल, कर्तव्यात कसूर करणारी नसेल तर केंद्रीय यंत्रणांना राज्यात हस्तक्षेप करण्याची किंवा लक्ष घालण्याची काही गरजच पडणार नाही. सभापती महोदया, उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, राज्याचा अंमली पदार्थ विरोधी विभाग काय करीत आहे ? केवळ हफ्ता वसुली करीत आहे. मुंबई व आजूबाजूच्या शहरात अंमली पदार्थांचा हैदोस सुरु आहे. वाट्टेल ती माणसे अंमली पदार्थाचे रॅकेट चालवित आहेत. अंमली पदार्थाची वाहतूक करीत आहेत, त्याचा सर्रास पुरवठा करीत आहेत. मंत्री महोदय, आपण डोळे झाकून गप्प बसत आहात. मांजरीला वाटते की, आपण डोळे झाकून दूध पिले तर जग आपल्याला बघत नाही. मंत्री

श्री.विनायक मेटे.....

महोदय, राज्य सरकारच्या कारभाराकडे महाराष्ट्र बघतो आहे, जग बघत आहे. राज्यात अंमली पदार्थाचे प्रमाण वाढले आहे, त्याचे उद्योग वाढले आहेत, अवैध धंदे वाढले आहेत. राज्य सरकारला हे अवैध धंदे करणारे कोणीही सापडत नाहीत. परंतु केंद्रीय यंत्रणेला मात्र सर्वजण सापडतात. हे कशाचे गौडबंगाल आहे ?

सभापती महोदया, जेव्हा राज्य सरकारचे अपयश समोर येत चालले, जेव्हा सरकारचा नाकर्तेपणा समोर येत चालला तेव्हा राज्य सरकारने केंद्रीय यंत्रणांवर आरोप करणे सुरु केले. त्या माध्यमातून कोणाच्या खाजगी गोष्टी उकरुन काढण्यास सुरुवात केली. नाचता येईना अंगण वाकडे, या पद्धतीचे काम राज्य सरकारमधील आणि राज्य सरकारच्या यंत्रणेतील लोक करीत आहेत. राज्यातील एका मंत्र्याला केंद्रीय तपास यंत्रणेने अटक केल्यानंतर, राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्याला अटक करण्यात आली असे वारंवार सांगितले गेले. परंतु कोण कुठल्या *** प्रकरणी केंद्रीय मंत्री महोदयांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये बोलल्यानंतर राज्य सरकारमधील लोकांना इतके विजेचे शॉक बसले की, केंद्रीय मंत्री आणि विद्यमान आमदारांना पोलीस स्टेशनमध्ये आठ-आठ, नऊ-नऊ तास बसवून ठेवण्यात आले. ही कसली माणुसकी आहे, ही कसली सूडबुद्धी आहे, हे कसले राजकारण आहे ? मी तर म्हणेन की, आपण महाराष्ट्रात गलिच्छ राजकारण निर्माण करीत आहात.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्या निदर्शनास आणून देते की, आपण कालच जागतिक महिला दिन साजरा केला आहे. आपण भाषण करताना एका महिलेचे नाव घेतले. ती महिला आरोपी नाही. ती पीडित जरी असली तरी कायद्याने पीडित महिलेचे नाव रेकॉर्डवर घेऊ शकत नाही. तसेच दुसरी बाब अशी की, त्या मुलीच्या पालकांनी वारंवार सांगितले आहे की, अशा वक्तव्यांमुळे आमच्या मुलीची बदनामी होते. मला वाटते सन्माननीय सदस्यांना असा नामोल्लेख करता कामा नये. सन्माननीय सदस्यांनी जो नामोल्लेख केला आहे तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येत आहे.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे : ठीक आहे. मी नाव न घेता महिला असा उल्लेख करतो. जी महिला आज हयात नाही त्या महिलेबद्दल एक केंद्रीय मंत्री महोदय प्रेस कॉन्फरन्समध्ये बोलल्यानंतर राज्य सरकारला लाल मिरच्या झोंबून इतके ठसके लागले की, एका केंद्रीय मंत्र्यांना चौकशीच्या नावाखाली नऊ-नऊ तास वेठीस धरले. आपण त्यांची काय अशी चौकशी करीत होता ? या सरकारच्या अंगात, रक्ताच्या प्रत्येक थेंबात किती सूडबुद्धी भिनली आहे हे यावरुन दिसून येते. प्रेस कॉन्फरन्समध्ये बोलल्यानंतर एखाद्या केंद्रीय मंत्री महोदयांना असे वागविले जात असेल तर, सत्ताधारी पक्षाचे एकूण एक प्रवक्ता त्यांच्या वक्तव्याबद्दल जेलमध्ये गेल्याशिवाय राहणार नाहीत. तुम्ही फक्त तुमच्या लोकांच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये कोण किती मुक्ताफळे उधळतात, काय बोलतात, काय आरोप करतात आणि नंतर कशाप्रकारे हात वर करतात याची चौकशी करण्याचे काम तुमच्याच पोलिसांना द्या. त्यानंतर दूध का दूध और पानी का पानी, होईल. तुमच्या किती तरी लोकांना आतमध्ये जाऊन बसावे लागेल. माननीय मंत्री श्री.भुमरे साहेब, उद्या वेळ पडली तर तुमच्यासारख्या चांगल्या व्यक्तीला मंत्रिमंडळाच्या बैठकीप्रकरणी जेलमध्ये जावे लागेल. अशा पद्धतीने वागायचे म्हटले तर फार मोठी लाईन लागू शकते. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे साहेब, आपले काय म्हणणे आहे ? यामध्ये आपले नाव नाही, आण मंत्री नाहीत आणि आपला मंत्रिमंडळात लवकर काही नंबरही लागणार नाही. सभापती महोदया, राज्य सरकार जे काही करीत आहे त्याबद्दलच आम्ही बोलत आहोत. मी सांगू इच्छितो की, सध्या राज्य सरकार जे वागत आहे ती महाराष्ट्राची संस्कृती नाही, महाराष्ट्राची परंपरा नाही. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांच्यापासून ते वसंतदादा पाटील यांच्यापर्यंत जी परंपरा या महाराष्ट्राला घालून दिलेली आहे ती ही परंपरा नाही.

नंतर श्री.कांबळे.....

अस्वाक्षरित प्रत

श्री. विनायक मेटे ....

तुम्ही महाराष्ट्राला नवीन परंपरा घालून दिली आहे. जे पेरले तेच उगवत असते हे देखील तुम्ही लक्षात ठेवावे. कसेही, काहीही वागायचे, म्हणेल तो न्याय, म्हणेल तो कायदा आणि तसा वळवायचा असे चालत नसते. मला पुन्हा एकदा बोलावे लागत आहे की, स्व. पुजा चव्हाण यांना आत्महत्या करावी लागली. का, कशामुळे, कोणामुळे करावी लागली याचा तपास आहे का ? सर्वांनी ओरडून सांगितले. तुम्ही अजुनही एफआयआर देऊ शकत नाही, घेऊ शकला नाहीत, करु दिला नाही. तुम्ही न्यायाच्या, कायद्याच्या गोष्टी करता. हा तुमच्यावर अन्याय नाही का ? बंजारा समाजातील एका सर्वसामान्य मुलीचे, उदयोन्मुख मुलीचे आयुष्य असे संपविण्याचे काम लोकांनी केले आणि त्याबाबत कोणी बोलत नाही, का तर, ते तुमचे सहकारी आहेत म्हणून असे का, तुमच्या सोबत राहतात, उठतात, बसतात, खातात, पितात म्हणून असे आहे का, त्यामुळे तुम्ही त्यांना पाठीशी घालता ? कोण मुलगी, काय महिला दिन याचे मात्र तुम्हाला काही पडलेले नाही. नुसत्या गप्पा मारणे हे वेगळे आहे. सर्वसामान्य माणसावर अन्याय करणे असे सगळे चालले आहे. येथे बोलण्यासारखे अनेक पुरावे, गोष्टी आहेत. मी या सर्व गोष्टींवर काही जास्त बोलत नाही.

सभापती महोदया, सायबर क्राईम खूप वाढला आहे. आज महाराष्ट्र सायबर क्राईममध्ये अव्वल नंबरवर आहे. मात्र काहीही लक्ष नाही. कारण पोलीस यंत्रणा दुसरीकडे गुंतवलेली आहे. वेचून नावे आहेत. काल विधानसभेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी कोण हिट लिस्टवर आहेत ते वाचून दाखविले. ही तुमची हिट लिस्ट आहे का, हे सुडबुध्दीचे राजकरण आहे का ? मी त्याबाबत फार बोलत नाही. ते सर्व गोष्टी बोलण्यास व सांगण्यास सक्षम आहेत. सुडबुध्दीने राजकारण करणे, समाजकारण करणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. आपण त्यातून बाहेर यावे, पुढे यावे. महाराष्ट्राची परंपरा सुदैवाने, नशिबाने,

असुधारित प्रत

श्री. विनायक मेटे ....

योगायोगाने चांगली चालली आहे. असंगाशी संग करुन तुम्हाला हे सरकार मिळाले आहे, खुर्ची मिळाली, ती चांगल्या कामासाठी वापरावी, वाईट कामासाठी वापरु नका. एवढेच माझे कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलणे आहे.

सभापती महोदया, मी एसटी कामगारांबाबत बोलत नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री. सदाभाऊ खोत व गोपिचंद पडळकर बोलतील. आपण एसटी कामगारांकडे आता तरी लक्ष द्यावे. तुम्ही त्यांना थापा मारु नका. सन्माननीय सदस्य सर्वश्री. सदाभाऊ खोत व गोपिचंद पडळकर नेतृत्व करीत आहेत. आपण त्यांच्याशी प्रामाणिकपणे बोलावे. एसटी कामगारांचे संसार चालू द्यावेत. अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. आपण अजून किती जण आत्महत्या करण्याची वाट पाहत आहात तेवढे तरी सांगावे म्हणजे त्यांना त्या पध्दतीने पुढे त्याची डागडुजी करता येईल, त्यांना समजून सांगता येईल की, कोणी आत्महत्या करु नका. ते त्यांना सांगत आहेतच. त्या विषयावर ते जास्त बोलतील.

सभापती महोदया, ओबीसी, मराठा, मुस्लिम आरक्षणाचा विषय आहे. हे विषय अत्यंत महत्त्वाचे आहेत. आपण ओबीसी आरक्षणाबाबतचे विधेयक परवा संमत केले आहे. माझ्याकडे त्या संदर्भातील सर्व फाईल आहेत, न्यायालयाचे निकाल आहेत. मी त्या दिवशी बोलण्याचा प्रयत्न केला आणि सांगितले की, माझा ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाला विरोध नाही आणि असण्याचे काही कारण नाही. माझा अजिबात विरोध नाही. पण तुम्ही सरकार म्हणून हे विधेयक आणून जसे सभागृहाला फसविण्याचे काम करीत आहात तसे राज्यातील ओबीसी समाजाला देखील फसविण्याचे काम करीत आहात. तुम्ही निवडणूक आयोगाचे अधिकार काढून घेतले आहेत. पण ते कायद्यात बसणारे आहे का, ते टिकणारे आहे का याचा विचार तुम्ही केलेला नाही. हे टिकू शकत नाही. कारण हे सर्व कायद्याच्या विरोधात आहे. निवडणूक आयोग ही जर स्वतंत्र बॉडी आहेततर त्याच्या विरोधात तुम्हाला काही करण्याचा अधिकार नाही. पण तुम्ही त्यांचे सर्व अधिकार काढून घेण्याचे काम

असुधारित प्रत

श्री. विनायक मेटे ....

केले आहे आणि मन मानेल तसे करण्याचे ठरविले आहे. हे न्यायालयात कसे टिकेल एवढेच पहावे. मी काल देखील या संदर्भात बोललो होतो. तुम्ही चुकीच्या गोष्टी करीत आहात तर ते टिकेल असे तरी पहावे. तुम्ही तेही पाहणार नाही. कारण तुम्हाला त्याचे काही देणेघेणे नाही. मागच्या निवडणुका झाल्या, त्या बिनधास्तपणे पार पाडल्या. ओबीसीच्या नावाने जेवढे येथे बोलत आहेत, त्यांना मी विचारतो की, तुम्ही काय केले, आता नगरपालिका, नगरपंचायती यांच्या निवडणुका झाल्या, त्याचे काय केले ? त्या झाल्या. ओबीसी समाजाचे त्यामध्ये कोणी होते का ? नव्हते. मग कोणत्या तोंडाने तुम्ही म्हणत आहात की, आम्हाला ओबीसी समाजाची काळजी आहे आणि ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाची काळजी आहे. आपण आता बोलावे. तुम्ही काय केले ? उद्या देखील हेच होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात जेव्हा तोंडघशी पडाल, तेव्हा फक्त तुम्ही म्हणणार की, न्यायालयानेच केले, आता आम्ही काय करणार, आमच्या हातात आता काय आहे ? मग उठसूट केंद्र सरकारवर ढकलणार की, आता केंद्र सरकारने विशेष कायदा करावा, आता हे त्यांचे काम आहे, आम्ही जेवढे करायचे तेवढे केले आहे. तुमची अशी दिखाऊपणाची कामे बंद करा आणि ओबीसी समाजाला विश्वासात घेऊन खरे काय ते सांगा. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, तुम्ही त्रिसुत्रीची अंमलबजावणी करावी. तुम्ही ती मात्र करीत नाही आणि दुसऱ्या गोष्टी करीत आहात. ओबीसी आरक्षणाचे खरे मारेकरी कोण असेल तर ते तुम्ही आहात. या गोष्टीला २ वर्षे झाले आहेत. तुम्ही २ वर्षांत काहीच केले नाही. २ वर्षांत डेटा मिळू शकत नव्हता का ? आता तुम्ही ३-४ महिन्यांत डेटा मिळवितो असे म्हणत आहात. मग तुम्ही २ वर्षे काय केले ? डेटा २ वर्षांमध्ये आरामशीर मिळू शकला असता. पण तुम्ही ते काम केले नाही. कारण तुमच्या मनामध्ये आबीसी समाजाबद्दल पाप आहे. तुम्हाला फक्त त्यांची मते पाहिजेत. तुम्ही याबाबत काळजी घेण्याचे काम करावे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना सांगू इच्छितो की, तुम्ही त्यांना सांगावे. कारण ते तुमचे ऐकतात.

श्री. विनायक मेटे ....

सभापती महोदया, दुसरी बाब मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत तर पूर्णपणे खेळखंडोबा करुन टाकला आहे. मराठा समाजाला अगोदर १६ टक्के आरक्षंण मिळाले होते, नंतर उच्च न्यायालयाने ते १२ व १३ टक्के शिक्षण व नोकरी यांमध्ये केले, ते देखील हे सरकार वाचवू शकले नाही. नंतर माननीय मुख्यमंत्र्यांसोबत आम्ही बैठका घेतल्या आणि सांगितले की, मराठा आरक्षणाबाबत या गोष्टी करणे अत्यंत गरजेचे आहे. सर्व मान्य केले. माझ्याकडे त्याचे मिनिट्स आहेत. माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण, मुख्य सचिव आणि अनेक माननीय मंत्री यांच्या बैठकींचे मिनिट्स आहेत. प्रत्येक गोष्टीची सहमती आहे. बैठक दिनांक ७.९.२०२१ रोजी झाली. मी त्या अगोदर देखील मे महिन्यामध्ये रद्द झाल्याबरोबर म्हटले होते. ही दुसरी, तिसरी बैठक आहे. मी आपल्याला शेवटच्या बैठकीचे मिनिट्स सांगत आहे. दिनांक ७.९.२०२१ पासून आतापर्यंत यातील एक गोष्टी देखील केली नाही. परवाच्या दिवशी म्हणजे मागच्या आठवड्यामध्ये काही लोक आझाद मैदानामाध्ये उपोषणासाठी बसले होते. तेथे हे मिनिट्समध्ये आहे तेच लिहून दिले. मिनिट्समध्ये जे लिहिले आहे ते जसेच्या तसे दिले आहे. काहीही केलेले नाही. पुंगी वाजविली की, आम्ही पुन्हा एक विशेष राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करु. तुम्हाला विशेश राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा काय अधिकार आहे ? तुम्हाला काहीही अधिकार नाही. कायद्यामध्येच हे नाही. ....(अडथळा).... तुमच्याकडे अधिकार नाही, कायदा नाही, त्या गोष्टी करण्याच्या थापा मारीत आहात. संपूर्ण महाराष्ट्राला, सर्व समाजाला बनविण्याचे काम करीत आहात. बाकी काहीही करीत नाही. ओबीसी समाजासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते की, तुम्ही डेडिकेटेड कमिशन नेमावे. पण डेडिकेटेड कमिशन नेमण्याऐवजी मराठा समाजाला न सांगता त्यांना नेमण्याबाबत सांगत आहात आणि जे ओबीसी समाजासाठी करण्यास सांगितले होते, त्यांना मात्र वाऱ्यावर सोडून देत आहात. आता

श्री. विनायक मेटे ....

बांठीया साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. समिती नाही तर आयोग नेमला पाहिजे, पण तुम्ही तेथे समिती नेमत आहात.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

आपण कोणाला बनवित आहात, सर्व समाजाला फसविण्याचे काम हे सरकार करीत आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावयाचे असेल तर राज्य मागासवर्ग आयोगाकडे हा विषय पुन्हा गेला पाहिजे. त्यांच्याकडे हा विषय गेल्यावर त्यांनी पुन्हा सर्व्हे करुन अहवाल सरकारकडे सादर केला पाहिजे. असे करायचे नाही, वेगवेगळी कारणे दाखवविली जात असून चुकीचे निर्णय घेतले जात आहेत. या राज्यातील सर्व समाजातील लोकांची दिशाभूल केली जात आहे. या राज्यातील मराठा समाजाचे मुले शिकू नयेत, नोकरीला लागू नयेत, मोठी होऊ नयेत, पुढे जाऊ नयेत, हा या सरकारचा कावा व षडयंत्र आहे त्याचा हा परिपाक आहे. त्यामुळे या निमित्ताने मी मागणी करतो की, या प्रस्तावाला मंत्री किंवा राज्यमंत्री महोदयांनी इमानदारीने उत्तर द्यावे. मराठा समाजाचा खतांसारखा उपयोग आतापर्यंत गेल्या अनेक वर्षानुवर्षे सुरु आहे. तो अजूनही तसाच करणार आहात काय असा माझा प्रश्न आहे. आताचा राज्य मागासवर्ग आयोग बरखास्त करावा व नवीन आयोगाची स्थापना करावी किंवा आता जो आयोग आहे त्याला डेडिकेटेड ओबीसीचा दर्जा दिला पाहिजे. मराठा समाजाकरिता अधिकृत राज्य मागासवर्ग आयोग स्थापन केला पाहिजे. ही माझी मागणी आहे हे काम त्यांच्याकडे तातडीने सोपविण्यात यावे व त्यांचा अहवाल लवकरात लवकर यावा यासाठी प्रयत्न करावेत. सदर आयोगाला निधी दिलेला नाही. त्यांना दिलेला निधी परत घेण्यात आलेला आहे. जनावराला चारा द्यायचा नाही आणि त्याला जंगलात सोडून द्यायचे अशा पध्दतीची कामे करणे अत्यंत चुकीचे आहे. आरक्षणाबरोबर ज्या मुख्य सवलती आहेत त्या दिल्या पाहिजेत. कै.आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या नावाने जे महामंडळ आहे. हे महामंडळ स्थापन करण्यासाठी सन १९९६-९७ मध्ये आम्ही काय काय केले हे आमचे आम्हाला माहिती आहे. या महामंडळाच्या माध्यमातून गोरगरीब मुले उद्योग व्यवसायाला लागावेत असा मुख्य उद्देश होता. ज्यांना आरक्षण नाही व जे खुल्या प्रवर्गात आहेत त्यांना सुविधा देण्यासाठी हे महामंडळ आहे. या महामंडळासाठी मागच्यावर्षी १०० कोटी रुपयांची तरतूद केली होती ती रक्कम पूर्ण दिली नाही. आता पुन्हा मैदानावर जाऊन थापा मारतात की, पुढील बजेटमध्ये आणखी १०० कोटी रुपयांची तरतूद करु.

श्री.विनायक मेटे....

हे सरकार किती थापा मारणार व किती खोटे बोलणार व कोणाकोणाशी खोटे बोलणार याचा विचार केला पाहिजे. या समाजाला खरोखर न्याय द्यायचा असेल तर २०,५० व १०० कोटी रुपयांची भीक या महामंडळाला न देता ५०० कोटी रुपये या महामंडळाला दिले पाहिजेत.ज्यांना कर्ज दिले त्याची यादी माझ्याकडे आहे, हे एकमेव महामंडळ असे आहे की, या महामंडळाला स्वत: कर्ज देण्याचे अधिकार नाहीत. या महामंडळाला बँक कर्ज देते, सरकार कर्ज देत नाही. सरकार फक्त त्याचे व्याज भरते. अशी ही सरकारची नाटके आहेत. मुख्यमंत्री महोदयांकडे या महामंडळासाठी अशी मागणी केली होती की, या महामंडळाला ५० हजार रुपये देण्याचे अधिकार द्यावेत हे मान्य करण्यात आले. परंतु आता पुन्हा वेगळेच सांगण्यात आले. त्यामुळे अगोदरचे मुख्यमंत्री खरे की, आता आश्वासन देणारे मुख्यमंत्री खरे आहेत. महामंडळात आता असा प्रकार सुरु झाला आहे की, ज्यांनी अगोदर कर्जे घेतली त्यांनाच पुन्हा कर्जे देण्याचा प्रकार सुरु आहे. अशी ८० टक्के प्रकरणे निदर्शनास येत आहेत. नवीन लोकांना कर्ज देण्याचे प्रमाण फार कमी आहे. यामध्ये लक्ष घालून त्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे.

सभापती महोदया, सारथी संस्थेला अद्याप कर्मचारी देण्यात आले नाहीत. अनेक बैठका झाल्या परंतु पैसे देण्यात आले नाहीत. लोकांना खूश करण्यासाठी विभागीय कार्यालय करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिले कार्यालय कोल्हापूर येथे सुरु केले आहे. अधिवेशन सुरु होण्याअगोदर मी कोल्हापूर येथे जाऊन आलो. हे कार्यालय कोठे आहे ते शोधण्यासाठी मला एक दिवस लागला. राजाराम कॉलेजच्या जवळ एका इमारतीमध्ये ते कार्यालय मला दिसून आले. तेथे तीन खुर्च्या व दोन टेबल होती व दोन कंत्राटी कर्मचारी होते. त्यांना मी विचारले की, तेथे काय कामकाज चालते तर ते म्हणतात की, आमच्याकडे चौकशीसाठी लोक येतात त्यांना आम्ही फक्त माहिती देतो या पलिकडे तेथे कोणतेही कामे सुरु नाहीत. कार्यालय सुरु होऊन तीन ते चार महिने झाले आहेत. अशा पध्दतीने जनतेला मुर्ख बनविण्याचे काम हे सरकार करीत आहे. आपण कोणाला फसवित आहात, जे आहे ते खरे सांगावे. होत

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे...

नसेल तर होत नाही असे सांगा. आम्ही नाकर्ते आहोत हे सांगा, आम्ही ते मान्य करु. सारथी संस्थेला कामे करायची असतील तर विभागीय कार्यालये स्थापन करण्यासाठी या बजेटमध्ये तरतूद केली पाहिजे.

सभापती महोदया, पंजाबराव देशमुख यांच्याबाबत जाहीरपणे आश्वासन देण्यात आले. १ तारखेला गुडीपाडव्याला आम्ही सर्व कार्यालयांची उद्घाटने करु असे आश्वासन दिले. एकाही ठिकाणी कार्यालये सुरु नाहीत तर उद्घाटन कोणाचे करीत आहात. रानात, वनात की समुद्रात जाऊन उद्घाटन करणार आहात ?

सभापती महोदया, फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी मागच्या सरकारने १८०० कोटी रुपये दिले होते. हे सरकार आल्यापासून यांनी फीच्या प्रतिपूर्तीसाठी पाच पैसे देखील दिले नाहीत. इतका मोठा अन्याय करीत आहात तरी हे सरकार नाक वर करुन सांगते की, मराठा समाजाला आम्ही न्याय देऊ. याबाबत उत्तरे देण्यात यावीत नुसते आरोप प्रत्यारोप करु नका. काय खरे आहे ते सांगावे.

सभापती महोदया, नोकर भरतीबाबत तशाच पध्दतीने कार्यवाही सुरु आहे. सभापती महोदया, मी शेवटचा विषय मुस्लीम व धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत मांडणार आहे. धनगर समाजाबाबत सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर हे बोलतील. धनगर समाजाला या सरकारने आरक्षण दिले नाही. मागील सरकारने धनगर समाजासाठी १००० कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. महाविकास आघाडी शासन आल्यावर ते बंद करुन टाकले. त्यानंतर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. काँग्रेस व राष्ट्रवादी पक्ष मुस्लीम समाजाचे नाव घेतल्याशिवाय पाणी पीत नव्हते. हे सरकार आल्यापासून माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई व माननीय मंत्री श्री.संदीपान भुमरे यांच्या भीतीमुळे मुस्लीम मधील 'म' सुध्दा बोलायला ते तयार नाहीत. तुम्हाला असे वाटते की, मुस्लीमांचे नाव घेतले तर सरकारमधून बाहेर पडावे लागेल अशी तुम्हाला भीती वाटते. तुम्हाला मुस्लीम समाजाबाबत काही देणेघेणे नाही. यांना फक्त खुर्चीशी मतलब आहे, मुस्लीम समाजाला आरक्षण का मिळत नाही असे सत्ताधारी बाजूने कोणी तरी विचारणा केली आहे काय ? याबाबत एखादी बैठक

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे...

घेतली आहे काय ? या सरकारने याबाबत काहीही केले नाही. अल्पसंख्यांक मंत्री आता आतमध्ये मस्त आराम करीत आहेत, त्या मंत्री महोदयांनी मुस्लीम आरक्षणाबाबत एक शब्दही उच्चारला नाही किंवा एखादी बैठक घेतली नाही. तरी देखील मुस्लीम समजाचे नाव काढून तुम्हाला प्रमाचे उमाळे फुटतात. हे फक्त पुतना मावशीचे प्रेम आहे. मुस्लीम समाजाबाबत खऱ्या अर्थाने प्रेम असेल तर त्यांना आरक्षण देण्याचे काम करा. ओबीसी, मराठा, धनगर किंवा अन्य समाजाला ज्या सवलती देण्यात येतात त्याच सवलती या समाजाला जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत का देण्यात येत नाहीत. मुस्लीम समाजाला आरक्षण किंवा या सवलती देण्याचे काम या सरकारने करावे. एस.सी.,एस.टी. यानंतर सर्वात जास्त बेकार तरुण मुस्लीम समाजात आहेत. हा अनुभव तुम्हाला येत आहे. आता तुमची अडचण होत आहे हा भाग वेगळा आहे, ही वस्तुस्थिती आहे. मुस्लीम समाजाबाबत खऱ्या अर्थाने प्रेम वाटत असेल तर त्यांच्या मुला-मुलींनी शिकावे, मोठे व्हावे, नोकरीला लागावे यासाठी काही तरी करा. आम्ही काही तरी करतो असे फक्त दाखविण्याचे काम करु नका. इतकेच मी या निमित्ताने सांगतो. या प्रस्तावात जे विषय नमूद केले आहे त्यामुळे राज्यकारभार करायला हे सरकार लायक नाही असे मी म्हणतो व सरकारचा निषेध करुन माझे भाषण संपवितो.

-------

**उप सभापती** : अनेक सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलायचे आहे. त्यामुळे अनेक सन्माननीय सदस्य म्हणतात की, मला अगोदर बोलू द्यावे. आता ती क्रमाने बोलण्यास संधी देते. आता सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी भाषणाला सुरुवात करावी.

असुधारित

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मला काही महत्वाचे मुद्दे मांडायचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे असे बोलले की, निवडणूक आयोगाचा अवमान होत आहे असे होत नाही त्यामुळे रेकॉडवर चुकीचे जाऊ नये. जे विधेयक पास केले त्याबाबत स्टे येईल असे सन्माननीय सदस्य म्हणाले. परंतु तसे होणार नाही. या सभागृहाचे पावित्र व अधिकार लोप पावत आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील .......

आपण सभागृहात कायदे तयार करतो आणि त्या कायद्याप्रमाणे न्यायालयाने व निवडणूक आयोगाने काम करावे, अशी भूमिका आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी केवळ दोन मिनिटेच बोलणार आहे. कारण हा बाऊ होतो. तुम्ही काही तरी रेकॉर्डवर आणत आहात ? आपण जे रेकॉर्डवर आणत आहात ते चुकीचे आहे. आज काय परिस्थिती आहे ? माझ्या सारख्या माणसाला सुद्धा कळत नाही मग सर्व सामान्य लोकांना काय कळणार आहे ? आज काय सुरु आहे ? मी या विषयावर बोलणार नव्हतो. परंतु काही तरी रेकॉर्डवर आणून भविष्यात त्याचे रेफरन्स घेऊन त्या प्रमाणे कामकाज चालते, म्हणून मी बोलत आहे. आता डिलिमिटेशन सुरु आहे. हा महत्वाचा विषय आहे. वॉर्ड रचना करण्यात येत आहे म्हणजे डिलिमिटेशन आहे. विधानसभा व लोकसभेचे मतदारसंघ तयार झाल्याशिवाय निवडणुका घेता येत नाहीत. हा अधिकार आपला आहे. मेजॉरिटी यांची आहे का त्यांची आहे, हे आम्हाला माहिती नाही. जे आहे ते कायद्याप्रमाणे करावे लागेल. अद्याप डिलिमिटेशन पूर्ण झालेले नाही. जोपर्यंत डिलिमिटेशन पूर्ण होत नाही तोपर्यंत निवडणुका घेता येणार नाही. त्यावेळी नगरपंचायतीच्या निवडणुका का झाल्या ? त्यावेळी संपूर्ण वॉर्ड रचना जाहीर झाली होती. आपण हे रेकॉर्डवर आणले पाहिजे. निवडणूक आयोगाची नेमणूक कोण करते ? राज्य शासन निवडणूक आयोगाची नेमणूक करते. परंतु ते तेथे गेल्यानंतर त्यांची भूमिका बदलतात. त्यांना त्यांची भूमिका बदलू द्यावी, आमचे काहीही म्हणणे नाही. आपण जे बोलतो ते रेकॉर्डवर येते. भविष्यात तुम्ही विरोधी पक्षात बसू शकता. आम्ही सत्तेत येणार नाही आणि आम्हाला तशी अपेक्षा सुद्धा नाही. तुम्ही सुद्धा या बाजूला येणार आहात. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे माझे चांगले मित्र आहेत. परंतु या संदर्भात भूमिका घेतली पाहिजे. मी आणखी एक मुद्दा मांडणार आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना विचारु इच्छिते की, आपण हरकतीच्या मुद्यावर बोलत आहात की म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलत आहात ?

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, मी म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलत आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी पाच मिनिटात माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदया, आपण चर्चा केली की, डिलिमिटेशनमध्ये ज्या तरतुदी आहेत त्याप्रमाणे केले पाहिजे. परंतु या निवडणुकीसाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. कारण, नगरपंचायतीच्या निवडणुका बरोबर झालेल्या नाहीत, निवडणुका अर्धवट झाल्या, पुन्हा तेथे गेले, हे काय सुरु आहे ? माझे असे म्हणणे आहे की, कायद्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे.

सभापती महोदया, राज्यात को-ऑपरेटिव्हसाठी वेगळा कायदा आहे. ज्याप्रमाणे निवडणूक आयोग आहे त्याप्रमाणे को-ऑपरेटिव्हसाठी आयोग नेमण्यात आलेला आहे. राज्य शासनाला त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. तेथे कोणतीही गडबड होत नाही. आपण त्यासाठी मुदतवाढ दिली. माननीय सभापती सभागृहात आल्यानंतर मी पुन्हा या विषयावर बोलणार आहे. आपण कोरोना संकटामुळे को-आपरेटिव्हसाठी ६ महिन्यांची मुदतवाढ दिली. मग जिल्हापरिषदेच्या निवडणुकीसाठी सुद्धा मुदतवाढ दिली पाहिजे. आपण मुंबई महानगरपालिका प्रशासकाच्या ताब्यात देत आहात. आपण सर्व महानगरपालिका प्रशासकाच्या ताब्यात देत आहात, हे चुकीचे आहे. तुम्ही कितीही बोलले, कोणाचीही सत्ता आली तरी ते चालणार आहे. आपण ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देत आहात. राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील यंत्रणा २५ लोक चालविणार हे बरोबर नाही, याला काही अर्थच नाही. आपल्याला सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी या विषयावर चर्चा करावी लागेल. ही गंभीर बाब आहे. मुंबई महानगरपालिकेचे ५० हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. केवळ महानगरपालिकेचे आयुक्त कारभार चालवितील, हे बरोबर नाही. मग विधानसभा सुद्धा बरखास्त करावी. राज्यपाल राज्याचा कारभार चालवितील. सभापती महोदया, हे बरोबर नाही. या अधिवेशनात याबाबत विचार झाला पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील .......

सभापती महोदया, आम्ही काल दुपारी गटनेत्यांची बैठक आयोजित केली होती. मी स्वत: ती बैठक आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला होता. आज भारतीय जनता पक्षाचा मोर्चा आहे. त्यामुळे आपण आज सकाळी १०.०० वाता सभागृहाचे कामकाज सुरु केले. आपण सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु करुन म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करु, अशी मी सभापती महोदयांकडे मागणी केली होती. (...अडथळा...) आम्ही सकाळी १०.०० वाजता सभागृहात उपस्थित होतो. ज्यावेळी सभागृहाचे कामकाज सुरु झाले त्यावेळी सुरुवातीला ५ मिनिटे कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते. सभागृहात कॅबिनेट मंत्री नसले तरी कामकाज सुरु करावे, अशी आम्ही विनंती केली. त्यावेळी सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे सभागृहात उपस्थित नव्हते. मी जो विषय मांडला त्या विषयावर आपल्याला हे अधिवेशन संपूण्यापूर्वी चर्चा करावी लागेल. शासनाने पाहिजे तर पुन्हा कायदा करावा. परंतु बरखास्त करण्याचे काम करु नये.

सभापती महोदया, एसटी कामगारांच्या ज्या मागण्या आहेत त्या संदर्भात समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. मी काल याबाबत सभागृहात मागणी केली होती. आज सायंकाळी ५ वाजता बैठक आहे. आपण तडजोड केली पाहिजे. मी सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपिचंद पडळकर व सदाभाऊ खोत यांना सांगू इच्छितो की, मी आज सकाळी काही एसटी कामगारांबरोबर चर्चा केली. प्रत्येक संस्थेचा पगार ठरविण्याची आर्थिक कुवत आपण निर्माण करावयाची आहे. मी आपल्याला एक उदाहरण देतो. मी बँकेचा चेअरमन झालो. परंतु आता हे सर्व बघून नको वाटते. आता मी घाबरत आहे. कारण, कोणतीही भानगड नको. मी सांगू इच्छितो की, माझ्या बँकेत १८०० कर्मचारी होते आणि त्यांना ५०० रुपये पगार होता. परंतु आज माझ्या बँकेतील शिपाई ७० हजार रुपये पगार घेतो, एमडी २ लाख रुपये पगार घेतो आणि मनुष्यबळ केवळ २५० आहे. आपल्याला हे सर्व ठरवावे लागणार आहे. माझ्या बँकेत

असुधारित

श्री.जयंत प्र.पाटील .......

चौकीदार, शिपाई नाहीत. ज्याप्रमाणे संगणकीकरण झाले त्याप्रमाणे आपल्याला बदलावे लागेल. माननीय गृह राज्यमत्री श्री.शंभुराज देसाई यांची बँक चांगली आहे. आपल्याला या विषयावर चर्चा करावी लागणार आहे.

सभापती महोदया, विधानसभेत ओबीसी आरक्षणाबाबतचे विधेयक संमत झाले. ते विधेयक या सभागृहात चर्चेला आल्यानंतर आपल्याला त्यावर बोलण्याची संधी मिळणार आहे. आपले अधिकार आपणच काढून घेण्याचे काम करीत आहोत की काय अशा प्रकारचे रेकॉर्ड होता कामा नये. म्हणून मी स्वत: आग्रह करुन बोलण्यासाठी उभे राहिलो. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना वाईट वाटले असेल तर मी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. परंतु असे होता कामा नये. सभागृहाचे पावित्र्य राखले पाहिजे. हे सर्वोच्च सभागृह आहे. देशातील व राज्यातील जनतेचा या सभागृहाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे आणि त्या दृष्टिकोनातून सभागृहाचे कामकाज होऊन कायदे तयार केले पाहिजेत.

सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित

श्री.गोपिचंद पडळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदया, राज्यात अनागोंदी कारभार सुरु असून राज्यातील मंत्री अनागोंदी कारभार करणाऱ्या लोकांना काही तरी हेतू समोर ठेऊन पाठीशी घालत आहेत. खरे म्हणजे या गोष्टी प्रगतशील महाराष्ट्राला शोभणाऱ्या नाहीत. विधानसभेचे माननीय विरोध पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी काल विधानसभेत जो विषय मांडला तो राज्यातील व देशातील जनतेसमोर आलेला आहे. एक सरकारी वकील आणि राज्याच्या गृह विभागातील वरिष्ठ अधिकारी कशा पद्धतीने विरोधी पक्षातील लोकांना संपविण्याचा कट रचत आहेत, कटकारस्थान करीत आहेत आणि ती कारस्थान कोण करायला लावत आहेत त्यांचे नाव आता उघड झालेले आहे. महाराष्ट्रातील जनतेला ज्यांच्या विषयी कधीही विश्वास नव्हता. ज्यांचा राजकीय जन्म गद्दारीतून झालेला आहे, ज्यांचा राजकीय जन्म पाठीत खंजीर खुपसून झालेला आहे, ज्यांची संपूर्ण राजकीय कारकीर्द रक्तबंबाळ आहे अशी माणस विरोधी पक्षातील नेत्यांना संपविण्याचा प्लॅन आखत आहेत.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित

श्री.गोपिचंद पडळकर.....

अशी माणसे विरोधी पक्षातील नेत्यांना संपविण्यासाठी प्लॅन आखत आहेत. आता राम नाम सत्य होण्याची वेळ आली असताना सुद्धा तसेच त्यांच्यावर अनेक वर्षांपासून गंभीर आरोप केले जात होते. आता त्या आरोपांना सर्टिफिकेट मिळाले आहे. सभापती महोदया, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना संपविणे एवढी सोपी गोष्ट नाही. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१४ ते २०१९ या काळात राज्यामध्ये अनेक कामे केलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या मागे राज्यातील जनतेचा मोठा आशीर्वाद आहे. त्यामुळे या लोकांना कापरे भरले आहे, भीती वाटत आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांचे नाव ऐकल्यानंतर त्यांचा थरकाप उडत आहे. त्यामुळे ते संपले पाहिजे यासाठी जर तुम्ही षडयंत्र रचत असाल तर महाराष्ट्रातील जनता या सर्व गोष्टी आपल्या डोळयाने बघत आहेत. तुमचा राजकीय अजेंडा कशा प्रकारचा आहे ? याची महाराष्ट्रातील जनतेला सर्व माहिती आहे. त्यामुळे तुम्ही अशा प्रकारे पाठीत वार करणार असाल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. कायदा व सुव्यवस्थेच्या विषयासंबंधी सरकार अतिशय खालच्या स्तरावर गेले आहे. महाराष्ट्रातील ज्या अधिकाऱ्यांवर कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी टाकलेली आहे ते अधिकारी कशा प्रकारे चुकीच्या पद्धतीने वागत आहेत याची मी सदनाला काही उदाहरणे देणार आहे.

सभापती महोदया, पुणे जिल्हयातील बारामती शहरातील शिंदे नावाचा पोलीस इन्स्पेक्टर एका तरुणीला घेऊन लॉजवर जातो. त्यानंतर ती तरुणी त्याचे चित्रीकरण करते व ते सोशल मीडियाच्या सर्व साईटवर व्हायरल होते. त्यानंतर तेथील लोकप्रतिनिधी त्या पोलीस इन्स्पेक्टरची दुसरीकडे तडकाफडकी बदली करतात. अशी घटना घडली असल्यास संबधित अधिकाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल का करण्यात आला नाही ? त्यांना कोण पाठीशी घालत आहे व कशासाठी पाठीशी घालत आहे ? याबाबतची माहिती माननीय गृह मंत्र्यांनी महाराष्ट्रातील जनतेला दिली पाहिजे. तसेच त्या अधिकाऱ्याची चूक नव्हती तर त्याची तडकाफडकी बदली का करण्यात आली ? बारामती शहरामध्ये ज्यांचे प्रचंड वर्चस्व आहे. त्या बारामतीमधील ही कहानी आहे. सभापती महोदय, इतकेच नव्हेतर शासकीय कार्यालय असलेल्या तहसीलदार कार्यालयामध्ये क्लार्क पदावर काम करीत असलेली तरुणी तिच्या

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर.....

जागेवर बसून काम करीत होती. त्यावेळी एक अनोळखी व्यक्ती कार्यालयात येऊन त्या तरुणीचे चुंबन घेतो. त्यानंतर ती तरुणी शिव्या देत त्या व्यक्तीच्या पाठीमागे पळत जाते. परंतु तो अनोळखी तरुण तेथून निघून जातो. तपासामध्ये अद्याप ती अनोळखी व्यक्ती सापडली नाही. सदर प्रकरणी त्या अनोळखी व्यक्तीवर अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. ही सर्व घटना सीसीटीव्हीमध्ये नोंद झाली असून सीसीटीव्ही फुटेज आलेले आहे. ते फुटेज सोशल मीडियाच्या सर्व साईटवर व्हायरल झालेले आहे. परंतु त्यावर असे सांगितले जात आहे की, ती अनोळखी व्यक्ती तेथे चोरी करण्यासाठी गेली होती. सदर तरुणी महिला तेथे असुरिक्षत आहे.

सभापती महोदया, आपसामध्ये भांडण झाल्यामुळे एक महिला पोलीस स्टेशनला तक्रार करण्यासाठी गेली होती. पोलीस स्टेशनमध्ये पीएसआय मोहिते नावाचे अधिकारी कार्यरत आहेत. तेथील पीआयने त्यांच्याकडे सदर प्रकरणाचा तपास करण्यास सांगितले होते. त्यावर पीएसआय मोहिते यांनी त्या महिलेचे प्रकरण सामोपचाराने मिटवले व त्या महिलेचा फोन नंबर घेतला. त्या महिलने त्यांना असे सांगितले की, मला एमपीएससी परीक्षेचा अभ्यास करण्याची इच्छा आहे. यावर पीएसआय मोहिते यांनी त्या महिलेला असे सांगितले की, मी तुला एमपीएससीचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन करतो. त्या महिलने आपल्या पतीचा नंबर देण्याऐवजी स्वत:चा फोन नंबर पीएसआय मोहिते यांना दिला होता. त्यानंतर पीएसआय मोहिते यांचे त्या महिलेसमवेत चॅटिंग सुरु झाले. परंतु त्याबाबत त्या महिलेच्या पतीला कोणतीही माहिती नव्हती. त्यानंतर ही बाब तिच्या पतीला समजल्यानंतर त्या महिलेच्या पतीने पोलीस अधीक्षक ग्रामीण पुणे यांच्याकडे लेखी अर्ज दिला. त्यापूर्वी त्या महिलेने आपल्या पतीला असे सांगितले की, मला एमपीएससीचा अभ्यास करण्यासाठी पुण्याला क्लास लावायचा आहे. त्याकरिता मला पुण्याला जायचे आहे. त्या महिलेला दोन मुली आहेत. यावर तिच्या पतीने त्या महिलेला पुण्याला जाण्यास परवानगी दिली व असे सांगितले की, आपण पुण्याला जाऊन तेथे महिला होस्टलची माहिती घेऊन तेथे मी तुझी राहण्याची व्यवस्था करतो.

श्री.गोपिचंद पडळकर.....

त्यावर सदर महिलेने आपल्या पतीला असे सांगितले की, माझी पुण्याला राहण्यासाठी तुम्ही कोणतीही सोय करण्याची गरज नाही. पीएसआय मोहिते माझ्या ओळखीचे आहेत. ते अतिशय चांगले आहेत. त्यांच्या पाहुण्यांचे पुणे येथे घर आहे. तेथे माझ्या राहण्यासाठी त्यांनी सोय केली आहे. त्या महिलेचा पती साधा भोळा होता. त्याने आपल्या पत्नीला तिने सांगितल्याप्रमाणे पुण्याला ठेवले. त्या महिलेला पुण्याला जाऊन एक-दोन महिने झाले तरी तिने आपल्या पतीला एकदाही फोन केला नाही. त्यानंतर त्या महिलेच्या पतीच्या लक्षात आले की, आपल्या पत्नीच्या बाबतीत काही तरी घडले आहे. त्यानंतर तो आपल्या पत्नीला भेटण्यासाठी पुण्याला गेला. तेव्हा त्याला आपल्या पत्नीच्या हातावर पीएसआय मोहितेच्या नावाचा टॅटू गोंदवून घेतला असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याने पीएसआय मोहिते यांना फोन करुन विचारणा केली की, तुम्ही माझ्यासमवेत असे का वागत आहात ? तुम्ही माझ्या सुखी संसारामध्ये खडा टाकू नका. तुम्ही माझ्या पत्नीला माझ्याकडे परत पाठवून द्या. यावर मोहिते याने त्या महिलेच्या पतीला असे सांगितले की, तु तिला परत त्रास दिला तर तुझे हात पाय तोडीन. तुझी मला फोन करण्याची लायकी आहे का ? तु माझ्या नादाला लागू नकोस. मी माझ्या कंपनीचे १० टक्के शेअर्स त्या महिलेच्या नावावर केलेले आहेत. अशा प्रकारे त्या दोघांमध्ये संभाषण झाले आहे. मी त्याची क्लीप माननीय सभापती व माननीय गृह मंत्री यांना ऐकून दाखवली. सभापती महोदया, सदर पीएसआयची नेमकी कोणती कंपनी आहे ? माननीय गृहमंत्री यांनी त्याचा सत्कार केला पाहिजे. अशा प्रकारे एक महिला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी गेल्यानंतर मदत करतो असे सांगून संबंधित पीएसआय त्या महिलेलाच घेऊन जातो व त्यानंतर तिच्या पतीला धमकी देत आहे. अशा परिस्थितीत अद्याप त्या पीएसआयवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही किंवा त्याची कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. याबाबत माननीय गृह मंत्री यांना कोणतेही सोयरे सुतक नाही. सदर प्रकरणामधील क्लीप सोशल मीडियावर व्हायरल झाल्या असल्या तरी त्यावर बोलण्याचे धारिष्ट सरकारकडून दाखविले जात नाही.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर.....

यासारखी दुर्दैवी गोष्ट असू शकत नाही. ही सर्व प्रकरणे पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांना माहीत आहेत.

सभापती महोदया, दौंडमध्ये एका महिलेने डीवायएसपी यांच्याविरुध्द पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांच्याकडे विनयभंगाची तक्रार दिली आहे. त्या डीवायएसपीने त्या महिलेचा विनयभंग केला आहे. यावर पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी फोन करुन संबंधितांना असे सांगितले की, हे प्रकरण सेटलमेंट करुन मिटवून टाका. मागील अधिवेशनाच्या वेळी सदर महिलने स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून घेतले होते. तरी देखील सदर प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला नाही. अशा प्रकारे महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था आहे. यावर तुम्ही विचार करुन निर्णय का घेत नाहीत ? सभापती महोदया, उक्त सर्व प्रकरणासंबंधी चौकशी झाली पाहिजे व सर्व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल झाला पाहिजे. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण हे या सर्व प्रकरणांमध्ये पुढाकार घेत आहेत. तो माणूस भ्रष्टाचारी आहे. काल माननीय गृह मंत्री यांच्यासमवेत आमची बैठक झाल्यानंतर त्याने आपले काही पराक्रम सांगितले. त्यानंतर मी गडचिरोलीला फोन करुन विचारल्यानंतर मला अशी माहिती मिळाली की, त्यांनी ४३ नक्षलवाद्यांना मारले आहे. परंतु ते कधी कार्यालयातून बाहेरच पडलेले नाही. माझी माननीय गृह मंत्री यांना विनंती आहे की, आपण सदर प्रकरणी चौकशी करावी. तेथे आदिवासीचा पोलीस कॉन्स्टेबल मेला. तेथे भटक्या विमुक्ताचा मुलगा लढून मेला. तेथे मंगळवेढयामधील एका शेतकऱ्याचा मुलगा नक्षलवाद्याशी लढून मेला. त्यावेळी हा अधिकारी ऑफिसमध्ये निवांत बसला होता. मी त्यानंतर या बाबतीत कोल्हापूर, सातारा पुण्यामधील लोकांकडे चौकशी केली. हा व्यक्ती पोलिसांचा शत्रू आहे, विरोधक आहे. एवढयावर तो थांबला नाही. दलित समाजातील एका महिला पोलीस कॉन्स्टेबलने एका पोलीस निरीक्षकाविरुध्दची लेखी तक्रार पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांच्याकडे दिली होती. मी त्या महिलेच्या नावाचा येथे उल्लेख करणार नाही. सदर महिला तरुणी स्वकष्टाने, स्वकर्तृत्वावर पोलीस विभागामध्ये नोकरीला लागली होती. परंतु एक पोलीस निरीक्षक तिच्यावर

श्री.गोपिचंद पडळकर.....

लैंगिक अत्याचार करतो, तिला जातीवाचक शिवीगाळ करतो. त्यानंतर ती महिला पोलीस अधीक्षकांना भेटून त्या पोलीस निरीक्षकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करते. परंतु आजपर्यंत त्या महिलेने केलेल्या तक्रारीसंबंधी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. ॲट्रॉसिटी कायद्यानुसार ज्या दिवशी एखादी व्यक्ती ॲट्रॉसिटीसंबंधी तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये जाते. त्यावेळी त्या संदर्भात त्वरित गुन्हा दाखल करुन घेणे अत्यावश्यक आहे. अशी कार्यवाही न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करावा. या संदर्भात आपण त्या पोलीस अधीक्षकांविरुध्द गुन्हा दाखल करणार आहात का ? मी याबाबतचे पत्र माननीय सभापती यांच्यामार्फत आपल्याकडे देतो. सभापती महोदया, मी काल-परवा सदनामध्ये विषय उपस्थित केला होता की, पुणे आस्थापना मंडळाचे अध्यक्ष एका पोलीस कॉन्स्टेबलची बदली करीत असताना त्यांच्या आदेशामध्ये असे नमूद करतात की, अमुक गावाच्या महिला पोलीस पाटीलसमवेत त्यांचे अनैतिक संबंध आहेत.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर .....

असे त्या महिलेने त्या गावात राहायचे कसे. त्या गावात एकच पोलीस पाटील असतो. तशी ओळख झाली तर त्या गावात जगायचे कसे. तुम्ही आम्ही हा विषय सभागृहात मांडला तर माननीय गृहमंत्री पोलीस अधिक्षकाची बाजू घेतात. काल जागतिक महिला दिन होता. तुम्ही महिलांचा सन्मान केला असे म्हणता. आम्ही त्यांना समज दिली. कायद्याने तुम्हाला ते अधिकार दिले आहेत काय, एखाद्याने विनयभंग केला तर आयपीसी ५०९ प्रमाणे चूक ठरते.

सभापती महोदया, शक्ती कायदा आणण्याकरीता तुम्ही रात्रंदिवस मेहनत घेतली आहे. शक्ती कायदा आला पाहिजे, महाराष्ट्रातील महिला सुरक्षीत झाल्या पाहिजेत. शक्ती कायद्यात ३५४ ग नावाचे कलम समाविष्ट केलेले आहे. त्यात करावयाच्या कारवाईबाबत पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचा उल्लेख केलेला आहे. तरी देखील सरकार त्यांना पाठिशी घालत आहे. म्हणून माननीय गृह राज्यमंत्री श्री.शंभुराजे देसाई यांना हात जोडून विनंती करायची आहे. मागील वेळी या सभागृहात तुम्ही माझ्या गुन्हयांचा पाढा वाचवून दाखवत होता. तुम्ही मंत्री पदाची शपथ घेतली तेव्हा म्हटले होते की, मी कोणाशीही ममत्व बाळगणार नाही, कोणाविषयी आकस बाळगणार नाही. एका लोकप्रतिनिधीवर हल्ला होतो तेव्हा तेथील एपीआय पोलीस स्टेशनच्या डायरीमध्ये नोंद करतो की, अमुक वाजता श्री.गोपिचंद पडळकर यांच्या गाडीवर २००-२५० दगडांनी व काठयांनी हल्ला केला आहे. पोलीस डायरीत नोंद असताना तुम्ही म्हणता की, गोपिचंद पडळकरांनी हे कारस्थान केले आहे. कलम ३५३, ३०७, ३९५ अन्वये गुन्हे नोंद आहेत. गुन्हे नोंद कोणी केले. मी गुन्हेगार आहे व ते मला मान्य आहे. कारण अहिल्यादेवीच्या पुतळयाला जातीयवाद्यांचा हात लागू नये म्हणून त्या पुतळयाचे उदघाटन केले म्हणून माझ्यावर ३५३ अन्वये गुन्हा नोंद आहे व त्याचा मला सार्थ अभिमान आहे. मी परत असे गुन्हे करेन. कराडच्या टेंभू कार्यालयात २०१३ मध्ये आटपाडी व सांगोल्याच्या लोकांना पाणी मिळावी म्हणून मी तेथे हल्लाबोल केला होता. तेथे माझ्यावर ३५३ कलमान्वये गुन्हा नोंद आहे व त्याचा मला सार्थ अभिमान आहे. कारण मी

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर .....

शेतकऱ्यांसाठी लढलो. माझ्या हातात बेडया घातलेला फोटो सोशल मिडीयावर फिरतो. महाराष्ट्रात सोशल मिडीयात काम करणारे लोक माझा तो फोटो टाकतात की, गोपिचंद पडळकर असा आहे, तसा आहे. कराडच्या जेलमध्ये आटपाडी व सांगोल्याच्या शेतकऱ्यांना पाणी मिळावे म्हणून ३५३ चा गुन्हा माझ्यावर नोंद झाला होता. त्यात मी अटक होतो. पोलिसांनी माझ्या हातात बेडया घातल्या होत्या त्या बेडयाचा मला अभिमान आहे. कारण शेतकऱ्यांसाठी बेडया घातल्या होत्या.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर हे बोलत असताना त्यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. मी राज्यमंत्री म्हणून शपथ घेताना ममत्वभाव बाळगणार नाही अशी संविधानिक शपथ घेतल्याचे वाचून दाखवले आहे. असे करताना मागील एका प्रश्नाच्या उत्तराच्या अनुषंगाने त्यांनी येथे काही गोष्टी सांगितल्या आहेत. मला आपल्या माध्यमातून सदनाला सांगायचे आहे की, आपण बोलताना जरुर त्या मुद्दयावर भाष्य करा. परंतु ज्या चर्चेत या विषयाचा दुरान्वयेसुध्दा संबंध नाही. मला देखील वेळ दिला पाहिजे. पण हे म्हणतात की, कोणत्या गुन्हयात बेडया घातल्या, कोणत्या गुन्हयात त्यांना अटक झाली, परत आता याची चर्चा सुरु होईल. सन्माननीय सदस्यांच्या भाषणात आलेल्या विषयाची नियम २६० अन्वये प्रस्तावात एक ओळही नाही. जो प्रस्तावाचा भाग होत नाही त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य मंत्री यांचे नाव घेऊन बोलू शकत नाही. सभापती महोदयांनी सन्माननीय सदस्यांच्या भाषणात दुरुस्ती करावी.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, हा कायदा व सुव्यवस्थेचा भाग आहे त्यावर मी बोलत आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

असुधारित प्रत

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांचे भाषण ऐकायचे आहे की गोंधळ घालायचा आहे. तुम्ही सर्व जण खाली बसा. मी आता उभी आहे. उभ्या असलेल्या सन्माननीय सदस्यांनी

श्री.गोपिचंद पडळकर .....

खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड यांचे नाव मी एवढयासाठी घेत आहे की त्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर गंभीर प्रश्न मांडत आहेत. मी त्यांना सांगू इच्छिते की, तुमचे प्रशन मांडण्याचा तुमचा अधिकार व स्वातंत्र्य आहे. हे लोकप्रतिनिधींचे सभागृह आहे, कळत नकळत गुन्हेगाराचे उदात्तीकरण होईल असा संदेश जाऊ नये अशी माझी विनंती आहे. भाषणात तुम्हाला बोलायचे असेल ते बोला. परंतु तुम्ही निर्दोष आहात की काय आहात, या तुमच्यावरील गुन्हयांबाबत न्यायसंस्था निर्णय घेणार आहे. तुम्ही गुन्हयाचे उदात्तीकरण करु नका.

मी सभागृहाला सांगू इच्छिते की, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची खाली बसावे, सन्मानीय सदसस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी भाषण सुरु ठेवावे. बोलणाऱ्या सदस्यांची मी नोंद घेतली आहे.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, गुन्हेगारांचे उदात्तीकरण होऊ नये अशी वक्तव्ये या सभागृहात होऊ नयेत हे आपण त्यांना बोलला आहात.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.गोपीचंद पडळकर : सभापती महोदया,

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया काय म्हणाल्या किंवा सन्माननीय सदस्य काय म्हणाले हे आपण ठरवू नये. असे आपल्याकडे बघून ते म्हणाले आहेत, या सभागृहातील सर्वोच्च आसनाचा अवमान त्यांनी केला आहे. तुम्ही ठरवू नका

असे ते म्हणाले आहेत, त्यांना हे शब्द मागे घ्यायला लावावेत, नाही तर त्यांना समज द्यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी शांतता राखावी, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी भाषण पुढे सुरु करावे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी बसावे व शांत राहावे. *** तुम्ही टेन्शन घेऊ नका, तुम्ही खाली बसा.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उप सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्याने मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करते.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.१७ ते ११.२७ वाजेपर्यत स्थगित झाली.)

---------

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती :** सर्वप्रथम मी ते शब्द पटलावरुन काढून टाकत आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती :** एका वेळी एकाच सन्माननीय सदस्यांनी शांतपणे बोलावे.

( सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

**उप सभापती :** मी अद्याप कोणालाही बोलण्याची परवानगी दिलेली नाही. एकेकाने शांतपणे आपापले म्हणणे मांडावे. उर्वरित सर्वांनी शांतपणे ऐकून घ्यावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आताच आपण शब्द पटलावरुन काढून टाकण्याचे निर्देश दिलेले आहेत. मला वाटते याबाबत तेवढेच पुरेसे आहे.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, आपण दिलेला आदेश मान्य करुन संबंधित सन्माननीय सदस्य यांना बोलू द्यावे, ते बोलत असताना काही चूक होऊ नये एवढे पाहावे.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलत आहेत.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे आपण ज्येष्ठ आहात, आपण याचे काय समर्थन करीत आहात ! आपले यावर काय म्हणणे आहे, ते आपण मांडावे.

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, या सभागृहात जे काही आपसात झालेले आहे, ते सर्व आपसातच आहे. ते काही सभागृहाच्या रेकॉर्डवर नाही.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

सभापती महोदया.....(अडथळा).... जे रेकॉर्डवर....(अडथळा) चुकीचे आलेले असेल ते आताच काढून टाकण्याबाबत आपण निर्देश दिलेले आहेत. आणि आता...(अडथळा) आपसातील चर्चेचा जो राहिलेला भाग आहे, त्याकरिता आपण गॅलरीबाहेर बसून ती चर्चा करु या.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

सभापती महोदयांनी आताच रेकॉर्डवरुन चुकीचे शब्द काढून टाकण्याचे निर्देश दिलेले आहेत. (अडथळा)......आपण... आपला..... (अडथळा)

सभापती महोदया, आमचा जो आपसात वाद झालेला आहे, तो आम्हाला गॅलरीतही करता येईल पण रेकॉर्ड.... रेकॉर्डवर काही असेल तर ते काढून टाकण्यात यावे, बाकी जे काही आहे ते आम्ही आपसात बसून मिटवून टाकू.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

**उप सभापती :** मला सर्व सन्माननीय सदस्यांना सांगायचे आहे की,

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदयांनी पटलावरील शब्द काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. ....दिलगिरी....दिलिगिरी...... आपण.... आपला.....(अडथळा)

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी जागेवर उभे राहून मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

यानंतर श्री.सोनावणे.....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे....

रेकॉर्डवर चुकीचे आले असेल तर ते काढून टाकण्यात यावे असे आमचे म्हणणे. बाकी आम्ही आपापसात बसून निर्णय घेऊ.

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदया, आपण निर्देश दिल्यानुसार सन्माननीय सदस्यांनी केलेली वक्तव्ये रेकॉर्डवरुन काढून टाकली याबद्दल आम्हाला काहीच म्हणावयाचे नाही. माननीय उप सभापती महोदया आपल्याकडे बघून ते असे म्हणालेत की, तुम्ही ठरविणारे कोण आहात ? माननीय उप सभापती महोदया हा सर्वोच्च सभागृहातील आसनाचा अशा पध्दतीने अपमान आम्ही सहन करणार नाही. माननीय उप सभापती महोदया अशा म्हणाल्या होत्या की, गुन्हेगारीचे उदात्तीकरण करु नका. माननीय उप सभापती महोदयांनी योग्य डायरेक्शन आणि निर्देश दिल्यानंतर हा विषय संपला होता. पण त्याला जोडून सन्माननीय सदस्य असे म्हणाले आहेत की, गुन्हेगारीचे ठरविणारे आपण कोण ? हे सभागृहातील सर्वोच्च आसनाला अशा प्रकारचा उल्लेख करणे बरोबर नसून, हा आमचा अवमान आहे आणि तो आम्ही कधीही सहन करणार नाही.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदया, चर्चेच्या वेळी असे प्रसंग अनेक वेळा उद्भवलेले आहेत. आपली मागणी योग्य मान्य आहे. पण सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी. सन्माननीय सदस्य दिलगिरी व्यक्त करण्यासाठी उभे राहत असतील तरी सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे ऑब्जेक्शन आहे काय ? सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी देण्यात यावी, ते बोलण्यासाठी उभे आहेत.

श्री. गोपीचंद पडळकर : सभापती महोदया, म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावासंदर्भातील चर्चा सुरु आहे. सदनात कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चा सुरु आहे. सभागृहात गुन्हेगारीचे उदात्तीकरण कोणी करित आहेत असे त्यांनी स्टेटमेंट केलेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना असे म्हणालो होतो की, गुन्हेगार ठरविण्याचा अधिकार हा माननीय न्यायालयाला आहे. मी माननीय

असुधारित प्रत

सभापती महोदयांचा अवमान केलेला नाही आणि माझी ती संस्कृती नाही. या सर्व विषयामध्ये महाराष्ट्रातील नेमकी परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

( सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जावे.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक सकाळी ११.४० वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी ११. ३४ ते ११.४० वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे असतात.)

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी घडलेल्या प्रकाराबाबत आपली भूमिका मांडावी.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सभागृहात घडलेल्या प्रकाराबाबत मी नुकतीच माहिती घेतली. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी सभागृहात गोंधळ झाला. या संदर्भात काय भूमिका घ्यायची ती सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर निश्चितच मांडतील. कारण या सभागृहाची गरिमा, प्रतिष्ठा मोठी आहे याचे भान सर्वांनाच आहे. परंतु हे सभागृह समन्यायाने चालते. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी केलेले वक्तव्य, त्यांची शिवी या बाबी सभागृहाची गरिमा वाढविणाऱ्या नाहीत. ते हमरी-तुमरीवर आले होते. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. दोन्ही सन्माननीय सदस्यांना.....

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदया, अशाप्रकारे एकतर्फी निर्णय करता येणार नाही. जर सत्ताधारी पक्षाला गोंधळच घालायचा असेल तर घालावा. आम्ही मध्यम मार्ग काढत असताना जर सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांना गोंधळ घालून सभागृहाचे कामकाजच करु द्यायचे नसेल तर आमची त्याला हरकत नाही.

(सत्ताधारी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी सभागृहाची माफी मागावी व त्यांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्यानुसार या सभागृहाचे वेगळे स्थान आहे. या सभागृहात भाषण करताना भाषा कशी असावी याचे नियम आहेत, संकेत आहेत. भाषण करताना भाषा आक्रमक असण्यास काहीच हरकत नाही, परंतु नेमकी भाषा कशी असावी याचा आपल्याकडे अलिखित ढाचा आहे. त्या ढाच्याच्या बाहेर सत्ताधारी आणि विरोधी बाजूच्या लोकांना जाता येत नाही. जर सभागृहात चुकीची भाषा वापरली असेल तर सन्माननीय सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करण्यास काही हरकत नाही. आमच्याकडून चूक झाल्यानंतर आम्ही सुद्धा अनेक वेळा दिलगिरी व्यक्त केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त केल्यास हा विषय संपून जाईल. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी भाषण करताना आपल्या भाषेवर संयम ठेवावा. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी सभागृहात केलेल्या वक्तव्याप्रकरणी एका शब्दात दिलगिरी व्यक्त करुन हा विषय संपून टाकावा.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, माझ्या बोलण्यातून अनवधानाने या सभागृहात काही चुकीचे वक्तव्य उच्चारले गेले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु माझ्या तशा कोणत्याही भावना नव्हत्या. या संपूर्ण विषयात गुन्हेगार ठरविण्याचे अधिकार हे न्यायालयाला आहेत एवढेच मी बोललो होतो. तरी सुद्धा जर माझ्याकडून काही चुकीचे झाले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. तसेच माझ्या भावना पुढे मांडण्याचा प्रयत्न करतो.

सभापती महोदया, नियम २६० च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की.....

असुधारित

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांना सांगू इच्छिते की, मी आपल्याला अजून भाषण करण्याची परवानगी दिलेली नाही.

सभागृहात जो प्रकार घडला त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीणजी दरेकर, आपण सभागृहात उपस्थित असता तर अधिक चांगले झाले असते. हा प्रकार घडला तेव्हा सभागृहात सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर, चंद्रशेखर बावनकुळे होते. माईक सुरु नसताना आणि मी सभागृह तहकूब केल्यानंतर काही वादविवाद आणि थोडी हमरीतुमरी झाली. मी येथे असताना केलेल्या वक्तव्याचा उल्लेख वारंवार होत आहे. सभागृहात वातावरण संतप्त झाले त्याच वेळी सभागृहाची बैठक तहकूब केली. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त केली असून, त्या दिलगिरीचा अर्थात मी स्वीकार करते. परंतु मी एवढेच सांगू इच्छिते की, अशा प्रकारचे वक्तव्य आपल्या तोंडून आल्यानंतर गदारोळ होऊन आपले जे मूळ मुद्दे असतात ते त्यात हरवून जातात हे मी अनुभवी म्हणून सांगते. मला वाटते या दृष्टीने आपण भविष्यात दखल घ्यावी.

मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देते की, सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल. नियमित बैठक सुरु झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बोलताना स्वत:च्या आणि इतरांच्या भावनांचा, विचारांचा आणि विवेकांचा उपयोग करावा, एवढेच सांगते.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.४५ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : प्रश्नोत्तरे ....

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यापासून सभागृहात व सभागृहाच्या बाहेर सरकारमधील माननीय मंत्री जे आता तुरुंगात आहेत, त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी सातत्याने ....

**सभापती** : किती वेळा हा विषय निघणार आहे ?

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, महत्त्वाचा विषय आहे.

**सभापती** : विषय महत्त्वाचा आहे हे ठीक आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मुंबईकरांचे जीव गेले आहेत. मुंबईकर रक्ताळलेला आहे. अशा वेळी मंत्रिमंडळातील माननीय मंत्री आजही मंत्रिमंडळात असतील .... मला उत्तर द्यावे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांचा कसा सहभाग राहणार आहे, सभागृहातील कामकाजात त्यांचा कसा सहभाग राहणार आहे, ते अनेक प्रश्नांना कसे उत्तर देणार आहेत ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)

सभापती महोदय, माझी विनंती आहे. आपण आम्हाला आपल्या आसनावरुन न्याय देणारे आहात. मी आपल्याल विनंती व मागणी करीत आहे की, आम्हाला आता माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा हवा आहे नाही तर आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. त्यामुळे माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा देण्यासंदर्भात आपण काय करणार आहात हे सांगावे.

**सभापती** : प्रश्नोत्तरे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**(१) * ११८२० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध करांसह रुपये १४२८ कोटीच्या प्रस्तावाला मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी माहे एप्रिल, २०२० मध्ये रुपये ५४० कोटींचा आराखडा महानगरपालिकेकडून तयार करण्यात आला असून तद्नंतर रुपये ७५१ कोटी इतका खर्च निश्चित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे वारंवार विविध प्रकारच्या निविदा प्रक्रिया राबवून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणामुळे सदर प्रकल्प गत अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महानगरपालिकेकडून नियोजनबध्द कार्यक्रम आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पोयसर नदीच्या पुनरुज्जीवनाच्या कामाची विविध करांसहीत एकूण अंदाजित किंमत रुपये १४८२.३९ कोटी असून त्यास महानगरपालिकेच्या स्थायी समितीने दिनांक १४/०१/२०२२ रोजी मंजूरी दिली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर प्रकल्पाकरीता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये रुपये ५४० कोटींचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला होता. सदर प्रकल्पाची सखोल तपासणी करण्याकरीता तांत्रिक सल्लागार समिती (T.A.C.) स्थापित

असुधारित

ता.प्र.क्र.११८२०....

श्री.एकनाथ शिंदे ....

करण्यात आली. सदर समितीच्या दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीय हरित लवाद (National Green Tribunal) आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (Central Pollution Control Board) यांनी ठरविलेल्या मापदंडाच्या आधारे आराखड्यास मान्यता देऊन मलनि:सारण केंद्राकरीता पूर्वी ठरविलेली ओपन टेक्नॉलॉजी न घेता एम.बी.आर. टेक्नॉलॉजी (मेमब्रेन बायोरिॲक्टर टेक्नॉलॉजी) निश्चित करण्यात आली. तसेच एच.डी.डी. (होरीझन्टल डायरेक्शनल ड्रिलींग) प्रणालीचा उपयोग करुन झोपडपट्टयांच्या खालून मलनि:सारण प्रणालीचे काम करण्याचे ठरले.

त्यामुळे सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम रुपये ७५१ कोटी इतकी निश्चित करण्यात आली असून त्यास महानगरपालिकेमार्फत तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्पाची प्रथम निविदा माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. परंतु, निविदेला प्रतिसाद न मिळणे, निविदापूर्व बैठक, कोविड-१९ चा प्रादुर्भाव, निविदाकारांनी वेळोवेळी केलेल्या विनंती या कारणांमुळे महानगरपालिकेमार्फत निविदेस एकूण १९ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) पोयसर नदीच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाकरीता महानगरपालिकेमार्फत कंत्राटदराची नियुक्ती करण्यात आली असून त्यास दिनांक ०४/०२/२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी ३६ महिने (पावसाळा वगळून) असून काम पूर्ण झाल्यानंतर पुढील १५ वर्ष कंत्राटदारामार्फत प्रकल्पाचे प्रचलन व परिरक्षण करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

----

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

**सभापती** : आपण आता पुढे गेलो आहोत. आता हरकत नाही. ते काहीही रेकॉर्डवर येणार नाही. काहीही रेकार्डवर येत नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

असुधारित प्रत

**मराठा समाजाच्या आरक्षण तसेच इतर मागण्या मान्य करण्याबाबत**

**(२) * १२७५२ श्री.सुरेश धस, श्री.प्रविण दरेकर, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मागासवर्ग आयोगाची शिफारस घेऊन तयार केलेला व विधिमंडळाने एकमताने मंजूर केलेला मराठा समाजाला आरक्षण देणारा कायदा दिनांक ५ मे, २०२१ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुन्हा मागासवर्ग आयोग नेमून मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास असल्याचे सिध्द करुन आरक्षण टिकविण्यासंदर्भात शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती योजना, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृह बांधणे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे आर्थिक मदत करणे इत्यादी मागण्या पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठा समाजाच्या आरक्षण व इतर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ च्या निर्णयाची समीक्षा करण्यासाठी दिनांक ११/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये माजी न्यायाधीश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेली आहे. ही पुनर्विलोकन याचिका फेटाळल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५/०५/२०२१ च्या निर्णयात मराठा आरक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत/ नोंदविलेली निरीक्षणे यांच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची माहिती संकलित करण्यासाठी/ अभ्यास करण्यासाठी एका नवीन आयोगाची स्थापना करावी, अशी भोसले समितीची शिफारस आहे. त्यामुळे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७५२....

श्री. उद्धव ठाकरे ....

मा.सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विलोकन याचिका फेटाळल्यास मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची माहिती संकलित करण्यासाठी एका नवीन आयोगाची स्थापना करण्यात येईल.

(३) व (४) उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ मराठा समाजाला मिळतो. या योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये १,६६,९७९ विद्यार्थ्यांना रुपये ८९ कोटी इतकी शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. सन २०२०-२१ मध्ये १,६६,७३१ विद्यार्थ्यांना ५६.११ कोटी शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ मध्ये अद्यापपर्यंत १,०९,३२२ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३०,९३३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली असून त्यांना शिष्यवृत्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे. सन २०२२-२३ करीता रुपये ८७ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

तसेच, राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतर्गत समाविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १३/०७/२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे शासन/ स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या मालकीच्या विनावापर असलेल्या इमारती, नोंदणीकृत संस्थांना भाड्याने देण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर योजनेत कोणत्याही प्रकारची नवीन वसतिगृह इमारती बांधण्यात येत नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कोणतीही आर्थिक मदत केली जात नाही. महामंडळाकडून लाभार्थ्यांना बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

----

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

असुधारित प्रत

## रायगड जिल्ह्यातील महाड-भोर मार्गावरील सावित्री नदीवरील पुलाची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत

**(३) * १२१६५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाड-भोर मार्गावर भोराव जवळील सावित्री नदीवर महाड-भोर-पुणे रस्त्याच्या निर्मितीसाठी सन १९५० मध्ये पूल बांधण्यात आला असून सावित्री नदीवरील पुलाच्या दुर्घटनेनंतर या पुलाची तपासणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० व सन २०२१ मध्ये झालेल्या महापुरात वाहून आलेला चिखल, कचरा, लाकडे या पुलाच्या खालील बाजूला असलेल्या लोखंडी रेलिंगला अडकून पडल्याने पुलाला धोका निर्माण झाला असून सदर पुलाच्या लोखंडी रेलिंगमध्ये अडकलेली लाकडे, कचरा व वरील बाजूस उगवलेले गवत यामुळे या पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर पुलाची देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२० व सन २०२१ मध्ये झालेल्या महापुरात पुलाच्या ठिकाणी वाहून आलेला चिखल, कचरा, लाकडे व वरील बाजूस उगवलेले गवत काढण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत सदर पुल सुस्थितीत असून पुलावरुन सुरळीतपणे वाहतूक सुरु आहे.

(३) चौकशी/कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

आंबडवे – पाचरळ – मंडणगड – म्हाप्रळ – महाड – वरंध – भोर – लोणंद - पंढरपूर रस्त्याच्या रायगड जिल्ह्यातील एकूण ८१.३२५ कि.मी. लांबीपैकी महाड

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१६५....

श्री. दत्तात्रय भरणे ....

(राजेवाडी फाटा) ते वरंध गाव या १३ कि.मी. लांबीसाठी काँक्रिटीकरणाने दुपदरीकरण करण्याचे काम नवीन पुलाच्या बांधकामासह रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सन २०२१-२२ च्या वार्षिक नियोजनामध्ये समाविष्ट करण्यात आले असून त्यानुसार सदर कामाचा प्रस्ताव केंद्र शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सदर मंजुरीच्या अधिन राहून रस्त्याचे व भोराव येथील सावित्री नदीवरील जुना पुल पाडून नव्याने बांधण्याच्या कामाकरीता निविदा बोलावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री याबाबत त्यांच्या दालनात बैठक घेणार आहेत का ?

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, होय.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**सभापती** : अशा गोंधळाच्या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.०३ ते दुपारी १२.०८ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.०८ ते दुपारी १२.१८ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापती स्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी प्रश्नोत्तरे सरु करीत आहे, प्रश्न क्रमांक ३

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी मघाशी विषय मांडला होता त्याचा मी पुन्हा उच्चार करतो की, मंत्री महोदय श्री.नवाब मलिक यांनी राजीनामा देणे आवश्यक आहे. १९९३ मध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये मुंबईकरांनी किती हाल सोसले याची आपणाला माहिती आहे. सभापती महोदय, आम्हाला न्याय हवा आहे. सभापती महोदय, आज आम्हाला मंत्री महोदय श्री.नवाब मलिक यांचा राजीनामा हवा आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक १२१६५... श्री. जयंत प्र. पाटील यांनी बोलावे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न पुकारण्यात आला होता. याबाबत दालनात बैठक घेण्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे.

**सभापती** : या प्रश्नाबाबत उद्या सकाळी बैठक लावण्यात आली आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

------

असुधारित प्रत

## परभणी जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४) * १२०८१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील परभणी-गंगाखेड, परभणी-मानवतरोड-पाथरी, परभणी-जिंतूर, परभणी-झिरोफाटा या दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे विहित मुदत संपण्यापुर्वीच सदरहू रस्त्यांना तडे जावून व खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्यांच्या सर्व कामांची चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, परभणी व स्थानिक नागरिकांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झिरो फाटा ते पूर्णा (जि.परभणी) रस्त्यावरील झिरो फाटा ते लक्ष्मीनगरच्या पाटीजवळ, माटेगांव पाटीवर, माटेगांव ते सुरवाडी दरम्यान रस्त्यांची आणि पूर्णा, पांगरा, पिंपळा, लोखंडे मार्ग धार (लोण बुद्रुक) या रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोनपेठ शिरसाळा (जि.परभणी) रस्त्याचे काम करतांना रस्त्याचे खोदकाम करुन भर टाकण्यासाठी मुरमाऐवजी माती मिश्रीत मुरुम टाकले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे कामे करणारे कंत्राटदार व त्यावर नियंत्रण करणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०८१...

**श्री.दत्तात्रय भरणे,श्री.अशोकराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे असून परभणी-गंगाखेड कामाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

परभणी जिल्ह्यातील परभणी-गंगाखेड (NH, PWD) व परभणी-जिंतूर (NH, MSRDC) येथील प्रगतीपथावरील काँक्रिटीकरणाच्या कामातील काही भागामध्ये तडे गेलेले आहेत. सदर भागातील दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत परभणी-गंगाखेड कामाचे Third Party Audit करण्यात आले आहे. तथापि, अहवाल प्राप्त होणे बाकी असल्याने सदर अहवालानुसार पुढील कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे.

परभणी-मानवतरोड-पाथरी (NH, PWD) रस्ता डांबरीकरणाचा असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

परभणी-झिरो फाटा (NH, PWD) सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून डांबरीकरण झालेल्या ठिकाणी रस्ता सुस्थितीत आहे. तथापि, सदर कामाच्या संथ गतीमुळे मंजूर निविदा रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. दरम्यान उर्वरित कामासाठी नवीन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंत सदर भागातील रस्ता सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक दुरुस्तीबाबतची प्रक्रिया निविदा स्तरावर आहे.

(२) प्रश्नांकीत नमूद रस्त्यांपैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील झिरो फाटा ते पूर्णा (जि.परभणी) रस्त्यावरील झिरो फाटा ते लक्ष्मीनगर पाटी, माटेगाव पाटी व माटेगाव ते सुरवाडी फाटा हे रस्ते वाहतुकीयोग्य ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या देखभाल दुरुस्तीची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

उर्वरित सुरवाडी फाटा ते सुरवाडी तसेच पूर्णा, पांगरा, पिंपळा, लोखंडे मार्ग धार (लोण बुद्रुक) हे रस्ते ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीत असून त्यांचेकडून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

पूर्णा-पांगरा इजिमा-०८ रस्त्यावर जिल्हा परिषदेव्दारे मुरुम टाकण्यात आला आहे. तसेच पांगरा, पिंपळा (लोखंडे) मार्ग धार (लोण बुद्रुक) हा रस्ता इजिमा ४२ व सुरवाडी फाटा ते सुरवाडी या दोन्ही रस्त्यांचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण

ता.प्र.क्र.१२०८१....

श्री.दत्तात्रय भरणे.....

करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) हे खरे नाही.

सोनपेठ-शिरसाळा (जि.परभणी) रस्त्याच्या कामामध्ये विनिर्देशानुसार भरावाचे काम करण्यात आले आहे.

(४) व (५) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही अनुक्रमांक १ व २ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार आहे.

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यातील नॅशनल हायवेचा हा महत्वाचा प्रश्न आहे. हे चारही रस्ते जिल्ह्याला जोडणारे आहेत. परभणी-गंगाखेड, परभणी-मानवतरोड-पाथरी, परभणी-जिंतूर, परभणी-झिरोफाटा या चारही रस्त्यांची कामे अत्यंत मंद गतीने सुरु आहेत. गंगाखेड-परभणी रस्त्याच्या कामाचा दर्जा बरोबर नाही त्याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत हे लेखी उत्तरात मान्य केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पाथरी-मानवतरोड-परभणी रस्त्यांचे काम अतिशय मंद गतीने सुरु असून १२३ लोक मृत्यूमुखी पडले आहेत.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०८१......

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी.....

माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, परभणी-मानवतरोड-पाथरी रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे आणि संबंधित गुत्तेदारावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न साधारणत: सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ आणि राष्ट्रीय महामार्ग अशा चार विभागांशी संबंधित आहे. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांसमवेत चारही विभागाबरोबर एकत्रित बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपल्याला ज्ञात आहे की, एखाद्या रस्त्याच्या कामासाठी एकदा निधी प्राप्त झाल्यानंतर पुन्हा १० वर्षे त्या कामासाठी निधी प्राप्त होत नाही. परभणी-जिंतूर, परभणी-गंगाखेड, परभणी-पाथरी किंवा परभणी-बसमत-नांदेड रस्ता या चार रस्त्यांपैकी तीन रस्त्यांचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. हे सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते आहेत.

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, विरोध पक्षातील सदस्यांनी सभात्याग केल्यामुळे आज १० पेक्षा जास्त तारांकित प्रश्न चर्चेला येतील. आपण संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना सभागृहात बोलावून घ्यावे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना उप प्रश्न विचारण्याची संधी मिळालेली आहे. आपण जास्तीत जास्त तारांकित प्रश्न चर्चेला घेण्याचा प्रयत्न करु.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, डांबरी रस्ता उखडला किंवा खड्डा पडला तर तो लगेच भरता येतो. परंतु सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर खड्डा पडला तर आजुबाजूचा तुकडा काढून पुन्हा रिफिलिंग करावे लागते. सदर रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. परंतु रस्त्याला ठिकठिकाणी तडे गेलेले आहेत. मग तो रस्ता

ता.प्र.क्र.१२०८१......

श्री.विक्रम काळे.......

भविष्यात कसा काय चांगला राहणार आहे ? उपरोक्त चारही रस्त्यांबाबत बैठक घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. बैठक घेऊन मार्ग निघेल किंवा नाही हे मला माहिती नाही. मंत्री महोदय फिल्डवर काम करतात. आपण ग्रामीण भागातील आहात. आपण परभणी जिल्ह्याचा दौरा करावा. आम्ही दौऱ्याच्या वेळी आपल्या बरोबर उपस्थित राहू. आपण उपरोक्त चारही रस्त्यांची पाहणी करु. उपरोक्त रसत्यांच्या कामामध्ये जे दोष आहेत ते कायम स्वरुपी निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन त्यासाठी मदत करण्यात येणार आहे काय ?

श्री.दत्तात्रय भरणी : सभापती महोदय, परभणी येथे बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, परभणी ते झिरो फाटा रस्त्याचे काम ३-४ वर्षांपासून सुरु आहे. नांदेड येथून परभणी येथे जाण्यासाठी हा जवळचा रस्ता आहे. सदर स्त्याचे काम केव्हा पूर्ण होईल आणि संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, परभणी ते झिरो फाटा हा नॅशनल हायवे आहे. सदर रस्त्याची लांबी साधारणत: १२ किलो मीटर आहे. त्यापैकी ६.७ किलो मीटर लांबीचे काम पूर्ण झालेले आहे. सदर रस्त्याचे काम संथगतीने सुरु आहे, ही गोष्ट बरोबर आहे. सदर कंत्राटदाराला काढण्याचा प्रस्ताव फेब्रुवारी, २०२२ मध्ये परिवहन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी कंत्राटदाराच्या जोखमेतून रस्ता दुरुस्तीची निविदा देखील मागविण्यात आलेली आहे. त्यामुळे निश्चितपणे लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

--------

**तारांकित प्रश्न क्र.१२७५२ बाबत**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अ.क्र.२ वरील तारांकित प्रश्न क्र.१२७५२ "मराठा समाजाच्या आरक्षण तसेच इतर मागण्या मान्य करण्याबाबत" प्रश्न आहे. मघाशी सभागृहात गोंधळ झाला होता.

**सभापती** : मी सदर तारांकित प्रश्न पुकारला होता.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सदर तारांकित प्रश्न नंतर चर्चेला घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-------

असुधारित प्रत

## मलबार हिल (मुंबई) परिसरातील ओशियन-३६० या इमारतीच्या बांधकामात अनियमितता झाल्याबाबत

**(५) * १२७२३ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलबार हिल (मुंबई) या उच्चभ्रु वस्तीत सीटीएस क्रमांक ८३ व ८४ या भूखंडावर बांधण्यात आलेल्या ओशियन-३६० या इमारतीच्या बांधकामात अनियमितता असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र दिले गेल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २२ मजल्यांच्या हायराईज इमारतीला चारही बाजूला जागा सोडलेली नाही, कोर्टयार्डसाठी फायर डिपार्टमेंटने टाकलेल्या अटींची पूर्तता विकासकाने केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इमारतीच्या बांधकामात अनियमितता करणाऱ्या विकासक व भोगवटा प्रमाणपत्र देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मलबार हिल येथील सीटीएस क्र. ८३ व ८४ या भूखंडावर ओशियन-३६० ही "ए" व "बी" विंग प्रस्तावित इमारत असून, "बी" विंग ही तळमजला + १ ते १८ मजले अशी इमारत आहे. सदर "बी" विंगच्या मंजूर आराखड्यानुसार झालेल्या बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०२/०१/२०१९ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) मंजूर आराखड्यानुसार सदर इमारतीच्या पूर्व व पश्चिम दिशेस रस्ता असून, उत्तर व दक्षिण दिशेस कमीत कमी १.५ मी. व त्यापेक्षा अधिक जागा सोडली आहे.

सदर इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत दिनांक ११/०१/२०१६ रोजी स्थळपाहणी करण्यात आली. त्यावेळी अग्निशमन दलाने पारित केलेल्या कोर्टयार्डबाबतच्या अटींची पूर्तता विकासकाने केल्याचे निदर्शनास आले. तसेच, सदर इमारतीतील अग्निप्रतिबंधक व

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७२३......

श्री.एकनाथ शिंदे.......

अग्निशमन यंत्रणेच्या अटी-शर्तींचे अनुपालन केल्याचे आढळल्यानंतर सदर इमारतीस दिनांक २४/०२/२०१६ रोजी अंशत: भोगवटासाठीचे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

---------

असुधारित प्रत

**सांताक्रूझ-चेंबूर (मुंबई) मार्गाच्या विस्ताराचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(६) * १२०८७ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रूझ-चेंबूर लिंक रस्त्याच्या विस्ताराचे काम सन २०१६ मध्ये सुरु होऊन नियोजनानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत व दुसऱ्या टप्प्याचे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना सद्य:स्थितीत प्रकल्पाचे केवळ सुमारे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे, माहे मार्च, २०२२ पर्यंत प्रकल्पाचे दोन्ही टप्पे कार्यान्वित होणे अपेक्षित असताना सदरहू प्रकल्पाचे काम पुन्हा रखडल्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सन २०२३ पर्यंतचा कालावधी लागणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाला विलंब होत असल्याने कामांच्या खर्चात वाढ होत असून सुरुवातीच्या अंदाजित रकमेपेक्षा प्रकल्पाच्या खर्चात रुपये १९० कोटींची वाढ झाली आहे, प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे या भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, प्रकल्पातील भूसंपादन, वृक्ष प्राधिकरणाची परवानगी, जलवाहिन्या व मलनिसा:रण वाहिन्या स्थलांतरीत करणे, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन, कोविड जागतिक महामारीमुळे मनुष्यबळ पुर्ववत करण्यासाठी लागलेला कालावधी, प्रकल्पाच्या कामातील आमूलाग्र संरचना बदल, इतर आकस्मित व अतिरिक्त बाबी तसेच प्रकल्पात अतिरिक्त कामे उद्भवल्यामुळे सदर प्रकल्प आता मार्च, २०२३ किंवा त्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या भाग-१ व भाग-२ ची अनुक्रमे ७३% व ७०% कामे पूर्ण झालेली आहेत.

ता.प्र.क्र.१२०८७......
श्री.एकनाथ शिंदे.......
(२) प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. तसेच प्रकल्पाच्या कामाच्या खर्चात वाढ ही मुख्यत: अतिरिक्त कामातील वाढ, वाढीव लांबी, संरचनेत करण्यात आलेले आमूलाग्र बदल इ. कारणामुळे झाली आहे.
(३) व (४) सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

---------

असुधारित प्रत

## परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडमधील पुनर्विकास प्रकल्पात एफएसआयचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * ११७८८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडच्या ठिकाणी राबविण्यात येत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पात पूर्वी अस्तित्वात नसलेल्या खोल्या/ गाळे दाखवून चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) व प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र निर्देशकांचा लाभ घेण्यात आल्यामुळे पुनर्विकास प्रकल्पात एफएसआयचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुनर्विकास प्रकल्पात एफएसआयचा गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड :** (१) मुंबई इमारत व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अहवालानुसार, परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडच्या ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या पुनर्विकासाबाबत अर्जदार श्री.तुलसीदास नायर यांनी दिनांक २५/१०/२०२१ रोजी शासनास तक्रार दाखल केली आहे.

(२) म्हाडा प्राधिकरणाच्या अहवालानुसार, अशी बाब निर्दशनास आलेली नाही. तथापि, प्रश्नाधीन बाब शासनस्तरावर तपासण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, तक्रारदाराने दिनांक २५.१०.२०२१ रोजी तक्रार केली होती. सदर कामामध्ये बराच विलंब झालेला आहे. सदर विलंबाचे कारण काय आहे ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, यामध्ये विलंब झालेला आहे असे वाटत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७८८......

**सभापती :** मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यामुळे विलंब झालेला आहे हे गृहीत धरावे लागेल.

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, तपासून घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

## चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(८) * १२३३७ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, सावली, पोंभूर्णा, भद्रावती, सिन्देवाही, चिमूर तालुक्यात वाघाने हल्ला केल्यामुळे गत २ महिन्यात १० नागरिकांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिडीत कुटुंबियांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अद्यापपर्यंत किती कुटुंबियांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) माहे नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक २ जानेवारी, २०२२ या कालावधीत चंद्रपुर जिल्ह्यामध्ये वाघाच्या हल्ल्यात ७ व्यक्तींचा मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) सदर ७ प्रकरणांपैकी ४ प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ३ प्रकरणांमध्ये तात्काळ मदत म्हणून रुपये ५.०० लक्ष प्रत्येकी अदा करण्यात आले असून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता होताच मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास उर्वरित अर्थसहाय्य अदा करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

--------

## राज्यात विशेषत: नागपूर महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या

**वारसांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत**

**(९) * १२६२० श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड समितीच्या शिफारशीनुसार व दिनांक ११ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत सामावून घेतले नसल्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ पासून आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाचे दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मूळ ऐवजदार कार्ड असलेल्या आणि २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या ४४०७ सफाई कामगारांची अधिसंख्य पदे निर्मित करुन त्यांना नागपूर महानगरपालिकेत सामावून घेणेकरीता मान्यता दिली असून अनुषंगिक कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात विशेषत: नागपूर महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २० सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार नागपूर महानगरपालिकेतील ४४०७ सफाई कामगारांपैकी मूळ ऐवजदार कार्ड असलेले व २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या ३४९५ पात्र सफाई कामगारांना अधिसंख्य सफाई कामगार पदावर नागपूर महानगरपालिकेत सामावून घेण्यात आले आहे.

(३) नगरविकास विभागाद्वारे निर्गमित शासन निर्णयातील दिनांक २० सप्टेंबर, २०१९ मधील अटीनुसार ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर आपोआप व्यपगत होत असल्याने, त्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतेही अधिसंख्य पद निर्माण करण्यात येणार नाही अथवा व्यपगत झालेले पद पुनर्जिवित करता येणार नाही. यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना वारसाहक्काने नियुक्ती देणे शक्य नाही. तथापि,

श्री.एकनाथ शिंदे......
शासन निर्णय दिनांक ११ जुलै, २०१९ नुसार राज्यातील महानगरपालिका मधील पात्र कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना अनुकंपा नियुक्ती योजना लागू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सफाई कामगारांच्या काही मागण्या आहेत. शासन पात्र वारसदारांना नियुक्तीच्या योजने संदर्भात कोणती कार्यवाही करीत आहे ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेत ऐवजदार जे कर्मचारी घेतलेले आहेत त्यांची सन २०१९ मध्ये अधिसंख्य पदे निर्माण केलेली आहेत. आपण ४७०० पैकी बऱ्याच कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदे निर्माण करुन घेतलेले आहे आणि ऊर्वरित कर्मचाऱ्यांना घेण्याबाबतची प्रक्रिया देखील सुरु आहे. शासनाने या संदर्भात व्यवस्थित कार्यवाही केलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यातील सर्व महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी एकच नियम करण्यात येणार आहे काय ? मुंबई महानगरपालिका किंवा ठाणे महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या बाबतीत जे धोरण आहे तेच धोरण राज्यातील महानगरपालिकेत कॉमन राहणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मुंबई महागनरपालिकेचा ॲक्ट वेगळा आहे. मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका आणि नगरपरिषदेचे ॲक्ट वेगवेगळे आहेत...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अपवाद आहे. मी ठाणे महानगरपालिकेचा उल्लेख केलेला आहे. मुंबई महानरपालिका असली तरी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सर्व नियम सारखेच आहेत. सफाई कामगारांच्या बाबतीत मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर अशा सर्व महानगरपालिकेत एकच सूत्र निश्चित करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री.सांगळे.....

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा अधिनियम १८८८ आहे. उर्वरित महानगरपालिकांचा अधिनियम १९५० असून तो वेगळा आहे. उर्वरित महानगरपालिकांच्या संदर्भात एकच नियम आहे. सफाई कामगारांच्या संदर्भात सन २०१६ मध्ये लाड पागे समितीने निर्णय दिला होता. हा विषय सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे. आम्ही या संदर्भात सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांसमवेत एकत्रित बैठक घेऊ. या संदर्भात काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. यापूर्वी काही लोक वारसाहक्काने नोकरीमध्ये लागले आहेत. त्यात वाल्मिकी समाज सोडून इतर लोक लागले आहेत.

**सभापती** : मी माननीय मंत्री यांना सांगू इच्छितो की, हा विषय महानगरपालिकेशी संबंधित नाही तर नगरपालिकांमध्ये देखील हा विषय आहे. वारसाहक्क.... आपण सगळेच घ्यावे.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, आपण ते एकत्रित करु.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा विषय सफाई कामगाराच्या संदर्भात आहे. हा विषय नगरविकास विभागाकडे चर्चेला आला असला तरी सफाई कामगारांचे संपूर्ण प्रश्न सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे येतात. माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे यासंबंधी तत्काळ बैठक घेऊन राज्यातील सफाई कामगारांचे सर्व प्रश्न त्यात निकाली काढू. त्यापूर्वी मला सदनात दोन गोष्टी आवर्जून सांगायच्या आहेत. सफाई कामगारांच्या संदर्भात सन २०१६ आणि २०१८ मध्ये शासन निर्णय झाले होते. सन २०१८ च्या शासन निर्णयामध्ये नवबौद्ध व इतर मागासवर्गीय सफाई कामगार असे नमूद केले असल्यामुळे अनेक ठिकाणी जे लोक या कॅटेगरीमध्ये नाहीत, परंतु पिढयानंपिढया सफाईची कामे करीत आहेत. त्या सफाई कामगारांना न्याय मिळू शकला नाही. त्यामुळे आम्ही सन २०१८ च्या शासन निर्णयासंबंधी पुनर्विचार करीत आहोत. तो विचार करीत असताना शासनाने ४२ वर्षापूर्वी लाड पागे समितीच्या शिफारशी स्वीकारल्या व त्यानंतर शासनाने वेगवेगळे निर्णय घेतले. ४२ वर्षांपूर्वी लाड पागे समितीने केलेल्या शिफारशी

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.धनंजय मुंडे.....

आणि २१ व्या शतकामधील सफाई कामगारांचे निर्माण झालेले प्रश्न यात मोठी तफावत आहे.

**सभापती** : ही बाब मान्य आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लाड पागे समितीप्रमाणे सन २०१८ च्या शासन निर्णयाची पुनर्रचना करुन सफाई कामगारांना न्याय मिळावा या मताचे हे सरकार आहे. ४२ वर्षांपूर्वी शासनाने सफाई कामगारांच्या संदर्भात लाड पागे समिती गठीत केल्यानंतर त्या समितीने सफाई कामगारांच्या संदर्भात शिफारशी केल्या होत्या. एक सफाई कामगार असेल, त्याची नोंद एका ठिकाणी असेल आणि तो सफाई कामगार निवृत्त झाल्यानंतर त्याच्या मुलाला किंवा मुलीला त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार...(अडथळा)... याकरिता शासनाने लाड पागे समिती गठीत केली होती. आता महानगरपालिका किंवा नगरपालिका असो, त्यांच्याकडून सफाई कामगारांना न्याय दिला जात नसल्यास लाड पागे समितीची शिफारस म्हणून सामाजिक न्याय विभाग हा संबंधित संस्थांना ते सफाई कामगार आहेत, त्यांना तुम्ही नेमले पाहिजेत. असा आदेश शासन निर्णयानुसार दिला जातो. परंतु सन २०१८ मधील शासन निर्णय थोडा क्लिस्ट असल्यामुळे तो सुटसूटीत व्हावा याकरिता आम्ही तत्काळ कार्यवाही करणार आहोत.

**सभापती** : मंत्री महोदय, माझी आपल्याला यासंबंधी अशी सूचना राहील की, राज्य, जिल्हा व नगरपालिका पातळीवर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या अनेक संघटना कार्यरत आहेत. मला खात्री आहे की, आपल्याकडे तसेच माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्याकडे त्या संघटनाकडून यासंबंधी हजारो निवेदने आलेली असतील. आपण ती सर्व निवेदने एकत्रित करुन त्याचा अजेंडा तयार करावा. त्यानंतर त्यांच्या कोणकोणत्या अडचणी आहेत हे आपण बघू या. माझ्या येथील नगरपालिकेसंबंधी मी आपल्याला सांगू इच्छितो की, वाल्मिकी समाजातील लोकांना

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२६२०....

**सभापती**.....

लोकांना तेथे अनुकंपा तत्त्वावर चतुर्थश्रेणीमध्ये नोकरीमध्ये घेण्यात आले आहे. परंतु आज ती मुले खूप शिकलेली आहेत. ती मुले चतुर्थश्रेणीमध्ये काम करीत असली तरी प्रत्यक्षात ते आयटीचे काम बघतात. अशी सध्या परिस्थिती आहे. त्यामुळे मी आपण जी काही माहिती दिली त्याच्याशी मी सहमत आहे. मी नगराध्यक्ष राहिलो असल्यामुळे मला हे सर्व प्रश्न माहीत आहेत. ४२ वर्षांपूर्वी लाड पागे समिती झाली होती. त्या समितीने केलेल्या शिफारशी सन २०२२ मध्ये घेतल्यास ते थोडे चुकीचे होईल. काही ठिकाणी क्लॅरिफिकेशन लागेल, काही ठिकाणी नवीन अडचणी असतील.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, राज्यात अद्याप लाड पागे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नाही, ही बाब सत्य आहे. सदनामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला होता की, राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी लागू करणार आहात का ? बृहन्मंबई महानगरपालिका सोडल्यास राज्यातील उर्वरित महानगरपालिकांमध्ये एकाच वेळी लाड पागे समितीच्या शिफारशी ॲप्लीकेबल ठरणार नाहीत. याचे कारण असे आहे की, प्रत्येक महानगरपालिकेची परिस्थिती काही प्रमाणात वेगळी आहे. सभापती महोदय, या संदर्भात फक्त सामाजिक न्याय विभागासमवेत बैठक घेऊन उपयोग होणार नाही तर नगरविकास विभागासमवेत बैठक घेणे गरजेचे आहे. तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यासंबंधीचा त्यांचा एक मुद्दा प्रलंबित आहे.....

**सभापती** : हा विषय वेगळा आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, हा विषय त्यातील आहे. आपण लाड पागे समितीची वेगळी समिती करण्यासाठी किती कालावधी लागू शकेल हे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.अभिजीत वंजारी.....

आपण आता सांगू शकत नाही. त्यामुळे लाड पागे समितीच्या ज्या शिफारशी लागू करण्यासारख्या आहेत त्या तातडीने लागू कराव्यात अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : या संदर्भात माझ्या दालनात बैठक होईल त्यावेळी आपण आपले म्हणणे मांडावे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय नगरविकास मंत्री व माननीय सामाजिक न्याय मंत्री यांचा आदर राखून मी हा प्रश्न विचारत आहे. सभापती महोदय, आपण या विषयाकडे नेमके लक्ष वेधलेले आहे. वारसाहक्काने कोणालाही नोकरी देता येणार नाही. दुसरी बाब अशी आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ही कामे सोडावीत असे सांगितले होते. दुसरी अडचण अशी आहे की, मुंबई महानगरपालिकेत घर मिळते म्हणून त्यांच्या मुलांनी किती शिक्षण घेतले तरी त्यांची मुले त्याच नोकरीमध्ये लागतात. आपल्याला त्यांना त्या व्यवसायातून बाहेर काढण्यासाठी वारसाहक्क करायचा असल्यास आपण त्यांना इतर पदांमध्ये आरक्षण दिले पाहिजे. त्यामुळे कृपा करुन पुन्हा त्याच कामामध्ये त्यांना आरक्षण देणे.....

**सभापती** : या सवंर्गातील एखाद्या व्यक्तीने वारसाहक्काने नोकरीची मागणी केल्यास आपण त्याला काय करु शकतो ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, भारतीय संविधान आल्यानंतर हा विषय संपतो. तसेच वारसाहक्क मान्य करणे याचा अर्थ जात व्यवस्था मान्य करणे असा आहे. त्यामुळे किमान या सदनामध्ये तशा प्रकारचा उल्लेख होता कामा नये की, ज्याचा उल्लेख वाल्मिकी समाज म्हणून केला आहे. सभापती महोदय, या विशिष्ट समाजामधून त्या मुलांना बाहेर काढण्याची आवश्यकता आहे. त्यांना पुन्हा वारसाहक्काच्या नावाखाली सफाई करण्यास लावणे आणि गटारांमध्ये काम करण्यास सांगणे ही अत्यंत शरमेची बाब आहे. सभापती महोदय, आपण कृपा करुन

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.कपिल पाटील.....

याकरिता पुन्हा नव्याने एक समिती तयार करावी. शिकणाऱ्या मुलांना त्यातून बाहेर काढावे. परंतु वारसाहक्काने पुन्हा त्यांनी त्या व्यवसायात जाणे ही त्यांची मजबुरी असते. आपल्याला घर मिळते, नोकरी मिळते म्हणून माझा मुलगा कितीही शिकला तरी तो तेच काम करणार. असे यापुढे होता कामा नये.

**सभापती** : ते मान्य आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. ही बाब खरी आहे. सफाई कामगार, वेठबिगार कामगार किंवा ऊसतोड कामगार असो, काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, अतिघोर श्रम करणाऱ्या लोकांचे श्रम कमी झाले पाहिजे. विशेषत: सफाई कामगारांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की, त्यांचे श्रम कमी झाले पाहिजे. सदर सफाई कामगार मॅनहोलमध्ये जातात. त्यांनी मॅनहोलमध्ये जाता कामा नये. त्याऐवजी तेथे मशीन लावून मॅनहोलमधील सफाई केली पाहिजे. अशा प्रकारे सर्वोच्च न्यायालयाने भूमिका मांडल्यानंतर केंद्र व राज्य शासनाने तीच भूमिका स्वीकारली आहे. त्यामुळे सदर भूमिका पार पाडायची असेल आणि लाड पागे समितीच्या शिफारशी ह्या पूर्णत: विसंगत आहेत. मी सदनाला तसेच सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगतो की, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी सुरुवातीला असे सांगितले की, ३-४ विभागांची एकत्रित बैठक घेऊ. सभापती महोदय, आपल्याला सफाई कामगारांसाठी नवीन धोरण आणावे लागेल. लाड पागे समितीच्या बाबतीत येणाऱ्या काळात पुढील २५ वर्षांमध्ये ज्या अडचणी येणार आहेत त्यासंबंधी आपल्याला माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आपण ३-४ जण एकत्रित बसून आपल्याला राज्याचा एक आराखडा तयार करावा लागेल. जेणेकरुन सफाई कामगारांचे श्रम कमीत कमी होऊन तेथे जास्तीत जास्त मॅकेनिझम झाले पाहिजे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.धनंजय मुंडे.....

तसेच सफाई कामगार व त्याच्या वारसाहक्काचा विषय आपण सदरहू बैठकीमध्ये चर्चा करुन निकाली काढू.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, दिनांक २० सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार नागपूर महानगरपालिकेतील ४४०७ सफाई कामगारांपैकी मूळ ऐवजदार कार्ड असलेले व २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या ३४९५ पात्र सफाई कामगारांना अधिसंख्य सफाई कामगार पदावर नागपूर महानगरपालिकेत सामावून घेण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित एक हजार सफाई कर्मचाऱ्यांसंबंधी कोणती कार्यवाही केली आहे ?

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२६२०....

श्री.विनायक मेटे .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी प्रश्न विचारला होता तो मी पुन्हा विचारतो. मुंबई महानगरपालिकेचे नियम व कायदे वेगळे आहेत. तो कायदा इतर महानगरपालिका व नगरपालिकांसाठी एकत्र करणार का. तसेच या विषयी आपल्या उपस्थितीत बैठक आयोजित करणार का.

------

असुधारित प्रत

**राज्यातील अनुकंपा तत्वावरील वारसांना लाभ देण्याकरीता नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत**

**(१०) * १२५७८ डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.विलास पोतनीस, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची मर्यादा ब-वर्ग नगरपालिकेसाठी ५५% व क-वर्ग नगरपालिकेसाठी ६०% ठरवून दिलेली असल्यामुळे व नगरपालिकेचा खर्च सध्याच्या स्थितीत जास्त असल्याने अनुकंपा तत्वावरील वारसांना लाभ देणे शक्य होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्त्वावरील वारसांना लाभ देण्यासाठी नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन खात्यातील सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त व माजी कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळत नसल्याने महापालिकेच्या २४ प्रभागांत मिळून गेल्या वर्षभरात जवळपास १५० हून अधिक अनुकंपा नोकरीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने यासंदर्भात ऑनलाईन पध्दत अवलंबविल्यानंतर सफाई कामगारांची देणी आणि अनुकंपा तत्वावरील नोकरी मिळण्याचा प्रलंबित कालावधी वाढत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन खात्यातील सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त व माजी कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२५७८ .....

**श्री.प्राजक्त तनपुरे, श्री.एकनाथ शिंदे यांच्याकरीता :** (१) व (२) अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत केली जाणारी वारसाची नियुक्ती त्याच कर्मचाऱ्याच्या रिक्त झालेल्या पदावर करण्यात येते. त्यामुळे अनुकंपा तत्वावरील प्रकरणांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा लागू राहत नाही.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागातील सर्व कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू असल्यामुळे माजी कर्मचारी सेवेत कार्यरत असताना मृत्यू/ सेवानिवृत्ती/ स्वेच्छानिवृत्ती/ वैद्यकीयदृष्टया सेवेसाठी अपात्र झाल्यास त्यांच्या पात्र वारसाला वारसाहक्क पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरी दिली जाते.

(४), (५) व (६) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मानव संसाधन कार्यप्रणालीत दिनांक ०१/११/२०१९ ते दिनांक ०१/०१/२०२२ या कालावधीत घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित प्राप्त एकूण १४२६ दाव्यांपैकी ९६० दाव्यांचे अधिदान करण्यात आले आहे. उर्वरित ४६६ दाव्यांचे अधिदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात अनुकंपा तत्वावरील नोकरी देताना महानगरपालिकेच्या दिनांक १०/०६/२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार लागणाऱ्या कायदेशीर कागदपत्रांची अनुकंपा तत्वावरील उमेदवारांकडून वेळेत पूर्तता करण्यात आल्यास सदर प्रकरणे ऑनलाईन/ ई-ऑफिसमार्फत तात्काळ निकाली काढणे शक्य होते. त्यामुळे प्रलंबित कालावधी कमी होतो असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, कर्मचारी दगावल्यानंतर अनुकंपा तत्वावर वारसांना लाभ देत असताना नगरपालिकांना आस्थापना खर्चाची अट घातलेली आहे. या कारणास्तव अनुकंपाची अनेक प्रकरणे नाकारली जातात किंवा प्रलंबित ठेवली जातात. मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, अनुकंपासाठी अशी ही अट लावता येणार नाही. परंतु खालच्या पातळीवर या गोष्टीची सुस्पष्टता नाही, माझी पहिली विनंती आहे की, अशी सूचना आपण खालच्या पातळीपर्यंत देणार का. त्याच

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२५७८ .....

श्री.प्राजक्त तनपुरे .....

न्यायाने मुंबई महानगरपालिकेतसुध्दा घनकचरा व्यवस्थापन खात्यातील अनेक कर्मचारी अनुकंपा वारसाहक्कापासून प्रलंबित आहेत, ती प्रकरणे लवकरात लवकर आपण केव्हा मार्गी लावणार आहात.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, नगरपालिकाविषयी अशी कोणतीही आस्थापना खर्चाची अट नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे खाली तशा सूचना दिलेल्या नसतील तर अशा सूचना शासन निर्गमित करीन. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचऱ्याबाबत आपण प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबत उत्तरात दिलेले आहे की, १४२६ दाव्याकरीता आपण नवीन सॉफटवेअर आणले आहे. सर्व सिस्टीम ऑनलाईन केली आहे. एसएपीसुध्दा अकाऊंटमध्ये आहे. त्यानंतर १४२६ दाव्यापैकी ९६० दाव्यांचे निराकरण झालेले आहे. उर्वरित दाव्यांची कार्यवाही देखील सुरु आहे. त्यात काही अडचणी येतात, सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा सेवा अभिलेख अपूर्ण असणे, अनिर्णयीत रजेचा प्रश्न असणे, टेक्नीकल मुद्दयांची खातरजमा होणे आवश्यक आहे. अशा बाबी निकाली निघाल्या की, बाकी कोणतीही अडचण त्यामध्ये येत नाही.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उत्तर मागितले तेव्हाचे उत्तर व आताच्या उत्तरामध्ये तफावत असल्याचे दिसत आहे. आपण उत्तर देताना म्हटले आहे की, अनुकंपा नियुक्ती योजनेअंतर्गत केली जाणारी वारसाची नियुक्ती त्याच कर्मचाऱ्याच्या रिक्त झालेल्या पदावर करण्यात येते. त्यामुळे अनुकंपा तत्वावरील प्रकरणात आस्थापना खर्चाची मर्यादा लागू होत नाही.

**सभापती** : बरोबर आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, त्यांनी अशी विनंती केली की, मेहतर समाज किंवा घनकचरा गोळा करणारे कर्मचारी असतील, त्यांची वारसाहक्काने अनुकंपा तत्वावर नोकरी देत असताना त्यांची शैक्षणिक पात्रता किंवा ज्या जागा रिक्त

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२५७८ .....

श्री.शशिकांत शिंदे .....

असतील त्याच जागेवर देणार असे सांगितले गेले. दोन्ही उत्तरात तफावत वाटत असल्याने मी हे सांगितले आहे.

**सभापती** : मीच त्यांना सांगितले आहे की, ही मुले शिकलेली असतात. वारसाहक्काने नोकरीस लागली तरी तेथे चतुर्थश्रेणी मध्ये राहून रेकॉर्डवर तेच काम करतात ज्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी हरकत घेतली आहे. याबाबत माझ्या दालनात बैठक होईल तेव्हा आपण उपस्थित राहावे. त्या बैठकीत आपण निर्णय घेऊ.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, आस्थापना खर्चाचा निकष येतच असतो. तरीसुध्दा माझी विनंती आहे की, मघाच्या निर्णयाप्रमाणे रिक्त जागेवर शैक्षणिक पात्रतेप्रमाणे वारसा हक्काच्या माध्यमातून अनुकंपा तत्वावर समाविष्ट करुन घेणार आहात का ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विषय मांडला होता व मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, मेहतर समाज असेल किंवा घनकचरा गोळा करणारे कर्मचारी यांची वारसाहक्काने अनुकंपा तत्वावर नोकरी देत असल्याचे म्हटले आहे. आमचे म्हणणे आहे की, महानगरपालिकेत रिक्त असलेल्या जागा व त्यांचे वारस त्या शैक्षणिक पात्रतेत बसत असतील तर त्यांना प्राधान्य देणार आहात का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ सफाई कामगारांना नसून अनुकंपा तत्वाचा जनरल विषय आहे. नगरपालिकेत आस्थापना खर्चाची कोणतीही अट नसते. सन्माननीय सदस्यांनी मुंबई महानगरपालिकेबाबत सुरुवातीस विषय उपस्थित केला होता. आता बैठकीबाबत ठरले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

ता.प्र.क्र. १२५७८ .....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील या प्रश्नावर बोलले आहेत की, अशी व्यवस्था नष्ट झाली पाहिजे. म्हणजे जातीनिहाय काम करण्याची पध्दत घटना लिहिताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत नव्हती. त्यांचा अर्थ आपण व्यापक घेतलेला नाही असे मी सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छितो. माथाडी कामगाराचा मुलगा माथाडी कामगार झाला पाहिजे का. माझा त्याला विरोध आहे. पण तुम्ही युनियन म्हणून आरसीएफमध्ये करार केला आहे. १०० माथाडयांची मुले इंजिनियर झालेली आहेत. बी.कॉम. किंवा एम.कॉम. झालेली आहेत. ती मुले अलिबागच्या आरसीएफमध्ये माथाडी कामगारांचे काम करीत आहेत. मला त्याचे दुःख होते. शैक्षणिक पात्रतेप्रमाणे मुलांना काम मिळाले पाहिजे याचा अधिकार व कायदा पाहिजे. ती जबाबदारी युनियन म्हणून तुमची आहे.  त्यामुळे तो करार रद्द करावा. असा करार करावा की, माथाडयांचा मुलगा तेथे आला आहे, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विचारले ते बरोबर आहे त्याला मंत्री महोदयांनी बगल दिली आहे. त्यांना अभिप्रेत असलेले त्यांना मांडता आले नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील माझ्याएवढे जोरात बोलत नाहीत, ते साने गुरुजींच्या सेवादलात तयार झालेले आहेत. त्यामुळे ते त्या पध्दतीने बोलतात.

सभापती महोदय, आपण गांभीर्याने लक्षात ठेवावे की, तुमच्या भागातील लोकही यामध्ये आहेत. ते बदलले पाहिजे, तुम्ही बोलता ते बरोबर नाही. यामध्ये राज्य शासनाने कोठे तरी कायदा केला पाहिजे. इंजिनियर झालेला मुलगा माथाडी काम करतो हे त्याला शोभणारे नाही असे माझे म्हणणे आहे, याबाबत राज्य शासन काय निर्णय घेणार?

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, श्री.जयंत प्र.पाटील यांनी आरसीएफचा उल्लेख केला आहे. खरे तर स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांचेही असेच स्वप्न होते की, माथाडी कामगारांचा मुलगा माथाडी राहू नये. आता पटलावर आले आहे म्हणून सांगणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे अनेक मुले डॉक्टर झालेले आहेत. राजीनामा

ता.प्र.क्र. १२५७८ .....

श्री.शशिकांत शिंदे .....

दिल्यावर कामगारांचा मुलगा नोकरीत लागतो, त्याला कोणी जबरदस्ती करीत नाही, त्याची इच्छा असते म्हणून तो तेथे कामाला जातो. त्याला कोणी कंपलसरी करीत नाही. तुमचे म्हणणे बरोबर आहे. आरसीएफमधील भरती केंद्र सरकारकडून होते. त्यांच्या नियम व निकषात बसले तर ते नोकरीस घेतात.

**सभापती** : आरसीएफचे आपण नंतर पाहूया, यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे बोलणार आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपणास ज्ञात आहे की, महाराष्ट्रातील मुंबई महानगरपालिका ही श्रीमंत आहे. महसूल जमा होण्याच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकाची महानगरपालिका आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, १४२६ दाव्यापैकी ९६० दाव्यांचे अधिदान करण्यात आलेले आहे. उर्वरित ४६६ दावे हे तीन वर्षातील आहेत. निधी उपलब्ध असताना यांची देय रक्कम का दिली जात नाही हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, एखादा प्रश्न सभागृहात येतो तेव्हा त्यांना काय न्याय मिळणार आहे म्हणून त्याच्याशी संबंधित लोक मोठया आशेने तुमच्याकडे पाहतात. या ४६० दाव्यांचे अधिदान किमान ३१ मार्चच्या आत करण्याबाबत आपण ठोस निर्णय घेणार का ?

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५७८........

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर देताना मी यापूर्वीच सांगितले होते की, मुंबई महानगरपालिकेने काही अद्ययावत कार्यप्रणाली ऑनलाईन स्थापन केलेली आहे. जेणेकरुन ही प्रकरणे निकाली निघावीत या दृष्टीने आपण हे सर्व आज्ञाप्रणाल्या नवीन बसविलेल्या आहेत. सर्व ऑनलाईन होऊन पटकन न्याय मिळावा याकरिता हे ऑनलाईन करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, परंतु जरी काही ऑनलाईन असेल तरीही शेवटी काही ज्या तांत्रिका बाबी असतात, प्रलंबित निवृत्तीधारकांची याकरिता काही कारणे आहेत. प्रलंबित सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची सेवाभिलेख अपूर्ण असतील, त्याच्या अनिर्णित रजेचा प्रश्न असेल, त्याची महानगरपालिकेचे सेवा निवासस्थान रिक्त न केलेले असा काही विषय त्यामध्ये असण्याची शक्यता आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या काही विभागीय चौकश्या प्रलंबित असतील, असे विविध तांत्रिक मुद्दे असतील, त्यामुळेच हा विलंब लागत आहे, तरी देखील आम्ही मुंबई महानगरपालिकेकडून याचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. याबाबतच्या सर्व विषयांच्या खोलात जाऊन ते निकाली काढण्यात येतील.

श्री.किशोर दराडे :सभापती महादेय, सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी करायला लावतो, परंतु ते डयुटीवर असताना देखील त्याच्या व्यतिरिक्त इतर कर्मचारी देखील तेथे त्या जागेवर कामाला लावले जातात, त्याचे काय ? हजेरीकरिता त्याव्यतिरिक्त दुसरे देखील कर्मचारी काम करीत असतात.

**सभापती :** हा विषय नगरपालिकेचा असून यामध्ये मंत्रीमहोदय काय करणार ? पुढे जाऊ, चला, जाऊ द्या !

------------

असुधारित प्रत

## हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे नगरपंचायत स्थापन करण्याबाबत

**(११) * १२५६५ श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे नगरपंचायत स्थापन करण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार मंचाचे अध्यक्ष यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ रोजी बेमुदत उपोषण सुरु केले होते, उक्त कालावधीमध्ये लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी हिवरखेड येथे नगरपंचायत स्थापन निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हिवरखेड ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केल्यानंतर, शासनाने प्रस्तावाची तपासणी करुन सदर प्रस्तावातील अपुरी माहिती व कागदपत्रे सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांना दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे, याबाबतचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त असल्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अहवाल प्राप्त होऊन हिवरखेड नगरपंचायत स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून दिनांक १२ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचेकडील सुधारित माहितीसह दिनांक ८ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

ता.प्र.क्र.१२५६५.....

(३) हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी ग्रामपंचायतीने दिनांक २९/०४/२०२१ रोजी सर्वानुमते ठराव पारित केला आहे. मात्र हिवरखेड ग्रामसभेने दिनांक २१/०८/२०२१ रोजी बहुमताने ठराव पारित करुन हिवरखेड नगरपंचायत करण्यास विरोध दर्शविला आहे.

याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, हिवरखेड ही अकोला जिल्हयातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. सध्या या प्रश्नावर चर्चा होत असताना, सर्व गावकरी, ज्यांनी याकरिता प्रयत्न केलेले आहेत, ते सर्व लोक या प्रश्नाकडे लक्ष ठेवून आहेत. माझे या प्रश्नाच्या लेखी उत्तरावर केवळ तीन प्रश्न आहेत. हिवरखेड ग्रामसभेने दिनांक २१.०७.२०२१ रोजी बहुमताने ठराव पारित करुन हिवरखेड नगरपंचात करण्यास विरोध दर्शविला होता, परंतु ०७.०३.२०२२ रोजी हिवरखेड ग्रामसभेने ग्रामपंचायत कार्यालयांच्या सभागृहात विशेष ग्रामसभेचे आयोजन केवळ हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपंचायत तथा नगरपरिषद करणेबाबत सर्वानुमते ठराव पास करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय ? त्याची शासनाने दखल घेतलेली आहे का ? सदर प्रश्न आजपर्यंत अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत का ? गेल्या २५ वर्षांपासून चालू असलेल्या जनतेच्या सामुहिक लढयाला अनुसरुन शासनाने नगरपंचायत करण्यात करण्याकरिता तातडीने निर्णय घेऊन याबाबतची घोषणा निश्चित कालावधीमध्ये करण्यात येणार आहे का ? याबाबतची घोषणा माननीय मंत्रीमहोदय कधीपर्यंत करतील ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हिवरखेड, ता.तेल्हार, जि.अकोला ही नगरपंचायत स्थापन करण्यासाठी त्यांचा आग्रह आहे, त्या दृष्टीने काही ग्रामसभा देखील झाल्याचे आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. पहिल्या ग्रामसभेमध्ये हिवरखेड नगरपंचायत होण्याच्या विरोधात ठराव पारित केला गेला होता. आताच काही दिवसांपूर्वी दुसऱ्या ग्रामसभेत बहुमताने नगरपंचायत करण्याचा ठराव पारित करण्यात आला होता. याची जी प्रोसिजर आहे, त्याच्यामध्ये पहिल्यांदा प्राथमिक घोषणा करावी लागते. ग्रामपंचायतीचे नगरपालिकेमध्ये किंवा नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याकरिता ज्या ज्या तांत्रिक

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५६५.....

श्री.प्राजक्त तनपुरे.....

बाबी आहेत, म्हणजे लोकसंख्या असेल, कृषीवर आधारित नसलेल्या लोकसंख्येचे पर्सेंटेज असेल अशा विविध ज्या काही तांत्रिक बाबी आहेत, त्या तपासून पहिल्यांदा प्राथमिक घोषणा केली जाते. या सर्व बाबी प्राथमिक घोषणा केल्यानंतर महिनाभरात हरकती आणि सुनावण्या कोणाच्या असतील तर त्याकरिताही मुदत दिली जाते. हरकती असतील तर त्याच्यावर सुनावण्या घेतल्या जातात. ग्रामविकास विभाग त्याच्यावर कारवाई करते, त्याच्यामध्येही ग्रामसभेचा निर्णय होणे अपेक्षित आहे. जिल्हापरिषदेच्या स्थायी समितीने देखील याबाबत त्यांचे मत घेतले जाते. अशा प्रकारची ही सर्व प्रक्रिया आहे, याच्यामध्ये आता प्राथमिक उद्घोषणा होण्याच्या प्रक्रियेपर्यंत आलेल्या आहेत. सर्व तांत्रिक बाबी सर्वांसमोर आलेल्या आहेत. महिनाभरात या सर्व तांत्रिक बाबी जर योग्य असतील तर.....(अडथळा).... या सर्व बाबी तपासून... एक महिनाभराच्या आत ही प्राथमिक उद्घोषणेची बाब निकाली काढण्यात येईल.

-----------

असुधारित प्रत

## ठाणे शहरातील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(१२) * १२४९० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच गुन्हेगारांना पकडण्यासाठी शहरात लावलेले सीसीटीव्ही उपयुक्त ठरत असून ठाणे शहरातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी नगरसेवक निधी आणि स्मार्ट सिटीमधून ठाणे शहरात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे चांगले नसल्याचा अहवाल ठाणे पोलिसांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक पोलिसांनी ८ ते ९ महिन्यांपूर्वी शहरात १४८ कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करुन अद्याप त्यास मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यांच्या जागी नवीन कंपनीचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्याची शिफारस ठाणे पोलिसांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे शहरात अत्याधुनिक नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे शहरात नगरसेवकांच्या प्रभाग सुधारणा निधीतून शहरातील विविध ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे विविध गुन्हांचे तपासाकरीता उपयुक्त असलेले फुटेज पोलीस विभागाने ठाणे महानगरपालिकेकडून घेतल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

सध्या उभारणी केलेले सीसीटीव्ही कॅमेरे परिणामकारक व अधिक उपयुक्त बनविण्याकरीता विविध बाबींची सुधारणा होण्याबाबतचा अहवाल ठाणे पोलिसांनी ठाणे महानगरपालिकेस दिलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२४९०
श्री.एकनाथ शिंदे....

(२) ठाणे शहरातील ९ वाहतूक घटकांच्या हद्दीतील महत्वाचे जंक्शन/ एन्ट्री व एक्झीट पॉईंट या ठिकाणी १२२ ANPR कॅमेरा, २८ PTZ कॅमेरा इ. उपकरणे बसविण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रुपये २.९९ कोटीच्या प्रस्तावांतर्गत दिनांक ०२/११/२०२१ च्या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीतील सूचनेनुसार कार्यवाही केली जात असल्याची बाब गृह विभागाने कळविली आहे.

(३) सध्या उभारणी करण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे परिणामकारक व अधिक उपयुक्त बनविण्याकरीता विविध बाबींची सुधारणा होण्याबाबतचा अहवाल ठाणे पोलिसांनी ठाणे महानगरपालिकेस दिलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(४) ठाणे शहरात मोफत वाय-फाय प्रकल्प अंतर्गत, पोलीस विभागाकडून शिफारस केलेले बुलेट टाईप या मॉडेलचे ४ MP HD सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

**मुंबईतील सार्वजनिक शौचालयांत सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रियेद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१३) * १२०५० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईला दररोज ३,८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येत असून यापैकी ७० ते ८० टक्के पाणी शौचालय, आंघोळ, गाड्या धुणे व अन्य कामांसाठी वापरण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शौचालयांमध्ये पिण्याच्या पाण्याचा वापर केल्याने पाण्याचा अपव्यय होत असून पाण्याच्या कमतरतेमुळे मुंबईत अनेकवेळा पाणी कपात करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमध्ये वर्दळीच्या ठिकाणी ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी ८८७ सार्वजनिक शौचालये बांधलेली असून त्यातील बहुतांश ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील सार्वजनिक शौचालयात सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रियेद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहर व उपनगरास सध्या ३,८५० द.ल.लि. प्रतिदिन इतका पाणीपुरवठा केला जातो. त्यापैकी ८४% पाणीपुरवठा हा निवासी वापराकरीता तर १६% पाणीपुरवठा व्यावसायिक व औद्योगिक वापराकरीता केला जातो. यापैकी अनुक्रमे ३३% व ४४% पाणी दुय्यम वापरासाठी जसे की, शौचालय, आंघोळ, गाड्या धुणे व अन्य कामांसाठी वापरण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पाणी कपात ही मुख्यत्वे पावसाळा लांबल्यामुळे किंवा तलावात अपुरा पाणी साठा असेल तेव्हाच करण्यात येते. तसेच, काही वेळेस तांत्रिक दुरुस्तीच्या कामासाठी काही ठराविक भागात पाणी कपात करण्यात येते. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०५०....

श्री.एकनाथ शिंदे...

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रात “पैसे द्या व वापरा” तत्वावरील सार्वजनिक शौचालयांना जल अभियंता खात्यामार्फत जलजोडण्या दिल्या आहेत व त्यातून निर्माण होणारे सांडपाणी मलवाहिनीस जोडण्यात येत असल्याने सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रियेद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प नियोजित आहेत.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

**जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) * १२४७१ डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामधून प्रलंबित राहिलेल्या दोन टप्प्यातील कामांसाठी गत पाच वर्षांत तीन वेळा टेंडर निघूनही काम झाले नसल्याने सदर महामार्गाची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात येत असताना पाळधी ते खोटेनगर व कालिंकामाता ते तरसोद फाटा या दोन टप्प्यातील काम प्रलंबित असल्यामुळे सदर रस्त्यांचे दुरुस्तीचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील प्रश्नांकित लांबीतील रस्ता रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाची व्दितीय निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ०८/१२/२०२० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

(२) निवेदन प्राप्त नाही.

(३) कोविड परिस्थितीमुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम झाला असून सद्य:स्थितीत सदरचे प्रगतीपथावरील काम जून, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

**आढेगाव पाटी ते गार अकोले (ता.माढा जि.सोलापूर) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१५) * ११७५३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आढेगाव पाटी ते गार अकोले (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जिल्हा प्रमुख मार्ग १२८ ह्या ८ ते ९ किमीच्या रस्त्याचे काम चार महिन्यापूर्वी पूर्ण झाले असूनही साईड पट्ट्या, साईड चर इ. अनेक कामे अद्याप प्रलंबित आहे, तसेच सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्त्यांवरील डांबर निघून खड्डे पडले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांमध्ये अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने करुन कमी प्रमाणात डांबर वापरुन तसेच डांबरामध्ये तेल मिसळून रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार केला असल्याने सदरहू रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी, नागरिकांनी व अनेक संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दोन महिन्यातच दुरवस्था झाली असून साईड पट्ट्या भरण्याचे कामही अपूर्ण असल्याने उक्त रस्त्याच्या कामाची चौकशी करुन बेजबाबदार ‘अक्षया’ ठेकेदार व संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे अन्यथा उपोषण करण्याचा इशारा विश्वकर्मा लोहार विकास संस्थेचे प्रदेशाध्यक्ष यांनी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कुर्डुवाडी यांना निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदार व प्रशासनातील दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) सदरचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे. अतिवृष्टीमुळे रस्त्यावर पडलेले खड्डे संबंधित कंत्राटदाराकडून दुरुस्त करण्यात आले आहेत.

ता.प्र.क्र.११७५३...

श्री.अशोक चव्हाण...

(२), (३) व (४) निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

तथापि, सदर निवेदन गैर समजुतीने दिले असल्याचे दिनांक ०२/११/२०२१ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेने कळविले आहे. सद्य:स्थितीत सदरचे काम करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रगतीत असून, काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक २०/०५/२०२२ पर्यंत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

**नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जुना भंडारा रस्त्यांच्या रुंदीकरणाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) * १२३७९ श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील जुना भंडारा रोड अंतर्गत मेयो चौक ते सुनिल हॉटेल डि.पी. रोडच्या भूसंपादन व निधीच्या तरतुदीचा प्रस्ताव आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडून नगरविकास विभागास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत रुपये १२९.५२ कोटींचा प्रस्ताव सादर केला असून यापूर्वी शासनाच्या हिश्श्यापोटी ७० टक्के निधीची मागणी केली होती, परंतु शासनाने याबाबत सदर प्रस्तावानुसार निधीची तरतूद व आवश्यक निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे रस्त्याचे काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या बांधकामाकरीता ६३१ स्थायी मालमत्ता भूसंपादन करणे गरजेचे असून यापैकी फक्त ४१ स्थायी मालमत्ता ही महानगरपालिकेद्वारा भूसंपादित केली असून उर्वरित मालमत्ता भूसंपादनासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे भूसंपादनाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेतील रस्त्यांच्या कामांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जुना भंडारा रोड मेयो हॉस्पिटल ते शहीद चौक पर्यंतच्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या अनुषंगाने भूसंपादन प्रकल्पास दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर भूसंपादन प्रकल्पातील भूसंपादनाखालील एकूण ६३१ खाजगी मालमत्तेपैकी ४१ खाजगी मालमत्तेचे संपादनासाठी रुपये २५.०९ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आल्याचे नागपूर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच, सदर भूसंपादन प्रकल्पातील राज्य हिश्श्याचा पहिल्या टप्प्याच्या देय निधी वितरणाची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

**अमरावती शहरात मत्स्यपालन केंद्र (फिश हब)**
**निर्मितीस विलंब होत असल्याबाबत**

**(१७) * १२६२७ श्री.प्रविण पोटे-पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात मत्स्यपालन केंद्र (फिश हब) च्या निर्मितीकरीता रुपये ३ कोटी ५९ लक्ष निधी खर्च करण्यात येत असून मत्स्यपालन केंद्रासाठी कोल्ड स्टोरेज बर्फ संयंत्र आणि किरकोळ (रिटेल) विक्रीकरीता अमरावती महानगरपालिकेत ७ वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे कंत्राट मर्जीतील कंत्राटदारास मिळण्याकरीता अमरावती महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी तपशीलवार प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) चे उल्लंघन करुन तसेच तांत्रिक त्रृटी काढून निविदा प्रक्रिया निश्चित करण्यास विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मत्स्यपालन केंद्र निर्मितीस विलंब लावणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

कृषी व पदुम विभागाच्या शासन निर्णय क्र. मत्स्यआ-२०१५/प्र.क्र.१९४/पदुम-१२, दिनांक १७/१०/२०१८ नुसार रुपये २१.८२ कोटीचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. तथापि, कोल्ड स्टोरेज आईस प्लांट फॉर फिशरीज हब आणि रिटेल विक्री करीता कामाची निविदा मागविण्यात आली नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता नोडल एजन्सी, तांत्रिक मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यानुसार महामंडळाने तांत्रिक निविदा तयार करून सादर केलेल्या आहेत. या निविदा प्रसिध्द करणे व निविदा प्रक्रिया पूर्ण करणे अमरावती महानगरपालिकेद्वारा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

------------

असुधारित प्रत

## परभणी जिल्ह्यातील रस्त्यांच्या दुपदरीकरणाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१८) * १२२६५ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील मनाठा पाटी ते मनाठा सावरगाव मार्गे गडग, मुदखेड मार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम गत दोन वर्षांपासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनाठा गावाजवळील मस्जिद व मुस्लीम स्मशानभूमी लगतचा डोंगराळ भाग रस्त्याच्या कामासाठी पोखरला असल्याने याठिकाणी दरड कोसळून रस्ता वाहतूक बंद होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी दरड कोसळण्यासापासून रोखण्याकरीता संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे, श्री.अशोकराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याच्या कामात भौमित्तिक सुधारणा करणेची कामे करण्यात आली आहेत हे खरे आहे. तथापि, दरड कोसळून वाहतूक बंद झालेली नाही.

(३) दरड प्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विप्लव बाजोरिया : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यातील मनाठा पाटी ते मनाठा सावरगाव मार्गे गडग, मुदखेड मार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम गत दोन वर्षांपासून सुरु आहे, हे खरे आहे काय,असल्यास, मनाठा गावाजवळील मस्जिद व मुस्लीम स्मशानभूमी लगतचा डोंगराळ भाग रस्त्याच्या कामासाठी पोखरला असल्याने याठिकाणी दरड कोसळून रस्ता वाहतूक बंद होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
हे कधी दुरुस्त होणार आहे ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२६५....

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्या रस्त्याच्या कामामध्ये भौमितिक सुधारणा करण्याकरिता काही कामे करण्यात आलेली आहेत. तथापि, दरड कोसळून वाहतूक बंद झालेली नाही. दरड प्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याचे शासनाने नियोजन केलेले आहे.

-----------------

असुधारित प्रत

**सांताक्रुज (पू.), मुंबई येथील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१९) * ११८६४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (पश्चिम) उपनगरातील सांताक्रूझ पूर्वेकडील गोळीबार मार्गावरील पंचशील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एसआरए योजनेंतर्गत पुनर्विकासाची योजना शिवालिक डेव्हलपर्समार्फत गत १४ वर्षापासून राबविण्यात येत असून सदरहू योजनेची मुदत संपूनही प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्यामुळे तेथील स्थानिक रहिवाशांना तात्पुरत्या वास्तव्यासाठी बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरात रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संक्रमण शिबिराची देखभाल, दुरुस्ती व डागडुजी होत नसल्यामुळे रहिवाशांना धोकादायक अवस्थेत राहावे लागत आहे, तसेच विकासकाकडून योजनेतील रहिवाशांना मासिक भाडेही गत अनेक वर्षांपासून देण्यात आले नसल्यामुळे सदरहू रहिवाशांनी मा.गृहनिर्माण मंत्री, सचिव, गृहनिर्माण विभाग व एसआरएच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू एसआरए योजनेचे काम विनाविलंब सुरु करण्यात यावे, संक्रमण शिबिराची दुरुस्ती करण्यात यावी, मागील थकबाकी, मासिक भाडे नियमितपणे मिळावे इ. मागण्यांचे एक सविस्तर निवेदन मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे माहे जुलै, २०२१ मध्ये देवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू एसआरए प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत, संक्रमण शिबिराची दुरुस्ती करण्याबाबत तसेच रहिवाशांना मागील थकबाकी व संपूर्ण मासिक भाडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८६४............

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) मुंबई येथील गोळीबार मार्गावरील पंचशिल सह.गृह.संस्थेसह प्रगती मंडळ व इतर ५० संस्थांच्या पुनर्विकासाची योजना राबविण्यासाठी विकासक शिवालीक व्हेंचर्स प्रा.लि. यांना क्रमांक झोपुयो २००८/प्र.क्र.१८७/झोपसु-१ दिनांक २९/०८/२००८ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३K (१) च्या तरतुदीनुसार शासनाने निर्देश निर्गमित केले आहेत. तद्नंतर प्रगती मंडळ व इतर ५० संस्थेकरीता दिनांक ०१/१२/२०१२ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आले आहेत.

सदर आशयपत्रानुसार वर नमूद झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम प्रगतीपथावर असल्याने २०१२ पर्यंत एकूण ८ संक्रमण शिबिरांमध्ये १४२० संक्रमण सदनिका बांधण्यास मंजुरी दिलेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत विकासकाने ६ संक्रमण शिबिरांमध्ये ७१६ संक्रमण सदनिका बांधल्या असून यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात रहिवासी वास्तव्यास आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

संक्रमण शिबिराची देखभाल, दुरुस्ती व डागडुजी वेळोवेळी विकासकामार्फत करण्यात येत असून विकासकाने सर्व संक्रमण शिबिरांचे दिनांक ३०/०८/२०२१ पासून पुढील १ वर्षापर्यंतचे स्थैर्यतेबाबतचे प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) सादर केलेले आहेत.

(३) व (४) सदरहू एसआरए योजनेचे काम सुरु करण्याच्यादृष्टीने मा.गृहनिर्माण मंत्री यांचे समवेत दिनांक १७/०२/२०२०, २०/१०/२०२१ रोजी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये वेळोवेळी विकासक तसेच संस्थेचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करुन विकासकास उर्वरित काम लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून प्रकल्प पूर्ण होण्याच्यादृष्टीने विकासकास दिलेले कामाचे 'स्थगिती आदेश' उठविण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत इमारत क्र.२९, ३०, ६० आणि एम-२ चे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच विकासकास उपरोक्त बैठकीच्या अनुषंगाने योजनेतील पात्र झोपडीधारकांचे संपूर्ण भाडे अदा करण्याबाबत सूचित करण्यात आले असून विकासकाकडील प्राप्त माहितीनुसार योजनेतील पात्र ५२३ झोपडीधारकांचे ६

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८६४
डॉ.जितेंद्र आव्हाड....
महिन्यांचे थकीत भाडे विकासकामार्फत अदा करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त २२८ झोपडीधारकांचे ६ महिन्यांचे भाड्याचे धनादेश प्राधिकरणाकडे जमा करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाचे गृहनिर्माण खात्याने जे उत्तर दिलेले आहे, त्यावर माझा आक्षेप आहे. यामुळे तेथील ज्या संस्था आहेत, तेथील रहिवासी यांच्यावर अन्याय होताना दिसत आहे. पंचशील सहकारी गृहनिर्माण प्रगती मंडळ आणि इतर ५० संस्थांच्या पुनर्विकासाचा हा प्रश्न आहे. एका विकासकाला २००८ मध्ये हे काम दिलेले होते. सन २००८ नंतर त्यांची जी मुदत होती, ती देखील संपून गेलेली आहे. ती मुदत संपलेली असताना एकूण जवळपास १४२० रहिवासी असताना केवळ ७१६ संक्रमण सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. उर्वरित सर्वांना वाऱ्यावर सोडण्यात आलेले आहे. त्यानंतर तेथील संक्रमण शिबिरे पडायला आलेली आहेत, तेथे कोणतीही सुविधा व्यवस्थित नसताना म्हाडा मात्र या सगळयांकडे दुर्लक्ष करीत आहे, तेथील सर्व लोक याकरिता आंदोलन करीत आहेत. मंत्रीमहोदय, अधिकारी यांच्यासमवेत देखील याबाबत बैठकाही घेतलेल्या आहेत. यावर माझा एवढाच प्रश्न आहे की, उर्वरित रहिवाशांना संक्रमण शिबिराच्या सदनिका कधी देण्यात येणार आहेत ? ज्या सदनिका बांधून दिलेल्या आहेत, त्या व्यवस्थितपणाने कशा करुन देता येतील, याबाबतचे निर्देश शासन देणार आहे का ? त्यांचे अनेक महिन्यांपासूनचे घरभाडे थकलेले आहे, ते घरभाडे देखील लवकर देण्याकरिता विकासकाला भाग पाडण्यात येणार आहे का ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे. यासंदर्भात माननीय सभापती यांच्या दालनात बैठक घेण्यात येईल.

**सभापती :** ठीक आहे. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------------- यानंतर श्री.सोनावणे

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

उप सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत येथे प्रश्नोत्तराची यादी जोडण्यात यावी. )

------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. शंभुराज देसाई ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. बच्चू कडू ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचा अलग लेखा अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. अब्दुल सत्तार ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन २०१८-२०१९ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील अठ्ठेचाळीसावा लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन २०१९-२०२० चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगाव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर

असुधारित प्रत

व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

डॉ. जितेंद्र आव्हाड ( गृहनिर्माण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई प्राधिकरणाचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे आज बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करीत आहे.

( प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत. )

-------

असुधारित प्रत

## म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन

**सभापती** : आज कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक-3 (क) वर दर्शविण्यात आलेली सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना उद्या गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजी घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझी ही तिसरी टर्म आहे. मी औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधीत्व करीत आहे. या माझ्या तीन टर्मच्या कालावधीत आतापर्यंत प्रश्नोत्तरे ७ किंवा ८ पेक्षा जास्त झालेली नाहीत. पण आज माननीय सभापती महोदयांनी विक्रम प्रस्थापित केलेला आहे. आज, बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी १९ प्रश्नोत्तरे चर्चेला घेण्यात आलेली आहेत. हा विक्रम काळेच्या उपस्थित झालेली असल्यामुळे मला त्याचा अत्यांनद होत आहे. हा विक्रम केल्यामुळे मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्यावतीने माननीय सभापतीचे अभिनंदन करीत आहे. प्रश्नोत्तराचा क्रम असाच वाढत राहो अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

**सभापती** : मी सर्वांचा आभारी आहे. आपण सर्वांनी असेच सहकार्य केले तर आपण ४० प्रश्नोत्तरे चर्चेला घेऊ.

-------

असुधारित प्रत

**सभापती** : आज कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक-४ (क) वर दर्शविण्यात लक्षवेधी सूचना ही नंतर घेण्यात येईल. माननीय सहका मंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी मला पत्र दिलेनले आहे. आज स्व.डॉ.पतंगराव कदम यांची पुण्यतिथी असल्यामुळे माननीय सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम गावी गेल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर विमा हप्ता दर प्रकरणी झालेला अन्याय दुर करणे

**मु. शी. :** रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर विमा हप्ता दर प्रकरणी झालेला अन्याय दुर करणे या संबंधी श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अनिकेत तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदूर्ग-स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने राज्यात आंबा पिकांसाठी हवामान आधारित फळपीक विमा योजना लागू केलेली असणे, तथापि राज्यातील इतर जिल्हयांच्या तुलनेत रायगड जिल्हयात शेतकऱ्यांच्या विमा हप्त्याच्या रक्कमेत चौपट इतकी वाढ करण्यांत येणे, राज्यात यंदा आलेल्या अवकाळी पाऊस, निसर्ग वादळे, यामुळे रायगड जिल्हयातील आंबा उत्पादनात ५० टक्के घट झाल्याचे दिसून येणे, शासनाने याच योजनेसाठी रत्नागिरी जिल्हयातील बागायतदारांना हेक्टरी १३ हजार ३०० तर सिंधुदुर्गामध्ये प्रति हेक्टरी ७ हजाराचा हप्ता तर ठाणे व पालघर जिल्हयासाठी हे दर रायगड जिल्हयाचे तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास येणे, मात्र रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांना हेक्टरी २९ हजार ४०० रुपये विमा हप्त्यापोटी भरावे लागत असणे, त्यामुळे रायगड जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर एक प्रकारे अन्याय होणे, सदरचे पीक विम्याचे हप्ते भरण्यासाठी राज्यातील अन्य जिल्हयांसाठी शासनाने एचडीएफसी एर्गो जनरल इन्श्युरन्स कंपनी, रिलायन्स जनरल इन्श्युरन्स कंपन्या नियुक्त करणे, रायगड जिल्हयासाठी मात्र भारतीय कृषी विमा कंपनीची शासनाकडून नियुक्ती करणे, शासनाने नियुक्त केलेल्या सर्व विमा कंपन्यांचे विमा दर हे वेगवेगळे असून शेतकऱ्यांवर अन्याय करणारे असणे, त्यामुळे रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांवर लादण्यात आलेले चौपट दर कमी करुन ती इतर विमा कंपन्या

प्रमाणेच लागू करण्यांत यावी अशी शेतकऱ्यांनी मागणी असणे, तसेंच शासनाने रिलायन्स कंपनीच्या धर्तीवर, श्री. अनिकेत तटकरे .....

शेतकऱ्यांना भरपाई रक्कम देण्याचीही मागणी करण्यात येणे, तथापि शासनाने त्याबाबत अद्यापही कार्यवाही न करणे, परिणामी याप्रकरणी रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांवर विमा हप्ता दर प्रकरणी झालेला अन्याय दूर करुन त्यांना भरपाई रक्कम देण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दादाजी भुसे ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतदारांची कैफियत मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. गेल्या दोन वर्षापासून वेगवेगळया पध्दतीने कोकणावर आघात होत आहे. निसर्ग चक्रीवादळ, महापूर किंवा अतिवृष्टीचा सामना कोकणाला करावा लागलेला आहे. याचा परिणाम कोकणातील फळ पिकांवर झालेले असून, फळ पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. विमा काढला जातो. पण त्यामध्ये तफावत आहे. शासनाचे दिनांक १८ जून, २०२१ रोजी प्रधानमंत्री फसल विमा योजनेचे परिपत्रक निर्गमित झालेले आहे. या अंतर्गत चार विमा कंपन्यांना राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला किती रक्कम मिळणार ते निर्देशित केलेले आहे. आंब्यासाठी १ लाख ४० हजार रुपये मिळण्यासाठी हेक्टरी मर्यादा घालून दिलेली आहे. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २९ हजार ४००, रत्नागिरीमध्ये १३ हजार ३००, पालघरमध्ये २० हजार ३००, ठाण्यामध्ये ७ हजार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ७ हजार रुपये विम्यापोटी दिले जातात. केंद्राकडून १२.५ टक्के आणि राज्य शासनकडून ३० ते ३५ टक्के विम्याचा हप्ता भरला जातो. विमा कंपन्या फक्त या शेतकऱ्यांच्या नाहीत. विमा कंपन्या केंद्र शासन आणि राज्य शासनाची कशा पध्दतीने लूटमार करतात ते पहायला मिळते. ठाण्यामध्ये ७ हजार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ७ हजार रुपये विम्यापोटी दिले जातात. तर मग रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २९ हजार ४०० रुपये का दिले जातात असा माझा प्रश्न आहे. विम्यासाठी जो हप्ता निश्चित केलेला आहे, तो सर्व जिल्ह्यांसाठी समान करणार काय ?

सभापती महोदय, विमा कंपन्यांनी शेतकरी, केंद्र शासन आणि राज्य शासनाकडून अतिरिक्त विम्या पोटी अधिकचा हप्ता वसुल केलेला असून, तो शेतकऱ्यांना परत देणार काय ?

सभापती महोदय, वाढीव हप्त्यामुळे कोकणातील अनेक शेतकरी वंचित राहिलेले आहेत. शेतकऱ्यांना विमा हप्ता भरण्यासाठी वाढीव मुदत दिली जाईल काय ?

अप्रकाशित प्रत

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेसंदर्भात ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, विम्या योजनेसाठी प्रारुप असते. त्यानुसार कार्यवाही केली तर राज्यातील धोका ओळखून जिल्ह्यांचे समुह आधी निश्चित करीत असताना कमी आणि जास्त धोका असलेले असा एकत्रित गोषवार तयार करुन केंद्र शासनाकडे सादर केला जातो आणि त्यानंतर त्याला मान्यता मिळते. त्यानंतर निविदा कॉल केल्या जातात. यासंदर्भात केंद्र शासनाने १८ कंपन्या निश्चित केलेल्या आहेत. त्या कंपन्यांकडून निविदा कोट केल्या जातात आणि वेटेड अव्हेरेजनुसार ज्या कंपन्याचे एलवन आलेले असेल अशा कंपनीला विम्यासंदर्भात निश्चित केली जाते. अहमदनगर, अमरावती, सिंधुदुर्ग, नाशिक, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांकरिता एक कंपनी निश्चित करण्यात आली आहे. बीड, औरंगाबाद, अकोला, सांगली, वर्धा, ठाणे आणि हिंगोली, सातारा, परभणी, जालना, लातूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांकरिता एसडीएफसी ही कंपनी निश्चित करण्यात आली. पहिल्या टप्प्यासाठी रिलायन्स कंपनी निश्चित करण्यात आली. रायगड, बुलडाणा, जळगाव नांदेड, पुणे आणि उस्मानाबाद जिल्ह्यांकरिता भारती कृषी कंपनी एलवन आल्यामुळे निश्चित करण्यात आली. धुळे, पालघर, सोलापूर, रत्नागिरी, नागपूर आणि नंदूरबार या जिल्ह्यांकरिता रिलायन्स जनरल इन्शुरन्स एलवन आल्यामुळे संबंधित कंपन्या निश्चित करण्यात आल्या आहेत. दोन वर्षापूर्वी केंद्र शासनाने विम्यामध्ये काही बदल केले होते. त्यामधील पहिला बदल केलेला आहे.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे.....

त्यात पहिला बदल असा केला की, शेतकरी बांधवांसाठी फळपीक विमा योजना आणि पीक विमा योजना ऐच्छिक केल्या. आपणास कल्पना आहे की, यापूर्वी शेतकरी बांधव बँकेतून कर्ज घेत असतांनाच त्यांच्याकडून विमा हप्त्याची रक्कम वजा केली जात होती. परंतु आता शेतकऱ्यांना फळपीक किंवा पीक विमा योजनेमध्ये सहभाग घ्यायचा असेल तरच ते सहभाग घेऊ शकतील. ज्याची विमा योजनेत सहभागी होण्याची इच्छा नसेल त्यांनी त्या बाबत दोन ओळीचे पत्र बँकेला दिले तर त्यांच्याकडून विमा हप्त्याची कपात केली जात नाही. हा चांगला बदल करण्यात आला आहे. केंद्र सरकारने दुसरा बदल फळपीक विमा योजनेमध्ये केला. विमा हप्त्याची मर्यादा ३० टक्क्यापर्यंत निश्चित करुन स्वत:चा हिस्सा १२.५ टक्क्यापर्यंत मर्यादित केला. यामुळे विमा कंपन्यांचे ३० टक्क्याच्या पुढील जे प्रिमीयम येतात त्याची जबाबदारी शेतकरी बांधवांवर येते. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्य सरकारने ३५ टक्क्यांपर्यंत प्रिमीयमची जबाबदारी स्वीकारली आहे. ३५ टक्क्याच्या पुढे प्रिमीयम आला तर त्याची ५० टक्के जबाबदारी शेतकरी आणि ५० टक्के जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली आहे. शेतकऱ्यांवर हप्त्याचा जास्त भार येऊ नये म्हणून त्यांच्या हितासाठी राज्य सरकारने जास्तीची जबाबदारी स्वीकारलेली आहे. कारण केंद्र सरकारने ३० टक्क्यापर्यंतची मर्यादा निश्चित करुन, केंद्राची जबाबदारी १२.५ टक्के मर्यादित केली आहे. परिणामी शेतकरी बांधवांवर जास्त बोजा येत आहे. हवामानातील धोके निश्चित करुन केंद्र सरकारच्या जबाबदारीनंतर पुढील प्रक्रिया राबविली जाते.

सभापती महोदय, पीक कर्जाच्या दरावर प्रिमीयम कोट केला जातो. जिल्ह्यातील पीक कर्जाचा दर किती आहे आणि सर्वसाधारणपणे मागील तीन वर्षात किती शेतकरी बांधवांनी फळपीक किंवा पीक विमा योजनेत सहभाग घेतला ते क्षेत्र धरुन प्रिमीयम कोट केला जातो. २०१९-२० या वर्षाचा विचार केला तर रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांचा हिस्सा ६,०५० रुपये होतो. त्यावेळी ५०-५० टक्के जबाबदारी असल्यामुळे राज्याची जबाबदारी ३५,०९० रुपये आणि केंद्राची

जबाबदारी ३५,०९० रुपये होती. परंतु २०२०-२१ मध्ये केंद्र सरकारने आपली

श्री.दादाजी भुसे....

जबाबदारी मर्यादित केल्यामुळे आणि शेतकऱ्यांचा हिस्सा अगोदरपासून ५ टक्के असल्यामुळे ३५ टक्क्यांच्या पुढे प्रिमीयम आला. रायगड जिल्ह्यासाठी एल-१ हा ४४.८० आल्यामुळे केंद्र सरकारचा हिस्सा १७,५०० रुपये झाला. यात राज्याचा हिस्सा ३८,२२० रुपये आला आणि शेतकऱ्यांचा हिस्सा ७००० रुपये आला. २०२०-२१ मध्ये केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे काही धोके हार्ड करण्यात आले. परंतु असे केल्यामुळे शेतकरी बांधवांची मागणी आली की, २०१९-२० मध्ये जे धोके होते तेच २०२१-२२ मध्ये करण्यात यावेत. त्यांच्या मागणीनुसार २०१९-२० मधील धोकेच २०२१-२२ मध्ये निश्चित करण्यात आले. तद्नंतर ज्या निविदा आल्या त्यामध्ये एल-१ मध्ये प्रिमीयम हा ६७ टक्के आला. केंद्र सरकारने आपली मर्यादा १२.५ टक्के निश्चित केल्यामुळे १७५०० रुपये केंद्राची जबाबदारी आली. शेतकरी बांधवांना २९,४०० रुपये भरावे लागत असतील तरी राज्य सरकार ४६,९०० रुपयांची जबाबदारी स्वीकारत आहे. राज्य सरकार स्वत: जबाबदारी स्वीकारुन शेतकऱ्यांवर अधिक पडलेला बोजा कमी करीत आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कमी धोके आणि जास्त धोके या दोन्ही बाबी क्लब करुन व बॅलन्स साधून संपूर्ण महाराष्ट्रासाठी निविदा काढली जाते. या अनुषंगाने जी एल-१ निविदा आलेली आहे त्यानुसारच कार्यवाही करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मी या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत विम्याची भरलेली रक्कम आणि पे आऊट याचा विचार केला तर ११३ टक्के पे आऊट प्राप्त झालेला आहे.

श्री.अरुण लाड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाने फळपीक विमा योजना व पीक विमा योजनेची सक्ती काढून टाकली आहे. माझ्या माहितीनुसार विम्या कंपन्यांना केंद्र सरकार, राज्य सरकार व शेतकऱ्यांकडून जो हप्ता

मिळतो त्यातून त्या केवळ २० टक्के परतावा देतात. उर्वरित ८० टक्के हप्ता हा

श्री.अरुण लाड .....

स्वत:चा खर्च दाखवितात. तसेच विमा कंपन्या अनावश्यक निकष या योजनेत अंतर्भूत करीत आहेत. दोन महिन्यापूर्वी अवकाळी पाऊस पडला. त्या पावसात तीन दिवस धुके पडले होते. त्या धुक्यांमुळे सांगली, सोलापूर, नाशिक येथील फळबागांचे घड मोकळे झाले. परंतु त्यांची नुकसान भरपाई देणे नियमात नसल्याचे विमा कंपन्या सांगतात. याचाच अर्थ विमा कंपन्या भरपाई देण्याची वेळ येते तेव्हा नियम घालतात. यामुळे शेतकऱ्यांचा या विमा कंपन्यांवरुन विश्वास उडाला आहे. त्यामुळे या कंपन्यांनी हप्त्याचे दर कमी केले आहेत. या निमित्ताने मी एवढेच विचारतो की, हवामान बदलामुळे तीन दिवस धुके पडून सांगली, सोलापूर, नाशिक भागातील फळबागांचे घड मोकळे झाल्याची बाब नियमात बसवून त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, ही बाब तपासून घेतली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जेव्हा वादळ आले त्यात नुकसान झालेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांना विम्याचा क्लेम मिळाला ? जर सध्या आपल्याकडे या बाबतची माहिती नसेल तर आपण ती नंतर द्यावी. कारण मी थोडा वेगळा प्रश्न विचारलेला आहे.

सभापती महोदय, त्यावेळी वादळाचा दुष्काळी भाग सांगोला होता. या वेळी त्या ठिकाणी अतिवृष्टी झाली. मंत्री महोदय, आपण आणि मी सांगोला येथे जाऊन नुकसानीची पाहणी केली होती. त्या भागात गत दोन वर्षात डाळिंबीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. मंत्री महोदय, आपण सदरहू नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कशाप्रकारे नुकसान भरपाई द्यायची यावर विचार करण्याचे मान्य केले होते. मी विचारु इच्छितो की, त्या भागात किती नुकसान झाले, त्या तुलनेत किती विमा कंपन्यांनी या नुकसानीची भरपाई दिली ? रायगडप्रमाणेच सांगोला येथे

डाळिंबीचे किती नुकसान झाले, किती शेतकऱ्यांनी फळपीक विमा उतरविला होता व किती शेतकऱ्यांना विम्याचे क्लेम मिळाले ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, माझ्याकडे जिल्हानिहाय माहिती नाही. परंतु महाराष्ट्रव्यापी आकडेवारी माझ्याकडे आहे. २०१६-१७ मध्ये एकूण विमा हप्ता रक्कम ४ कोटी २३ लाख रुपये होती, त्या तुलनेत ६ कोटी १५ लाख रुपये नुकसान भरपाई मिळली. २०१७-१८ मध्ये एकूण विमा हप्ता रक्कम ९ कोटी ३० लाख रुपये होती, त्या तुलनेत १० कोटी ५० लाख रुपये नुकसान भरपाई मिळली. २०१८-१९ मध्ये एकूण विमा हप्ता रक्कम ७ कोटी ७९ लाख रुपये होती, त्या तुलनेत १८ कोटी ३६ लाख रुपये नुकसान भरपाई मिळली. २०१९-२० मध्ये एकूण विमा हप्ता रक्कम ३२ कोटी ६५ लाख रुपये होती, त्या तुलनेत ३२ कोटी १० लाख रुपये नुकसान भरपाई मिळली. २०२०-२१ मध्ये एकूण विमा हप्ता रक्कम २८ कोटी ५ लाख रुपये होती, त्या तुलनेत २५ कोटी ५६ लाख रुपये नुकसान भरपाई मिळली. २०२१-२२ संदर्भातील कार्यवाही अद्याप सुरु आहे.

------------

असुधारित

**पृ.शी.** : अकोला येथील मुंडगांवकर ज्वेलर्स या सराफा व्यावसायिकाने ग्राहकांची केलेली आर्थिक फसवणूक.

**मु.शी.** : अकोला येथील मुंडगांवकर ज्वेलर्स या सराफा व्यावसायिकाने ग्राहकांची केलेली आर्थिक फसवणूक, यासंबंधी श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमोल मिटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला जिल्हयातील सिटी कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील सराफा बाजार परिसरातील अकोल्यातील प्रख्यात सराफा व्यावसायिक मुंडगांवकर ज्वेलर्स यांनी ग्राहकांची हुंडी चिठ्ठी तसेच मोठया प्रमाणात व्याज देण्याच्या आमिषातून तब्बल ४ कोटी ५७ लाख ८२ हजार ८७९ रुपये ठेवीची फसवणूक केल्याची घटना माहे जानेवारी २०२२ मध्ये घडल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी ९८ नागरिकांकडून फसवणूक झाल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात येणे, मात्र या प्रकरणी चारही आरोपीवर गुन्हे दाखल करण्यात आलेले असणे, परंतु चारही आरोपी फरार असणे, तसेच मुंडगांवकर ज्वेलर्सकडे विविध शासकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांनीही गुंतवणूक केली असल्याने त्यांचीही फसवणूक झाल्याची बाब समोर येणे, चारही आरोपी फरार असल्याने त्यांचा शोध घेऊन आर्थिक फसवणूक झालेल्या नागरिकांना त्यांची रक्कम परत मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, अकोला जिल्ह्याच्या दृष्टीनसे ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. अकोला जिल्ह्यातील प्रख्यात सराफा व्यावसायिक मुंडगांवकर ज्वेलर्स यांनी ग्राहकांची हुंडी चिठ्ठी तसेच मोठ्या प्रमाणात व्याज देण्याच्या आमिषातून तब्बल ४,५७,८२,८७९ रुपये ठेवीची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

----------

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी ....

मुंडगांवकर ज्वेलर्स यांची स्थावर मालमत्ता संरक्षित करण्यात आली आहे. या मालमत्तांतून फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांच्या रकमेची पूर्ण वसुली होणार आहे काय, त्याबाबत संरक्षित केलेल्या मालमत्ता किती आहेत, त्यातून किती रक्कम जमा होऊ शकेल, सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या झालेल्या फसवणुकीत त्यांना दिलासा देण्याच्या अनुषंगाने किती कालावधीमध्ये त्यांची रक्कम परत मिळू शकेल, संरक्षित स्थावर किंवा जंगम मालमत्ता निष्पन्न करुन संरक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून शासनास, गृह विभागास लवकरात लवकर पाठविण्यासंदर्भात आपल्याकडून निर्देश देता येतील का ? सभापती महोदय, यामधील एक आरोपी फरार आहे. त्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अटकपूर्व जामिनाकरिता अर्ज केला आहे, तो अर्ज रद्द होऊन, त्या आरोपीला सुध्दा अटक होईल का ?

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदय, मुंडगांवकर ज्वेलर्स या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला आहे. सन्माननीय सदस्य म्हटल्याप्रमाणे ४ आरोपींना अटक केली आहे. त्यामधील एक आरोपी सौ. किरण उदय पिंजरकर यांना ॲड इंटेरिम जामीन उच्च न्यायालयाकडून मंजूर झालेला असल्यामुळे त्यांना अटक करणे प्रलंबित आहे. सदर गुन्ह्यामध्ये आजपर्यंत जवळपास ४२७ गुंतवणूकदारांच्या तक्रारी आमच्या विभागाकडे प्राप्त झाल्या असून जवळपास १६ कोटी रुपयांची रक्कम त्यामध्ये फसणूक झाल्याप्रमाणे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. लॉकर्समधील १५ लाख रुपये किंमतीचे दागिने, आरोपी मुंडगांवकर ज्वेलर्स या प्रतिष्ठानचे २ लाख रुपये किंमतीचे सोने, चांदी यांचे दागिने, मुंडगांवकर ज्वेलर्समध्ये लोकांनी गहाण ठेवलेले सोने साधारणत: १ किलो ३७८ ग्रॅम, चांदी ६ किलो ७९३ ग्रॅम, टोयाटो कंपनीच्या २ गाड्या, ३ दोन चाकी वाहने आणि सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे स्थावर मालमत्तेपैकी कसबे, अकोला येथील १६७ चौ.मी. बांधकाम असलेला बंगला, मौजे शिवर, अकोला येथील खुला प्लॉट क्षेत्रफळ २५० चौ.मी. अशी वेगवेगळी त्यांची

असुधारित प्रत

श्री. शंभूराज देसाई ....

स्थावर मालमत्ता असे सर्व मिळून जवळपास ८ कोटी रुपयांची प्रॉपर्टी व दागिने आपण जप्त केले आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, ज्यांना अटकपूर्व जामीन मिळालला आहे त्यांना अटक करण्याच्या अनुषंगाने काय करणार आहात ? उच्च न्यायालयाची पुढील तारीख असेल त्यावेळी सरकारी वकिलांना आमच्या विभागामार्फत ही सर्व वस्तुस्थिती निदर्शनास आणून देऊ. सौ. किरण उदय पिंजरकर यांची देखील या तपासामध्ये आवश्यकता आहे अशी बाब माननीय न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्यांचा ॲड इंटेरिम बेल रिजेक्ट करण्यासाठी पोलीस विभागाकडून जे करावे लागेल ते निश्चितपणे केले जाईल.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, राज्यात अशाप्रकारे बऱ्याच लोकांचh वेगवेगळया गुंतवणूक करण्याच्या अमिषामुळे फसवणूक केली आहे ही वस्तुस्थिती आहे. केंद्र सरकारने देखील या संदर्भात कडक कायदा केला होता. राज्य शासन देखील त्याप्रमाणे कायदा करेल अशी अपेक्षा आहे. माझी या संदर्भात विनंती आहे. साधारणत: साडे पंधरा कोटी रुपये अशी लोकांची गुंतवणूक होती, वसुली करताना साधारणत: साठे आठ कोटी रुपये वसूल झाले आहेत. बाकीची रक्कम राहिलेली आहे. यामधील रोकड कुठे गुंतवली, काय केले याचा कुठेही खुलासा झालेला नाही. माझी या संदर्भात विनंती आहे. संबंधित रकमेची कुठे गुंतवणूक केली या संदर्भाने त्याच्या व्याप्तीबाबत शोध घेऊन ती देखील वसुली करुन मूळ लोकांना है पैसे परत करण्यासाठी ताबडतोब कारवाई करणार आहात का ?

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदय, या संदर्भात त्यांची बँक खाती कुठे आहेत, त्यांच्याशी संबंधित इतर काही गुंतवणुका आहेत का हे पाहिले जाईल. जानेवारीमध्ये गुन्हा घडलेला आहे. अटक करणे, बाकीच्या मालमत्ता जप्त करणे याला आमच्या विभागाकडून प्राधान्य दिले होते. सन्माननीय सदस्य म्हणत आहेत त्याप्रमाणे निश्चिपतपणे त्यांची आर्थिक खाती कोणत्या बँकांत, संस्थांत आहेत याची

श्री. शंभूराज देसाई ....

माहिती घेतली जाईल. या परिसरातील बँकांना कळविले जाईल आणि जेथे अशी आरोपींची खाती असतील तेथे ती निश्चितपणे सील करण्यासाठी आमच्या विभागाकडून तातडीने पावले उचलली जातील.

----

असुधारित प्रत

**पृ.शी.** : खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित धोरणानुसार वाढीव अनुदान न मिळणे.

**मु.शी.** : खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित धोरणानुसार वाढीव अनुदान न मिळणे यासंबंधी श्री. जयंत आसगावकर, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजेश राठोड, अमरनाथ राजूरकर, डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री अभिजित वंजारी, मोहन कदम, विक्रम काळे, बाळाराम पाटील, नागोराव गाणार, प्रव ीण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री भाई गिरकर, रामदास आंबटकर, चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, डॉ. फुके, सर्वश्री रमेशदादा पाटील, रमेश कराड, सदाभाऊ खोत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

परिणय

श्री. जयंत आसगावकर (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात खासगी शिक्षण संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक ९ मे, २०१६ व दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आलेले असणे, तसेच सदर शाळांना दिनांक १८ ऑगस्ट, २०१९ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत वाढीव २० टक्के अनुदान दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून देण्याबाबत निर्णय

श्री. जयंत आसगावकर ....

घेण्यात आलेला असणे, तदनंतर दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार दिनांक १ एप्रिल, २०१९ ऐवजी दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव अनुदान देण्यात आल्याचा निर्णय घेतल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला असणे, सदर तुकडयांना पाचव्या वर्षापासून प्रतिवर्षी २० टक्केप्रमाणे वाढीव अनुदान मिळणे क्रमप्राप्त असणे, परंतु अद्यापपर्यंत ते झालेले नसणे, या सर्व शाळेतील कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून प्रचलित धोरणानुसार वाढीव अनुदान मिळण्यासाठी होत असलेली आग्रही मागणी, परंतु याबाबत निर्णय घेण्यात शासनाकडून होत असलेला प्रदीर्घ विलंब, परिणामी या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत पसरलेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने केलेली व ा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. बच्चू कडू (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. जयंत आसगावकर : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांबाबत वर्षभर बरीच चर्चा होत आहे. परंतु कोणताही निर्णय होत नाही. किमान अपेक्षा आहे की, आज यातून काही तरी निर्णय होईल. सन १९८३ पासून विनाअनुदान धोरण वसंतदादा पाटील यांनी आणले. त्यावेळी ज्या शाळा विनाअनुदान तत्वावर सुरु झाल्या त्या दर ५ वर्षांनी अनुदान मिळत शंभर टक्क्यांवर आल्या. मधल्या काळात १५-२० वर्षे या शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या आहेत. बरीच आंदोलने झाली. दिनांक १ एप्रिल, २०१६ ला पहिला टप्पा २० टक्के मंजूर झाला. मागच्या सरकारने प्रचलित प्रमाणे २० टक्के अनुदान दिले असते तर आतापर्यंत या शाळा शंभर टक्यांवर आल्या असत्या. परंतु त्यांनी सरसकट २० टक्के हा शब्दप्रयोग केल्यामुळे त्या प्रचलितपासून वंचित राहिल्या. दिनांक १ एप्रिल, २०१६ नंतर दिनांक १ एप्रिल, २०१९ ला या सरकारने दुसरा हप्ता दिला. ३ वर्षांनंतर २० चे ४० टक्के झाले. आता सन २०१९ नंतर सन २०२२ आले आहे आणि तरीही त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ झाली नाही. आम्ही याकरिता ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. प्रचलित पध्दतीने यांना अनुदान मिळाले पाहिजे यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. मधल्या काळात मंत्रिमंडळात निर्णय झाला. माननीय महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. वंचित राहिलेल्या बांधवांच्या याद्या कधी जाहीर होणार आहेत, वित्त विभागाकडे अघोषितांचे प्रस्ताव आले आहेत ते कधी घोषित होणार आहेत, प्रचलित धोरण कधी लागू होईल असे माझे प्रश्न आहेत.

श्री. बच्चू कडू : सभापती महोदय, आपण शाळा विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पाहत आहोत. सरकार येते तसे शाळेला नाव दिले जाते. बराच घोळ आहे. तुम्हा सर्वांना हे माहीत आहे. शासनाकडून याबाबतीत २५ शासन निर्णय काढले आहेत. अनुदान कसे द्यावे, ४० टक्के द्यावे काय, २० टक्के द्यावे काय, ३० टक्के द्यावे काय असे २५ शासन निर्णय आहेत. फक्त अनुदान कसे द्यावे यासाठी एवढे शासन निर्णय काढणारे देशातील हे पहिले सरकार, राज्य असेल. प्रचलित धोरण

असुधारित प्रत

श्री. बच्चू कडू ....

म्हणजे काय, तुमच्या म्हणण्यानुसार प्रचलित धोरणाचे जर म्हटले तर काही गोष्टी आहेत. सन २००८-०९ चा शासन निर्णय असा आहे की, राज्यातील खाजगी व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणाऱ्या शाळांना चौथ्या वर्षी २५ टक्के, पाचव्या वर्षी ५० टक्के, सहाव्या वर्षी ७५ टक्के, सातव्या वर्षी १०० टक्के असे देखील आपले धोरण होते. आपले धोरण नंतर अधिक बदलले. ते २०, ४०, ६०, १०० टक्के आले. ....(अडथळा).... माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती झाली. व्यवस्थापनाबाबत व्यवस्थित होणे फार गरजेचे आहे. कारण यावर नेहमी आंदोलन होत राहते. आम्हाला देखील राज्यभर शिक्षक भेटत राहतात. अघोषित शाळा, घोषित शाळा घोषितला अघोषित नसणाऱ्या अधिक वेटिंगमधील असणाऱ्या शाळा यामध्ये आम्ही देखील कधी, कधी कन्फ्युज होऊन जातो की आता आपण कोणत्या शाळेत आहोत, अशी व्यवस्था आहे. त्यामुळे या संदर्भात एक दीर्घकालीन बैठक घेऊन यामध्ये सुधारणा होणे फार महत्त्वाचे आहे.

**सभापती** : सर्वच शिक्षक प्रतिनिधी सभागृहात उपस्थित आहेत. मी बरीच वर्षे पाहत आहे. मंत्री असताना देखील पाहिले आहे. मी त्या खात्याचा मंत्री नव्हतो. परंतु माननीय श्री. देशमुख साहेबांपासून आजपर्यंत शिक्षक वर्गाचे अनेक प्रकारचे प्रस्ताव येत आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**सभापती...**

राज्यमंत्री म्हणाले त्याप्रमाणे आमच्या सारख्याचे देखील कन्फ्युजन होते. आपण काय करीत आहोत, कशाला उत्तर घेत आहोत, याबाबत माझे असे म्हणणे आहे की, जे कॉमन व प्रलंबित प्रश्न आहेत त्यावर शिक्षण विभागाच्या माध्यमातून समिती नियुक्त करावी. प्रलंबित प्रश्न व सन्माननीय सदस्यांच्या मागण्या यांचे कोठे तरी सिन्क्रोनायजेशन करुन जेवढे सोपे करता येईल तेवढे करावे. समजा पाच, सहा, सात प्रश्न आहेत, त्याचा स्टेटस घ्यावा. मंत्री महोदयांनी प्रशासकीय समिती स्थापन करुन सहा महिन्यात सन्माननीय सदस्यांना कळवावे. एक, दोन, तीन, चार (.....अडथळा.....) आपण थोडे थांबा, माझे म्हणणे आपण नीट ऐकून घ्यावे मग आपण आपली प्रतिक्रीया द्या. विभागाने प्रशासकीय समिती स्थापन करावी. मंत्री व राज्यमंत्री महोदयांनी यामध्ये पुढाकार घ्यावा. प्रश्न क्रीस्टलाईज करायचा आहे. त्यांना सांगा की, हा प्रश्न या लेव्हलला आला आहे, तो प्रश्न त्या लेव्हलला आला आहे. यामुळे आपला वेळ वाचेल व आपणाला लोकांना उत्तरे देता येतील.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, आपण केलेली सूचना अतिशय महत्वाची आहे. १४ ते १७ एप्रिलपर्यंत प्रलंबित प्रश्नांची यादी तयार होईल. ३० एप्रिलपर्यंत जेवढे प्रश्न प्रलंबित आहेत त्याबाबत पहिली बैठक घेण्यात येईल.

श्री.अभिजीत वंजारी : मंत्री महोदय, त्यासाठी स्पेसिफिक प्रश्न ठरवावे लागतील, यामध्ये अनेक प्रश्न आहेत.

**सभापती** : प्रश्न क्रीस्टलाईज करा असेच मी सांगितले आहे. मंत्री महोदय काय उत्तर देतात ते अगोदर सन्माननीय सदस्यांनी एकून घ्यावे. आपणाला हवे तसे उत्तर मिळणार नाही. शासनाला वाटेल तसे उत्तर मिळेल व ते आपणाला ऐकावे लागेल.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. माझे म्हणणे पूर्ण होण्या अगोदर माझ्या मनात काय आहे ते त्यांना कसे कळेल ते ज्योतिषी आहेत काय ? याबाबत मी विभागाबरोबर चर्चा करीत आहे.

श्री.बच्चू कडू...

विभागाकडून याबाबत अशी विचित्र उत्तरे येतात की, त्याचा कोठेही ताळमेळ लागत नाही. ते पण कंटाळे आहेत. शासन निर्णय वाचल्यावर कोणत्या शासन निर्णयात काय आहे ते आपण मला सांगा. हे आपण मला सांगू शकता काय ? सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे मी आपणाला विचारीत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे मंत्री महोदयांनी तुम्हाला विचारणा केलेली नाही.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मला असे वाटते की, पुढील वेळी उत्तर देण्यासाठी मी त्यांना चार्ज देतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदय काय म्हणतात ते एकून घ्यावे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी विभागाला याबाबत विचारणा केली आहे की, मागील पाच वर्षात सभागृहात जे प्रश्न वारंवार व एकसारखे येतात त्यांची माहिती तयार करावी. मागच्या वर्षी जे प्रश्न आले तेच प्रश्न या वर्षी आले आहेत. मागच्या अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे जे विषय उपस्थित करण्यात आले तेच विषय लक्षवेधी सूचनेद्वारे विचारण्यात आले आहेत. यासाठी सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन तीन दिवसांची मॅराथॉन बैठक घेण्यात येईल. तेथे जेवणाची व्यवस्था करण्यात येईल म्हणजे कोणाला बाहेर जाण्याची गरज पडणार नाही. यावर कायमचा उपाय करुन त्यापुढे आपणाला गेले पाहिजे. आमची अशी अपेक्षा आहे की, शिक्षकांचे जे प्रश्न सातत्याने येतात ते कायमचे मिटले पाहिजेत. हे प्रश्न कायमचे मिटविण्यासाठी फक्त सभागृहात चर्चा करुन ते सुटणार नाहीत. मी काय तुम्हाला येथे होय म्हणून सांगू शकतो. परंतु त्याचा काय फायदा होणार आहे काय ? मी सांगतो की होय, लागू करतो. आपण काय करणार ? त्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. माझे असे म्हणणे आहे की, यातून कायमचा मार्ग निघाला पाहिजे. यासाठी आपले कोणते प्रश्न प्रलंबित आहेत त्याबाबत सविस्तर बैठक घेऊन त्यातून मार्ग काढू.

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षणाचे वेगवेगळे प्रश्न आहेत हे आम्हाला मान्य आहे. मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शाळेला अनुदान देण्याबाबत एकच प्रश्न विचारण्यात आला आहे. यामध्ये दुसरा तिसरा कोणताही प्रश्न नाही. हे प्रश्न वारंवार येतात कारण त्याबाबत निर्णय घेण्यात आले नाहीत. याबाबत निर्णय घेतला तर हे प्रश्न पुन्हा येणार नाहीत.

**सभापती** : विषय असा आहे की, या प्रश्नांबाबत मी बोलत नव्हतो. तुम्हाला कोणालाही गैरसमजून करुन घेण्याची गरज नव्हती. जे प्रश्न सतत येतात त्यांची उत्तरे मिळत नाहीत. हे प्रश्न क्रिस्टलाईज करा त्याबाबत मला मराठीत सांगता येत नाही. एकत्रिकरण करुन तुमच्यासमोर ठेवा, तुम्ही त्यांना मदत करा. प्रश्नाचे स्टेटस समजून घ्या. अडचण कोठे आहे ते समजून घ्या. तुमच्या मतदारांना तुम्हाला फेस करायला सोपे होईल असे माझे स्वत:चे मत आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण जे निर्देश दिले ते अत्यंत बरोबर आहेत, वेगवेगळे प्रश्न आहेत, त्यासाठी शिक्षण विभाग समिती स्थापन करण्याचा निर्णय घेईन त्यातून आपण पुढे जाऊ. शाळा अनुदान हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. मागील अधिवेशनात आपण आम्हाला खूप मदत केली व नेहमीच आपण मदत करतात. दोन वेळा हा प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. शिक्षण मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, मुख्यमंत्री महोदयांसोबत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावू. आपल्या दालनात बैठक झाली तेव्हा उप मुख्यमंत्री महोदय आले व त्यांनी दीड तास वेळ दिला होता. त्या दिवशी मंत्री व राज्यमंत्री महोदय नव्हते. मंत्री महोदय उत्तर प्रदेश येथे गेल्यामुळे त्यांना तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन जॉईन होता आले नाही. यासंदर्भातील निर्णय आजपर्यंत झालेला नाही. मागील अधिवेशनापासून या अधिवेशनापर्यंत तीन महिने झाले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य आपण जो प्रश्न मांडत आहात तो मला कळला आहे, त्याकडे आपण सर्वांनी लक्ष द्यायला पाहिजे. शिक्षण खाते अनुदान देण्यासाठी नाही म्हणते अशातला भाग नाही. हा वित्त विभागाचा प्रश्न आहे, जी मागणी करण्यात आली त्यामुळे त्याचा राज्यावर किती बोजा पडेल हे उप मुख्यमंत्री महोदयांनी

**सभापती....**

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना माझ्या समोर बैठकीत सांगितले. हा प्रश्न शिक्षण विभागाचा असला तरी हा प्रश्न सोडवायचा असेल तर अर्थमंत्री व मुख्यमंत्री महोदयांची बैठक घ्यावी लागेल. मागच्या बैठकीत उप मुख्यमंत्री महोदय स्वत: मला म्हणाले होते की, याबाबत मी मुख्यमंत्री महोदयांशी बोलेल त्यासाठी मला थोडा वेळ द्यावा. मी स्वत: आपल्यासाठी मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेतो. या प्रश्नामुळे किती आर्थिक बोजा पडतो याचा विचार करुन निर्णय घेता येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला एक मिनिटे बोलण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : मी बैठक घेतो सांगितल्यावर आता आपण काय बोलणार आहात ? आपण कृपया खाली बसावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला माझे म्हणणे पूर्ण करु द्या.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी तुम्हाला कोणी म्हटले अधिकार नाही. मी आपणाला थांबा सांगितले आहे, आपण खाली बसा. आपण विरोधी पक्षाची भूमिका घेऊ नका. आपण सत्ताधारी पक्षाचे आमदार आहात हे लक्षात ठेवा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपली भूमिका नेहमी शिक्षकांच्या बाजूची आहे त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो. गेल्या तीन महिन्यापासून उन्हातान्हात आमचे शिक्षक बसले आहेत, रोज मला महाराष्ट्रातून २०० फोन येतात. आमचे सरकार म्हणून मी त्यांना काय उत्तर द्यावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, प्रश्नांला कशी काय हरकत घेता येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराला हरकत घेता येत नाही. मात्र लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत हरकत घेता येते.

**सभापती** : हा तारांकित प्रश्न नाही. ही हरकत मी मान्य करतो. प्रश्नाला हरकत नाही तर उत्तराला हरकत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहात प्रश्नाला हरकत घेण्याची प्रथा होती, नियम होता. मी नियम समितीमध्ये सदस्य होतो. तत्कालीन सभापती शिवाजीराव देशमुख यांनी यासंदर्भातील नियम बदलले. त्या समितीमध्ये मी होतो. मी त्यांना सांगितले की, हरकत घेता यायला पाहिजे त्याबाबत त्यांचा व माझा दोन बैठकीत वाद झाला होता. त्यांनी सांगितल्यावर शेवटी मी माघार घेतली. त्यांनी सांगितले की, प्रश्नोत्तराला हरकत घेऊ नका. बाकी सर्व कामकाजावर बोलतांना हरकत घेता येते असे मी नियमाचा अभ्यास केला म्हणून मला वाटते. हा विषय आपण समजून घ्यावा मंत्री महोदयांनी अतिशय प्रामाणिकपणे उत्तर दिले आहे. या सभागृहाचा मी २२ वर्षापासून सदस्य आहे. कोणत्याही शिक्षण मंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले नाही. यामध्ये एकच अडचणीचा प्रश्न आहे. पहिले २० टक्के, त्यानंतर ४० टक्के, त्यानंतर ६० टक्के, त्यानंतर ८० टक्के व त्यानंतर १०० टक्के अनुदान देण्याचा हा विषय आहे. २० टक्के अनुदान मिळाल्यावर ४० टक्के अनुदान कधी मिळेल याची नियमावली तयार केली पाहिजे. मी सर्व शिक्षक आमदारांना नम्रपणे सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी आपण शिक्षक आमदार नाहीत. सभापती महोदय, यापुढे जे शिक्षक व कर्मचारी शिक्षण खात्याकडून पगार घेतात त्यांनी पगारवाढ मागू नये. माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी आपण खाली बसा. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील काय म्हणतात ते अगोदर एकून घ्यावे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दोन्ही बाजूने हे होणार नाही. विना अनुदानित तत्वावरील शिक्षकांना पगार द्यावयाचा असेल तर शिक्षण विभागाला जे बजेट दिलेले आहे त्यापेक्षा ते जास्त खर्च करु शकत नाही. शिक्षण विभागाला ५ ते १० हजार कोटी रुपयांचे बजेट दिलेले आहे. एका बाजूला पगार वाढ मागितली जाते. विनाअनुदानित तत्वावरील शिक्षक आत्महत्या करीत आहेत. त्यांच्या घरातील धिंडवडे निघालेले आहेत. दोन्ही बाजूने पैशांचे सोंग आणता येत नाही, इतर सर्व सोंग आणता येतील. आपण यासाठी तत्व ठरवावे. आपण त्यासाठी बैठक आयोजित करावी. आम्ही त्या बैठकीसाठी उपस्थित राहू. आपण तत्व ठरविले पाहिजे.

**सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. आपण निर्णय द्यावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आमचा जीव तुटत आहे. (..अडथळा...) आम्ही तुमचे म्हणणे ऐकून घेतले. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. पहिल्या वर्षी २० टक्के, दुसऱ्या वर्षी ४० टक्के, तिसऱ्या वर्षी ६० टक्के, चौथ्या वर्षी ८० टक्के आणि पाचव्या वर्षी १०० टक्के हे धोरण आणण्यासाठी मंत्री महोदय मत्रिमंडळासमोर प्रस्ताव घेऊन जाणार आहेत काय ? मी अतिशय स्पेसिफिक, पॉईंटेड, मराठीमध्ये सांगावयाचे झाले तर वस्तुनिष्ठ प्रश्न विचारलेला आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांची यादी एका महिन्यात तयार करावयाची होती. शिक्षण विभागाने ती यादी तयार केलेली आहे. परंतु त्यावर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नमूद केलेले आहे की, आमची परवानगी घेतल्याशिवाय शिक्षण विभागाने कोणतीही यादी जाहीर करु नये. मग यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय शिक्षण मंत्री यांची बैठक झाली पाहिजे. ती बैठक झाल्याशिवाय या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही. त्यामुळे ती बैठक होईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचे काहीच कारण नाही. मी बैठक घेतो. मला या प्रश्नाची संपूर्ण माहिती आहे. आपण कृपया सभागृहाचा वेळ घेऊ नये.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, मुख्यमंत्री महोदयांची परवानगी घेतल्यानंतर संबंधित विभागाकडून मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर केला जातो. आपण प्रोसिजर विषयी बोलू नये. तुमच्या जीवाची जी तातातूट होत आहे ती आमच्या पर्यंत पोहोचते. त्यामुळे तुम्ही काळजी करु नये.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. शिक्षण राज्यमंत्री महोदयांनी सरकारच्या धोरणाची लक्तरे सभागृहात व्यवस्थितरीत्या फाडलेली आहेत त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सभापती महोदय, आपण मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेण्याबाबत सांगितले आहे. मध्यंतरी आपल्या दालनात जी बैठक झाली त्या बैठकीत उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, मुख्यमंत्री महोदयांच्या निर्णयाशिवाय हे होणार नाही.

**सभापती** : आपण जे सांगत आहात त्याची मला माहिती आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये आपल्या दालनात बैठक घ्यावी तरच काही तरी तड लागेल अन्यथा तड लागणार नाही, वर्षानुवर्षे लोक तेथे बसतील. हा २० टक्के, ४० टक्क्यांचा विषय नाही. या संदर्भात १०० टक्के निर्णय झाला पाहिजे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. मी स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत आसगावकर यांच्या बरोबर मी सुद्धा सहप्रश्नकर्ता आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी ज्या प्रमाणे स्पेसिफिक प्रश्न विचारला त्या प्रमाणेच माझा देखील स्पेसिफिक प्रश्न आहे. त्रुटी पूर्तता झालेल्या शाळांची यादी जाहीर करण्यासाठी १० महिन्यांचा कालावधी झालेला आहे. त्या शाळांनासाठी केवळ १०४ कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. शासन ती तरतूद केव्हा करणार आहे ?

असुधारित प्रत

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मागील आठवड्यात माननीय उप मुख्यमंत्री व मी माझ्या दालनात अनौपचारिक चर्चा केली. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, यादी जाहीर करण्यासाठी परवानगी मिळेल. त्यामुळे आपण कृपया सभागृहाचा वेळ घेऊ नये. माझ्या दालनात हे प्रश्न चर्चीले गेलेले आहेत. त्या बैठकीस आपण उपस्थित होता. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक घेतल्याशिवाय हे होणार नाही.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : महाराणा प्रताप चौक, मुलुंड चेक नाका येथे पादचारी पूल उभारण्याबाबत

**मु.शी.** : महाराणा प्रताप चौक, मुलुंड चेक नाका येथे पादचारी पूल उभारण्याबाबत श्री.रवींद्र फाटक, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रवींद्र फाटक (ठाणे तथा पालघर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराणा प्रताप चौक, मुलुंड चेक नाका, मुंबई येथे अपघाता ंचे वाढते प्रमाण, हजारो नागरीकांची या चौकात सतत वर्दळ असल्याने पादचारी पूल बांधण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री, यांनी सदर ठिकाणी पादचारी पूल बांधण्याचे आश्वासन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, मुंबई शहरातील लाल बहादूर शास्त्री हा प्रमुख महामार्ग असून या महामार्गावर मोठ्या प्रमाणात व ाहना ंची वर्दळ सुरु असणे, त्यामुळे रस्ता ओलांडतांना अनेक वेळ ा मोठ-मोठे अपघात होऊन नागरीकांना आपला जीव गमवावा लागणे, परिणामी महाराणा प्रताप चौक, मुलुंड चेक नाका येथे तातडीने पादचारी पूल उभारण्याची नितांत आवश्यकता असणे, त्याबाबत शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो/ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, महाराणा प्रताप चौकातील पादचारी पुलाबाबत मी दोन-तीन वेळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. मुलुंड चेक नाका येथे पादचारी पूल तयार करण्यासाठी मान्यता मिळावी यासाठी मी मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांना देखील पत्र दिले होते. दोन्ही पादचारी पूल बांधण्यासाठी परवानगी मिळालेली असल्यामुळे मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. माझा प्रश्न असा आहे की, सदर चौकात अपघाताचे प्रमाण जास्त असल्यामुळे मुंबई महानगरपालिका प्राधान्याने या पुलाचे काम हाती घेणार आहे काय ? सदर पादचारी पुलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तो रस्ता अतिशय छोटा आहे. मुलुंड चौकातून दररोज दोन लाख लोक ये-जा करतात. मुलुंड येथील टोल नाका चुकविण्यासाठी लोक छोट्या रस्त्यावरुन वाहने घेऊन जातात. धोकादायक माल वाहतूक थांबविण्यासाठी लाल बहादूर शास्त्री रस्त्याजवळ लोखंडी कमान बांधण्यात येणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांनी दोन पादचारी पुलाविषयी मागणी केलेली आहे. मुंबई महानगरपालिकेने दोन्ही पूल मंजूर केलेले आहेत. आपण सन २०१८ मध्ये मेट्रो-४ प्रकल्पासाठी कार्यरंभ आदेश दिला. तेथून मेट्रो लाईन जाते. ज्या ठिकाणी एक पूल प्रस्तावित होता तेथे मेट्रोचे स्टेशन होणार आहे. दुसरा पूल तेथून ठाणे शहराच्या दिशेने आहे त्या संदर्भात एमएमआरडीएने कळविले आहे की, मेट्रोचे काम झाल्याशिवाय महानगरपालिकेने कोणतेही काम करु नये. जेथे मेट्रो स्टेशन होणार आहे तेथे चौकाच्या बाजूला पहिला पूल प्रस्तावित होता. मेट्रोच्या स्टेशनमध्ये अंतर्भाव केलेला आहे की, नागरिक ब्रिज म्हणून त्याचा वापर करु शकतात. त्यामुळे एमएमआरडीएच ते काम करणार आहे. जसे त्यांचे काम होईल त्याप्रमाणे ते होईल. एमएमआरडीएने सांगितलेले आहे की, आमचे काम पूर्ण झाल्यानंतर दुसरा ब्रिज बांधण्यात करण्यात यावा. उद्या किंवा परवा एमएमआरडीए, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी पाहणी करतील. पाहिजे तर सन्माननीय सदस्यांनी देखील पाहणीच्या वेळी उपस्थित राहावे. तेथे

श्री.प्राजक्त तनपुरे......

पादचारी पूल निर्माण करण्यासाठी मेट्रोला जी अडचण होती ती दूर झाली असेल, मेट्रोचे तेवढे काम झाले असेल आणि लगेच करता येणे शक्य असेल तर महानगरपालिकेने जी प्रक्रिया राबवायची आहे ती लगेच राबविण्याबाबत सूचना देण्यात येतील.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामाला गती देण्याबाबत

**मु.शी.** : उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामाला गती देण्याबाबत श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----------

असुधारित प्रत

## विशेष उल्लेखाच्या सूचना.

**सभापती :** आज बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित करतो.

-------

असुधारित प्रत

## अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, नाशिक जिल्हयात अवकाळी पाऊस पडलेला आहे. आज सकाळी पडलेल्या अवकाळी पावसामुळे येवला, निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिशय नुकसान झालेले आहे. माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई केव्हा मिळणार आहे याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय,.....

**सभापती** : मी मंत्री महोदयांना नोंद घेण्यास सांगितले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाची गरीमा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे अधिवेशनानिमित्त मुंबईत आहेत. आज सकाळी नाशिक जिल्ह्यात अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे शेतीचे नुकसान झाले. शासनाने ताबडतोब नुकसान भरपाई द्यावी, असे असते काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे यांना प्रोसिजर माहिती नाही. आता आपण पुढील कामकाज घेऊ.

-------

यानंतर श्री.सांगळे......

**पृ.शी.** : दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. I OF 2022

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017)

श्री.बच्चू कडू (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक - १ (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक - १ (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ४ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – १ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – १ संमत झाले आहे.

-------------

असुधारित प्रत

**अर्धा-तास चर्चेची सूचना क्रमांक १ संबंधी**

**सभापती** : आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेली पहिली अर्धा-तास चर्चेची सूचना सर्वश्री सदाभाऊ खोत, गोपिचंद पडळकर, महादेव जानकर, वि.प.स. यांनी दिली आहे. सदर अर्धा-तास सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

---------

**अर्धा-तास चर्चेची सूचना क्रमांक २ संबंधी**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी ज्या विषयासंबंधी अर्धा तास चर्चेची सुचना दिली आहे. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, सदनामध्ये थोडया वेळापूर्वी जी चर्चा झाली होती त्यात सदर अर्धा तास चर्चेमधील सर्व विषय आलेले आहेत....

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांना अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त करायचे आहेत. मी त्यांचा अधिकार काढून घेऊ शकत नाही. त्यामुळे आपण कृपया खाली बसावे. हे सर्व श्रेय घेण्याकरिता होत आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, आपण या संदर्भात अचूक निदान केल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. आमचे मित्र व सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जे काही सांगितले आहे ते अर्धसत्य आहे.

-----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त असणे

**मु.शी.** : राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त असणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९२ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त असून पवित्र पोर्टल भरती बद्दल अनेक प्रश्न, समस्या असणे, मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान नसणे, शाळा अघोषित असणे, संच मान्यतेच्या निकषात सुधारणा होणे गरजेचे असणे, शाळांना पुरेसे वेतनेत्तर अनुदान नसल्याने शाळांची दुर्दशा होणे, जुनी निवृत्ती वेतन योजना सर्वांना लागू करणे, जिल्हा परिषद शाळांमध्ये पुरेश्या वर्ग खोल्या नसणे, शालार्थ व अन्य प्रशासकीय बाबींमध्ये अडवणूक व विलंब होत असल्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे, कोरोनामुळे लाखो मुले शाळाबाह्य होणे, मुंबईत रात्रशाळा बंद असणे, अशा समस्यांमुळे निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, सदनामध्ये यापूर्वी शिक्षणासंबंधी अनेक वेळा चर्चा झाली आहे. सदनातील अन्य सन्माननीय सदस्य शिक्षण क्षेत्राशी निगडीत नाहीत किंवा शिक्षक अथवा पदवीधर आमदार नाहीत. त्यामुळे त्या सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, आम्ही सदनामध्ये शिक्षकांचे प्रश्न मांडत असल्यामुळे सदनामध्ये त्यावर चर्चा होत असतात. मंत्री महोदय, आज एक बाब स्पष्ट झाली पाहिजे की, मराठी माध्यमातून मुलांना शिक्षण देण्याची जबाबदारी शासन घेणार आहे की नाही ? सभापती महोदय, आपण शिक्षण हक्क कायदा मंजूर केला आहे. त्यानुसार आठवीपर्यंत शिक्षण देण्याची शासनाची जबाबदारी आहे. मुलींना बारावीपर्यंत मोफत

असुधारित प्रत

डॉ.सुधीर तांबे...

शिक्षण द्यावे असाही कायदा आहे. परंतु मोफत शिक्षण कोणी द्यायचे हा मूळ प्रश्न आहे. येथे खर्चाचा प्रश्न येत नाही. याकरिता जेवढा खर्च होईल तेवढा खर्च शासनाने केला पाहिजे. श्रीमंत घरातील मुले कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घेत आहेत. याउलट गरीब घरातील मुले अनुदानित, विनानुदानित, जिल्हा परिषदा किंवा नगरपालिकांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांना आपण दुय्यम दर्जाची शिक्षण व्यवस्था देणार आहात का ? राज्यात हजारो शिक्षकांची पदे रिक्त आहेत. अनेक शाळांमध्ये क्रीडा व कला शिक्षक नाहीत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये २५ मुलांकरिता २ शिक्षक कार्यरत असतात. त्या शाळांमध्ये पंचतारांकित सुविधा असतात. आमची त्याकरिता कोणतीही हरकत नाही. परंतु आपण गरीब माणसाला काय देणार आहात ? आपण समृद्धी मार्ग बांधला. तो गरीब व्यक्ती त्या समृद्धी मार्गावरुन कधी जाऊ शकत नाही. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी असे सांगितले होते की, गरीब माणसांचे सबलीकरण करायचे असल्यास त्याकरिता शिक्षण वगळता कोणताही पर्याय नाही. यामध्ये सचिव हे झारीतील शुक्राचार्य असतात. विशेषत: वित्त विभागाचे सचिव त्यात असतात. ही आपली जबाबदारी आहे असे ते कधीही मानत नाही. सभापती महोदय, आपले कल्याणकारी राज्य असून ते सामाजिक न्यायावर चालणारे आहे. अशा परिस्थितीत महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्वाने आपण चालत आहोत. शिक्षक हे आमचे मतदार असल्यामुळे आम्ही त्यांचे प्रश्न मांडतो, हा शिक्षकांचा प्रश्न आहे या चष्म्यातून कोणीही त्याकडे बघू नये अशी माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे. आम्ही हा प्रश्न वारंवार मांडून त्रस्त झालो आहोत. एका शाळेत मुलांची संख्या वाढल्यामुळे तेथे एक तुकडी मंजूर केली जाते. त्यामुळे तेथे वाढणारी तुकडी ही अनुदानित असली पाहिजे. परंतु तेथील शिक्षक वर्षानुवर्षे विनाअनुदानावर काम करीत आहेत. ग्रामीण भागांमध्ये बहुतांश ज्युनियर कॉलेजेस काढण्यात आली आहेत. अशा प्रकारे ग्रामीण भागांमध्ये सदरहू कॉलेजेस नसती तर गरीब घरातील मुलींना शिक्षण मिळू शकले नसते. आपण सदनामध्ये अन्य विभागावर चर्चा करीत असताना त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चासंबंधी तसेच तो खर्च योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत आम्ही कधीही

असुधारित प्रत

डॉ.सुधीर तांबे....

चर्चा करीत नाही. आपण शिक्षणाचा कायदा मान्य केला आहे. हा आपला संविधानिक अधिकार आहे. शिक्षणाचा कायदा आठवीपर्यंत असला तरी गरीब किंवा श्रीमंत असा कोणताही विचार न करता सरसकट सर्व मुलांना बारावीपर्यंत मोफत शिक्षण देण्यासंबंधी मागणी करण्यात आली होती. शिक्षण हक्क कायद्यामध्ये दर्जेदार असा शब्द वापरण्यात आलेला आहे. त्यात सक्तीचा किंवा मोफत असा शब्दप्रयोग वापरलेला नाही. राज्यात दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असल्यास सध्या राज्यात किती शिक्षकांची पदे रिक्त आहेत ? याबाबत मंत्री महोदयांनी सदनाला माहिती द्यावी. शासनाने पवित्र पोर्टल सुरु केले. त्यात अनेक अडचणी आहेत. आपण त्यात काही सुधारणा करणार आहात की नाही ? या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडलेले आहेत.

सभापती महोदय, प्रशासनाच्या चुकीमुळे फार मोठा त्रास होत असल्याचे मी सदनाला एक उदाहरण सांगतो. शासनाने एक वर्षापूर्वी काही शाळांना अनुदान देण्याचे घोषित केले होते. अनुदान देत असताना सदर शाळांची तपासणी करावी अशी वित्त विभागाने अट घातली. याबाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु अतिशय क्षुल्लक कारणास्तव अनेक शाळा अपात्र ठरविण्यात आल्या. ती कारणे चुकीची आहेत. सभापती महोदय, खालच्या स्तरावरील प्रशासन किती खराब आहे हे सांगण्यासाठी आपल्याला स्वतंत्र विषय घ्यावा लागेल. त्या शाळांचा कोणताही दोष नसताना त्यांना विनाकारण अपात्र ठरविण्यात आले. एक वर्षांपासून त्या शाळांची सातत्याने तपासणी झाली व त्यात त्या अपात्र ठरल्या. अशाप्रकारे त्यांच्यावर मोठा अन्याय केला जात आहे. याकरिता फक्त १०० कोटी रुपयांची गरज आहे. आम्ही हा विषय सदनामध्ये वारंवार उपस्थित करीत असतो. तसेच हा खर्च जास्तीचा आहे असे कोणी म्हणू शकत नाही. सभापती महोदय, आपण महासत्ता होण्याचे स्वप्न बघत आहोत. आपण ज्यावेळी शिक्षणावर ६ टक्के व संशोधनावर ३ टक्के खर्च करु त्याच वेळी जागतिक पातळीवर प्रगत राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असे सांगितले होते की, आपल्याला पैशाचे सोंग आणता

असुधारित

डॉ.सुधीर तांबे....

येत नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपला शिक्षणावर होत असलेला खर्च विचारात घेतल्यास सध्या शिक्षणावर अडीच टक्के सुद्धा खर्च केला जात नाही. राज्यात २०१४ पासून शिक्षक भरती बंद करण्यात आली आहे. सभापती महोदय, हे सर्व प्रश्न गरिबांच्या शिक्षणाशी निगडीत आहेत. मी सर्व मुद्यांचा उल्लेख करणार नाही. राज्यात अनेक शाळा अघोषित आहेत. शासनाने त्या शाळांना घोषित करुन अनुदान द्यावे. आपण त्यांना २० टक्के अनुदान दिले तरी पुढील ५ वर्षांपर्यंत त्यांना १०० टक्के अनुदान मिळू शकते. एनआयसीच्या चुकीमुळे अनेक शाळांच्या संच मान्यतेची दुरुस्ती होऊ शकत नाही.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत

डॉ.सुधीर तांबे .....

याकरीता दोन दोन वर्ष लागतात. लोक आयुक्त कार्यालयात चकरा मारत आहेत. संच मान्यता व शालार्थ याचा लोकांना त्रास होतो. वारंवार पुण्याला यावे लागते, पुण्यावरुन घरी जावे लागते, संच मान्यता, शालार्थ या सर्व प्रशासकीय बाबी आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालावे. आयुक्तांना बोलवावे. या प्रशासकीय बाबी तातडीने मिटवाव्यात.

सभापती महोदय, पेन्शन योजनेबाबत कालही चर्चा झालेली आहे. दिनांक १.११.२००५ पूर्वी जे लोक तेथे आले आहेत, त्यांना पेन्शन योजना मिळण्याचा हक्क आहे. त्यामुळे त्यांना पेन्शनचा हक्क द्यावा. जिल्हा परिषदेच्या वर्गखोल्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. माननीय मनमोहन सिंग पंतप्रधान असताना समग्र शिक्षणाचा कायदा आणला होता. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी त्यांनी ७० हजार कोटी रुपये दिले होते. आता केंद्रात माननीय नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून शालेय शिक्षण, आरोग्यावरील खर्च खूप कमी केला आहे. त्यामुळे वर्गखोल्यांची अवस्था दयनीय झालेली आहे, त्यामुळे भरभक्कम तरतूद करण्यात यावी. मी पुन्हा एकदा विनंती करतो की व आग्रहाने मांडतो की, या राज्यातील गरीब लोकांना मोफत व दर्जेदार शिक्षण देण्याची घटनात्मक जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही. धन्यवाद.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांचे मी आभार मानतो. मी शिक्षण राज्यमंत्री झाल्यावर पाहिले होते की, शिक्षक हा विषय सन्माननीय सदस्यांनी मांडला. पण पहिल्यांदा गरीब विद्यार्थी हा शब्द या सभागृहात ऐकायला मिळाला, यासारखा आनंद नाही. निश्चितच हा दिवस व क्षण माझ्या स्मरणात राहील. त्यामुळे तुमचे फार फार आभार. आयुष्यभर तुमचे स्मरण आमच्या मनामध्ये राहील.

सभापती महोदय, परंतु बऱ्याचदा प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. प्रशासनाला नोटीस देणे फार महत्वाचे आहे. अशा प्रकारे शिक्षण विभागाचे

असुधारित प्रत

श्री.बच्चू कडू .....

कामकाज चालत असेल तर  व शिक्षण विभागात याचा अल्प प्रतिसाद मिळत असेल तर यावर कारवाई होणे फार महत्वाचे आहे. ते सुध्दा मुद्दाम या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, खरे तर या देशात जसा पैसा तसा देव आहे. पैसा जास्त असेल तर बालाजीला जातो, कमी असेल तर शिर्डीला जातो, त्यापेक्षा कमी पैसा असेल तर गावातील देव पुजतो. पैशानुसार माणसाचे राहणीमान बदलत जाते व तसा देवही बदलतो व शिक्षणही बदलते. ज्याच्याजवळ अधिक पैसा आहे त्याची शाळा चांगली आहे. त्याच्या शाळेत स्टाईल व सर्व गोष्टी आहेत. भौतिक सुविधा आहेत, शिक्षक चांगले आहेत, सर्वच बाबी चांगल्या आहेत. पण ज्यांच्याजवळ पैसा नाही त्यांची मेहनतही जास्त आहे. शेतकऱ्याचे पोरगं असूदे किंवा आपल्या मजुराचं पोरगं असू दे. आठ तास काम करायचे, मेहनत करायची, घाम गाळायचा पण त्यांच्या आरोग्याची व्यवस्था चांगली नाही, शिक्षणाची व खाण्यापिण्याची व्यवस्था चांगली नाही. मुंबईत शुध्द पाणी व गावात मात्र अशुध्द पाणी असते. मुंबईत चांगल्या शाळा असतात पण गावात शाळा उपलब्ध नाहीत. मागील ५०-६० वर्षापासून अशीच अवस्था आहे. जिसने जादा काम किया, जादा मेहनत की, उसको ही सरकारने अभी तक लपेटा है. त्याच्याच छाताडावर तलवार चालवली आहे. म्हणून ही बाब अतिशय सत्य आहे. मला वाटते की, सर्व शिक्षक आमदारांनी शिक्षकांसंबंधी प्रश्न मांडले त्यापैकी एक प्रश्न तरी या सभागृहात विद्यार्थ्यांवर मांडणे फार गरजेचे आहे.

सभापती महोदय, शिक्षण राज्यमंत्री म्हणून मी सहज जिल्हा परिषदेच्या एका शाळेत गेलो, घटक चाचण्या झालेल्या पाहिल्या, चाचणी २०-३० मार्काची होती. मुलांनी सोडविलेला पेपर एक तासाने विचारला. एकाही विद्यार्थ्याला २० पैकी ५ मार्काचेही सोडविता आला नाही. ही अवस्था विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणाची असेल, अशा प्रकारे शिक्षण दिले जात असेल तर मन काय म्हणेल. शिक्षण वाघिणीचे दूध आहे, संत गाडगे बाबा यांनी सांगितले होते की, शिक्षण नाही तर आयुष्य व्यर्थ आहे. अशा वेळी शाळा उभ्या राहिल्या, पोट्टे शाळेत जायला लागते. पण शिक्षणाची व्यवस्था मात्र शाळा नसल्यापेक्षाही बेकार झाली आहे. अशी अवस्था ग्रामीण भागात

असुधारित प्रत

श्री.बच्चू कडू.....

आहे. यावर सरकारने महत्वाचे निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यात जो शिक्षक शिकवणार नसतो, त्याच्या बाजूने तुम्ही उभे राहात असाल तर यासारखे करंटे आम्ही नाही. आम्ही तर याकडे पाहात आहोत, पण सन्माननीय सदस्यांनी देखील याकडे बघणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य एकीकडे शिक्षकांचा पगार वाढविण्याबाबत प्रश्न उपस्थित करीत असतील, १०० पैकी एक शिक्षक काम करीत नसेल तर ते तुम्ही व आम्ही पाहिले पाहिजे. हे बरोबर नाही. तुम्ही त्याला ताट देण्याचे काम करायचे पण ताटात जे अन्न पाहिजे, त्या अन्नाचे काम कोणाचे नाही. ते काम फक्त सरकारचे आहे का. त्याबाबत कोणाची वैयक्तिक जबाबदारी कर्तव्य काहीच नाही. त्याने ते कर्तव्य केले पाहिजे. नगर परिषद व जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये कोणाचे पोरग जात आहे. सरपंच, आमदार, अधिकारी यांची पोर अशा शाळेत जात नाहीत. जो शिक्षक ज्या शाळेत शिकवितो त्याच्या १० टक्के पोर फक्त त्या शाळेत जातात, ९० टक्के शिक्षक आपल्या मुलाला दुसऱ्या शाळेत पाठवितात ही वस्तुस्थिती आहे. यावर तुम्ही आम्ही कोणीच बोलायचे नाही का. आपण येथे पाहतो की, शिक्षकांचे प्रश्न मागे राहिले यामध्ये कवडीचीही शंका नाही. आम्ही पाहतो की, १०-२०-३० टक्के अनुदान देताना इतर कर्मचाऱ्यांना देतो व शिक्षकांना देत नाही. पेन्शन योजना आपण पाहिली तर तलाठी व ग्रामसेवक डायरेक्ट १०० टक्के पगारावर नोकरीस लागतो, शिक्षक १०-२०-३०-४० टक्क्यावर नोकरीस लागतो ही काय पध्दत आहे का. या सुधारणा करणे फार महत्वाचे आहे, माझ्या मते आवश्यक आहेत.

सभापती महोदय, या देशात तीन गोष्टी प्रामुख्याने तपासल्या पाहिजेत. राज्यातील हॉस्पीटल, आरोग्य खाते, शिक्षण विभाग, शेतकरी, मजूर या वर आम्ही काम करण्यास ताकदीने सुरुवात केलीतर हे प्रश्न सुटतील असे मला वाटते. या सभागृहात दर्जेदार शिक्षणासाठी चर्चा झाली पाहिजे, त्याकरीता वारंवार सभागृह तहकूब झाले पाहिजे. पण तसे होतच नाही. कारण मागील प्रश्न शिल्लक राहतात, अशा प्रश्नी सभागृहाचा दर्जा हा विषय संपलेला आहे, हा विषय राहिला नाही.

असुधारित

श्री.बच्चू कडू.....

सभापती महोदय, पवित्र पोर्टल बाबत सांगितले, पवित्र पोर्टल परीक्षा घेते का. पवित्र पोर्टल गुणवंत विद्यार्थ्यांची व शिक्षकांची यादी तयार करते. ती यादी शिक्षण संस्थांना पाठविली जाते. त्यात ३० टक्के मार्क त्या शिक्षण संस्थेने द्यावेत. पण त्यातही घोळ झाले आहेत. ३० टक्के मध्ये सुध्दा बदमाशी होते. त्यात सुधारणा होणे गरजेचे आहे. पवित्र पोर्टल रद्द करुन चालणार नाही. पवित्र पोर्टल नव्हते तेव्हा माझी संस्था असेल तर मीच नोकरभरती करीत होतो. माझे म्हणणे आहे की, केवळ शिक्षक आमदार म्हणून या प्रश्नाकडे पाहू नका. एक शिक्षक चुकला तर आयुष्यातील एक लाख विद्यार्थी चुकतात. ते एक लाख विद्यार्थी चुकले तरी चालतील. पण आमच्या संस्थेला तुम्ही अधिकार द्या, एवढा नाकर्तेपणा. माझे म्हणणे आहे की, या पवित्र पोर्टलमध्ये अधिक चांगले काय आणता येईल. गुणवंत शिक्षक तेथे गेला पाहिजे याकरीता आपण आग्रह धरावा. सरकार म्हणून आम्ही याकरीता छप्पर फाडून देऊ. पण याकरीता तुम्ही आग्रहच धरत नाही. जेथे नियुक्ती होते तीच चुकलेली आहे. एखादा इंजिनियर चुकला तर इमारत पडेल हे ठीक आहे. पण शिक्षक चुकला तर गरीबाचे आयुष्य चुकते, पिढी चुकते, अधिक गुणवान पिढी होईल हे आम्ही पाहिले पाहिजे. त्यासाठी एकही प्रश्न उपस्थित होत नाही. म्हणून मी सांगतो की, पवित्र पोर्टलबाबत काही सुधारणा असेल तर त्या निश्चित करुया. तसेच संच मान्यतेबाबत बिलकुल सुसुत्रता येईल, याबाबत आम्ही ऐकणार नाही. मी जळगाव प्रकरणाबाबत मागे तुम्हाला आश्वासन दिले होते, येत्या १५ दिवसापासून अंदर टाकण्यापासूनचा विषय होता. त्यांना बरखास्त करण्यापासून, जे आडवे येतील त्यांना घालवण्यापासूनची सर्व कार्यवाही ८ -१० दिवसात होणार आहे. शालार्थ प्रणालीमध्ये १५ दिवसात नवीन सुधारणासह आपण शासन निर्णय करु, जागेवर अभियान छेडू. महिना दोन महिने तुमच्या आमच्यासोबत राहून पैसे खाण्यासाठी या अटी टाकल्या. शालार्थ आयडीसाठी मान्यता दिली, पगार सुरु आहे, ऑफलाईनची व्यवस्था ऑनलाईन करण्यासाठी तुम्ही पैसे खाता.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.बच्चू कडू.....

माझे हे बोलणे योग्य नाही, परंतु वस्तुस्थिती तर मी सांगितलीच पाहिजे. सरकारने काय केवळ होयच म्हणायचे का ? ही वस्तुस्थिती तुम्ही आम्ही सर्व मिळून खोडून टाकू. मी त्यांना असे म्हटले की, शिक्षकांकडून प्रतिज्ञा-पत्र घ्यावे की, ही मान्यता चुकीची असेल, हा पगार चुकीचा दिला असेल तर त्याकरिता मी दोषी राहील. त्याकरिता त्याची शालार्थ जागेवर द्या ना ! गरज नसताना आपण एवढी सर्व कागदपत्रे मागत आहात ! हे सर्व प्रश्न सोडविण्याकरिता आपले देखील सहकार्य आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा विषय शाळांच्या खोल्यांबाबचा मांडलेला आहे. अंगणवाडीला आपण एमआरइजीएसचा निधी देतो, परंतु शाळा खोल्यांना एमआरइजीएसचा निधी दिला जात नाही. हा प्रश्न जसा आला, त्यानंतर लगेच मी एमआरइजीएस सचिवांना सांगितले की, एमआरइजीएसमध्ये शाळांना खोल्या घ्याव्यात, असा प्रस्ताव देण्यात यावा. शाळा खोल्या एमआरइजीएसमध्ये घेऊन त्याचे अभिसरण केले तर....

**सभापती :** तर याचा एक ॲश्योअर्ड सोर्स तयार होईल.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, जिल्हापरिषद निधी आणि आमदार निधी मिळून हे करता येईल. एक शाळा जर सात लाखात बनत असेल तर त्यापैकी एक लाख रुपये आमदार निधीमधून आणि सहा लाख रुपये जिल्हापरिषद निधीमधून असे याचे वर्गीकरण निश्चित करण्यात यावे. कुशल आणि अकुशल यांचे तंत्र जुळले तर सगळया शाळा अतिशय मजबूत होऊ शकतात. किमान चांगल्या खोल्या तरी गरिबांच्या मुलांना यामुळे मिळतील, एवढे तरी स्वप्न पूर्ण होईल. याप्रमाणे तसा प्रस्ताव लगेच राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठवेल. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे आपण मांडलेल्या सर्व मुद्दयांसदर्भात म्हणजेच संच मान्यता, अनुदान, पेन्शनच्या बाबत जो काही निर्णय आहे, तो धोरणात्मक असून त्या सर्व विषयासंदर्भात शासन सकारात्मक आहे. याबाबत निश्चितच चांगला निर्णय घेण्याचा शासन प्रयत्न करणार आहे.

-------------------

डॉ.वजाहत मिर्झा (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी मांडलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचनेवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे नवीन नाहीत. कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर आणि कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर रिक्त झालेली ही पदे आहेत. माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना पद भरतीकरिता बंदी घालता येत नाही. याबाबत दोन महिन्यांपूर्वी माननीय शालेय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी निवेदन केले होते की, एक महिन्याच्या आत शासन ही बंदी उठविणार आहे. आतापर्यंत ही बंदी उठविलेली नाही. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना कलम ३० अंतर्गत अधिकार दिलेले आहेत. ही पदे भरण्याची लवकर परवानगी देण्यात यावी.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, अल्पसंख्याक शाळांची तपासणी देखील होईल. त्या शाळा अल्पसंख्याकच्या निकषांमध्ये बसतात की नाही, हेही तपासावे लागेल. केवळ तुमच्या एकटयाच्याच नव्हे तर सर्वच ठिकाणची बंदी उठविण्याचा शासन प्रयत्न करणार आहे.

---------------

असुधारित

श्री.अरुण लाड ( पुणे विभाग पदवीधर ): सभापती महादेय, गेली दोन वर्षे कोविडमुळे प्राथमिक शाळा आणि नगरपालिकेच्या शाळा बंद होत्या. खाजगी शाळा ऑनलाईन चालू होत्या. परंतु आमच्या प्राथमिक शाळा बंद होत्या. शाळा बंद असल्याच्या या दोन वर्षात विद्यार्थ्यांची डोकी पूर्णपणे कोरी झालेली आहेत. शिक्षण हा विषयच त्या मुलांच्या डोक्यात नाही. माझी विनंती आहे की, दोन-दोन तुकडयांमध्ये एक शिक्षक शिकवित आहेत. प्रत्येक तुकडीत आठ-दहा मुले असली तरीही त्यांना प्रत्येक तुकडी याप्रमाणे एक शिक्षक नेमून या कोविडमुळे झालेल्या गॅपमुळे जे शैक्षणिक नुकसान झालेले आहे ते, विद्यार्थ्यांचे जादा तास घेऊन भरुन काढावे.

सभापती महोदय, दिल्ली येथे "आप" पक्षाच्या वतीने खाजगी शाळा बंद पाडून त्या ऐवजी महानगरपालिकेच्या शाळा चालू केलेल्या आहेत. त्यांचे जर होऊ शकते तर आपल्या येथे असे का होत नाही ? प्रत्येक तुकडीला एक शिक्षक मिळावा,याकरिता शासनाने ताबडतोब योग्य ती कार्यवाही करावी, ही माझी विनंती आहे.

---------

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शिक्षण राज्यमंत्री महोदयांनी अतिशय चांगल्या पध्दतीने जिव्हाळयाने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु मुळात साऱ्या यंत्रणेचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बघायला गेला तर तो बायस आहे, असेच म्हणावे लागेल. याबाबत आपल्या मनात एक आकस आहे. मोठया प्रमाणावर वेतनावर खर्च होत आहे, परंतु त्या ठिकाणी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा आकडा किती आहे ? प्रामुख्याने जेव्हा २०- ४० टक्क्यांचे अनुदान दिले जाते, त्यावेळी त्यांच्या हातातील पगाराचा आकडा जर आपण पाहिला तर त्या ठिकाणी होणारे काम आणि शिकणाऱ्या मुलांची संख्याही पाहिली पाहिजे. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये आर्थिकदृष्टया सक्षम असणाऱ्या पालकांची मुले फारशी जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे, केवळ होणाऱ्या खर्चाच्या आकडेवारीकडे न पाहता... (अडथळा).... या ठिकाणी आपण बहुजन वर्गातील जी गोर-गरीब मुले प्रामुख्याने खेडेगावातील मुली, या ज्युनियर कॉलेजेसमध्ये, शाळांमध्ये शिकत आहेत, त्या गोष्टीला जास्त महत्त्व दिले पाहिजे. ज्या मंडळींच्या वेतनाचा आग्रह आम्ही धरत आहोत, ही मंडळी पंधरा-सतरा वर्षे विना पगारी काम करणारी आहेत. आपण चर्चा करीत असताना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत निश्चितपणाने बोललेच पाहिजे, तो आग्रहही आम्ही सभागृहात अनेक वेळा धरत असतो. तो आग्रह देखील सभागृहात आमच्या तोंडी आहे. एक गोष्ट निश्चित आहे की, आपण जर विचार केला तर वेतनेतर अनुदान शाळांना जात आहे, वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत आपल्या ज्या पध्दती आहेत, आरटीईची मान्यता मांडली जाते, या संस्थांच्या इमारतींना एनबीएची एनओसी मागितली जाते. जे आहे, ते अधिक कसे सुसुत्र केले पाहिजे. तसेच, जे जेनुईन आहे, ते शासनाने केलेच पाहिजे, हीच मागणी आहे. शासन एका घटकाला भरपूर देत आहे, दुसऱ्या घटकाकडे मात्र शासन लक्ष द्यायला तयार नाही. या दोन्ही घटकांमध्ये शासनाने समानता आणावी, ही विनंती.

------------

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्याला विनंती केली होती की, मला यावर एक औचित्याचा मुद्दा किंवा विशेष उल्लेख मांडायचा आहे. कारण शिक्षण राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांच्या अर्धा तास चर्चेच्या सूचनेवरील चर्चा सुरु होण्यापूर्वी मी माननीय राज्यमंत्री महोदयांना भेटलो होतो. त्यावेळी ते अस्वस्थ होते. त्यांची अस्वस्थतता त्यांच्या भाषणामधून पूर्णपणे प्रतिबिंबित झालेली आहे. यापूर्वी ते उत्तराच्या बाबत अस्वस्थ होते. त्यांनी सभागृहात आता दोन महत्त्वाचे मुद्दे सांगितलेले आहेत. ग्रामसेवक तरी लगेच पूर्णवेळ कायम रुजू होतो. शिक्षकाला मात्र नोकरीमधून अनेक टप्प्यांमधून जावे लागते. दुसरे त्यांनी असे सांगितले की, शासनाचे जे अधिकारी आहेत, जे उत्तर तयार करतात. ते म्हणाले की, माझ्या हाती असलेले हे ब्रीफ किंवा उत्तर परस्पर विसंगत आहे. याकरिता संबंधितांवर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. काल दिनांक ०८मार्च,२०२२ रोजी तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमधील क्रमांक ५५ चा माझा प्रश्न होता. अतिशय चुकीचे आणि धादांत खोटे उत्तर याकरिता तयार केले गेले होते. सभागृहात यावर उत्तर मंत्रीमहोदय देत असतात. मंत्रीमहोदयांच्या हातात जे उत्तर लेखी दिले जाते, त्याची जबाबदारी त्यांच्याकडे नसते. मी काल वसती शाळेच्या संदर्भात प्रश्न विचारला होता की, त्यांची मूळ नेमणूक दिनांक त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंदविण्यात यावी. यावर उत्तर असे दिलेले आहे, ते उत्तर अतिशय चुकीचे आहे. ते उत्तर मागे घेण्याची आवश्यकता आहे. काल रोजी आपल्याला ते जमू शकले नाही. आज त्याकरिता ही संधी मला मिळालेली आहे. याकरिता मी वेगळी नोटीस द्यायची गरज असतानाही आपण या अर्धा तास चर्चेच्या सूचनेच्या निमित्ताने मला यावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सभापती महोदयांचा आभारी आहे.

सभापती महोदय, नागरी सेवा नियम १९८१ मध्ये स्पष्ट तरतूद आहे की, तदर्थ सेवा, कंत्राटी सेवा यामध्ये खंड जरी असला तरीही त्याची नोंद सेवा पुस्तिकेत केली पाहिजे. ग्रामविकास विभागाने याची पूर्ण अंमलबजावणी केलेली आहे. शिक्षण विभाग मात्र कागदी घोडे नाचवित बसतो.

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील......

मी या संदर्भात अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो. मी नावासह उल्लेख केला तर संबंधित अधिकाऱ्यावर शासन कारवाई करेल का ? संबंधित अधिकाऱ्याचे नाव समीर सावंत असे आहे. शासन यावर काय कारवाई करणार आहे ? " माझी मर्जी, मला लाज वाटत नाही, मला शरम वाटत नाही, " यावर मी एवढेच म्हटले की, "मराठीत याला निर्लज्जपणा म्हणतात." इतके निर्लज्ज अधिकारी जर या पध्दतीने खोटे उत्तर तयार करुन देत असतील तर कोणते प्रश्न सुटणार आहेत ? शालार्थ आयडीकरिता ज्या पध्दतीने नाचविले जाते, ते योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे साहेब वारंवार याबाबत सांगत असतात. याबाबत देखील इतके खोटे उत्तर दिले जाते, हेही योग्य नाही.

सभापती महोदय, याच अधिकाऱ्याने ०९ फेब्रुवारी रोजी दुसरा..... सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णय घेतलेले आहेत, तसे कळविलेले आहे. तेही वाचायचे नाही. कोर्टाचा निर्णय यामध्ये असा आहे की, १९७२ पूर्वीचे शिक्षक जे अप्रशिक्षित असले तरीही त्यांचे सेवा निवृत्ती वेतन त्यांना दिले जात होते. तो निर्णय नंतरच्या शिक्षकांना देखील लागू होतो. असे उच्च न्यायालयाने सांगितलेले आहे. याबाबत कोर्टाने कळविलेले आहे. आजुबाजूचे निर्णय जर पाहिले तर आपण आपल्या समोर असणाऱ्या कागदाचे इंटरप्रिटेशन कसे केले पाहिजे, याचे तारतम्य तर पाहिजे ! लोकप्रतिनिधी हेच तर सांगतात, त्यांना उभे पण नाही राहू द्यायचे, त्यांना उघडपणे अडायचे, "त्यांची काय लायकी आहे, त्याप्रमाणे ते वागतील मग्रुराप्रमाणे !" संबंधित अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ? काल दिनांक ०८ मार्च,२०२२ रोजी या संदर्भातील तारांकित प्रश्नाला दिलेले लेखी उत्तर शासन मागे घेणार का ? हे उत्तर शासनाला दुरुस्त करावे लागेल. माननीय मंत्रीमहोदय याचे उत्तर आपण द्यावे, एवढीच माझी विनंती आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्यासंदर्भात सर्व तपासणी केली जाईल. उत्तर मागे का घेतले, उत्तर चुकीचे का दिले याची सर्व तपासणी करुन कारवाई केली जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी अत्यंत कमी वेळात माझे म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

**सभापती** : हे शक्य आहे काय ?

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी अतिशय चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदनात सर्व शिक्षक आणि पदवीधर आमदार हे शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी भांडत आणि लढत असतात. त्यांच्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी माननीय सभापती महोदयांनी नेहमीच मदत केलेली आहे. मी एका महत्वाच्या प्रश्नाकडे सदनाचे लक्ष वेधणार आहे. विद्यार्थी हे आमचे दैवत आणि भविष्य आहे. विद्यार्थी आहे म्हणून शाळा आहेत आणि शाळा आहे म्हणून आमचा गुरुजी आहे. हे आम्ही कधीही विसरलो नाही. विद्यार्थ्यांचे कल्याण झाले पाहिजे. यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न चाललेला असतो. जर पोटात नाही तर ओठावर कसे येईल ? माननीय मंत्री महोदयांनी अनुदानाचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. माननीय राज्यमंत्री श्री. बच्चू कडू यांना सांगू इच्छितो की, जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये गोरगरीब आणि शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असतात. माझे दहावीपर्यंतचे शिक्षण जिल्हापरिषदेतील शाळेमध्ये झालेले आहे. तसेच माननीय सभापती महोदयांचे शिक्षण देखील जिल्हापरिषदेतील शाळेमध्ये झालेले आहे. जिल्हापरिषदेतील शाळेत गणित शिकविण्यासाठी शिक्षक आहेत तर विज्ञान शिकविण्यासाठी शिक्षक नाही अशी अवस्था असते.

**सभापती** : माननीय राज्यमंत्री यांनी शिक्षकांच्या बाबतीत कोणतेही गैर वक्तव्य केलेले नाही. त्यांनी त्यांच्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत की, शिक्षणाचा मुळ हेतू हा विद्यार्थी आहे. शिक्षक हे नंतर आहेत. तुम्ही स्वत: म्हणतात की, विद्यार्थी

**सभापती** .....

आहेत म्हणून शिक्षक आहेत. त्यामुळे लवकरात लवकर आपल्याला काय बोलायचे आहे ते बोलून घेऊन विषय संपवून टाकावा, अशी माझी सूचना आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे लक्ष वेधणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. सन २०१२ पासून २०२२ पर्यंत अशी एकूण दहा वर्षे झालेली आहेत. शिक्षकांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. मानननीय राज्यमंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले आहे की, एखादा डॉक्टर... त्यामुळे शिक्षक, शिक्षकेतरची रिक्त पदे भरण्यासाठी शासन अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेईल काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल ६ हजार लोकांना पकडले आहे. पैसा देऊन ती लोक नको ती कृत्ये करीत होती. त्यासंदर्भात पहिल्याप्रथम त्यांना फासावर चढवा असे का नाही सांगत असा माझा प्रश्न आहे. सर्वांचा अपमान झालेला आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी त्यांची भावना व्यक्त करुन दाखविलेली आहे. पण त्यांची अडचण अशी आहे की, त्यांच्या विभागाला निधी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. जिल्हापरिषदा नवीन शाळांना निधी देत नाही. डीपीडीसी किंवा आमदार फंडातून निधी द्यावा लागतो. माननीय राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, आदिवासी विभाग आहे. आदिवासी अती दुर्गम भागात त्यांनी अघोषित शाळा मंजुर केल्या आहेत. अशा ठिकाणी शिक्षणाची खरोखर अडचण आहे. त्यामुळे अशा शाळा सुरु करण्यासाठी माननीय राज्यमंत्री

असुधारित प्रत

महोदय निर्णय घेतील काय असा माझा प्रश्न आहे. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यासाठी तरतूद करावी, अशी माझी सूचना आहे.

श्री. बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत यांना सांगू इच्छितो की, आदिवासी अती दुर्गम भागातील शाळांसाठी आदिवासी विभागाकडून अनुदान मिळू शकते. त्यामुळे अशा शाळा तपासून घेऊन....

श्री. संजय दौंड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक ८ वर चर्चा सुरु आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड यांना सांगू इच्छितो की, अर्धातास चर्चा सुरु आहे.

श्री. संजय दौंड : सभापती महोदय, मी जरी शिक्षक नसलो तरी जिल्हापरिषदेत १० ते १५ वर्षे कामे केलेली आहेत. मी माननीय राज्यमंत्री महोदयांचे मनापासून आभार व्यक्त करीत आहे. शाळा खोल्यांच्या संदर्भातील विषय आहे. शिक्षक जसा आवश्यक आहे तशीच शाळा खोली देखील आवश्यक आहे. शाळा खोल्यासंदर्भात ग्रामीण भागात अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. आमदार फंड किंवा जिल्हापरिषदेतील सेसमधून शाळा दुरुस्तीची कामे केली जातात. ती कामे पूर्णत: बोगस होतात. ही योजना किती दिवसांमध्ये लागू करणार आणि शाळा दुरुस्ती किंवा शाळेच्या परिसरची दुरुस्ती असेल तर ती सर्व कामे त्यामध्ये घेतली जातील काय ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी आज बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी सकाळी सभागृहात म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावासंबंधी चर्चा सुरु होती. जिल्हापरिषद, महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. त्या ठिकाणी प्रशासक नेमला जात आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री ॲड. अनिल परबजी हे मंत्री आहेत. मंत्री महोदयांनी कायद्यामध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. केंद्र शासनाचा कायदा आला म्हणून त्यावेळी सांगितले नाही. तसाच कायदा सहकाराचा आला होता. जशी

असुधारित प्रत

जिल्हापरिषदेसाठी ७४वी घटना दुरुस्ती केली. त्यानंतर ९७वी घटना दुरुस्ती केली. कोरोनाच्या काळात सहकारी संस्थांना ६ महिन्यांची मुदत वाढ दिली होती. या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. हे आपण करु शकतो किंवा कसे ? या

श्री. जयंत प्र. पाटील .....

विषयावर शासनाचे काय म्हणणे आहे ? सन्माननीय सदस्यांची मते विचारात घेतली पाहिजेत. आपण कायद्यात दुरुस्ती करु शकतो.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना विचारु इच्छितो की, कशात दुरुस्ती केली जाऊ शकते ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कायद्यात दुरुस्ती केली जाऊ शकते.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना विचारु इच्छितो की, कोणत्या कायद्यात दुरुस्ती केली जाऊ शकते ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जिल्हापरिषद, नगरपालिकेच्या संदर्भातील कायद्यात दुरुस्ती केली जाऊ शकते. कायद्यामध्ये आपल्याला बदल करावयाचा आहे आणि त्यासाठी दीड तासाच्या चर्चेला परवानगी देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण तशी चर्चा उपस्थित करावी मी त्याला परवानगी देतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी माननीय संसदीय कार्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी पहिल्या प्रथम या विषयात अभ्यास करावा.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण तशी चर्चा उपस्थित करावी. आपण चर्चा उपस्थित केल्यानंतर शासनाला उत्तर द्यावेच लागेल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी १०.०० ते सकाळी ११.४५ वाजेपर्यंत घेण्यात येईल त्यात म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २९ मिनिटांनी, गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------

असुधारित प्रत